म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू. प्रवास
सं. क्र. १०६६
REFBK-0027408
REFBK-0027408

# अष्टचक्री रोमायण

प्रवीण कारखानीस

REFBK-0027408
REFBK-0027408

मोरया
प्रकाशन

प्रकाशक व मुद्रक :
दिलीप महाजन
मोरया प्रकाशन
'संपदा', शास्त्रीनगर
नगरपालिका दवाखान्याजवळ
डोंबिवली (प.) ४२१ २०२
⌘
पुणे शाखा :
'अनुश्री' ४०/१०, एरंडवणा,
इंदिरा हाईटस्‌जवळ,
पुणे ४११०३८.
⌘
© प्रवीण कारखानीस
प्लॉट क्र. १९,
डॉ. भिसे हॉस्पिटलसमोर,
अंबरनाथ जिल्हा–ठाणे
पिन ४२१५०१.
⌘
प्रथमावृत्ती हंस प्रकाशन,
द्वितियावृत्ती – २८ जाने. १९९४
⌘
अक्षर जुळणी :
अक्षर विवेक,
रावसाहेब अपार्टमेंटस्, शिलाविहार कॉलनी,
पौड रोड, पुणे ३८.
⌘
मुद्रणस्थळ :
जंगम कलामुद्रण,
शनिवार पेठ,
पुणे.
⌘
ISBN81-7420-022-3
⌘
मूल्य : ४०/-

# अनुक्रमणिका


१ मुंबईचा निरोप. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ७

२ काबुली द्राक्षे : थोडी गोड; थोडी आंबट. . . . . . . . . . . . . . . . . २०

३ अनपेक्षित पाहुणचार! . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३६

४ 'छेलो कबाब' आणि जलप्राशन. . . . . . . . . . . . . . . . . . . . . ५२

५ सारी कृपा राज कपूरची! . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ६६

६ "दोब्रो दोश्ली!" . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ८३

७ टिटोंच्या उमद्या देशात. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ९२

८ इटलीतली 'फ्रेंच' पैज! . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ११०

९ कलानिधी रोममधील रोमांचकारी दिवस. . . . . . . . . . . . . . . . . १२७


⌘ ⌘ ⌘

# लेखकाचे मनोगत

मी कुणी साहित्यिक नाही हे निश्चित परंतु 'चरन् वै मधु विन्दति' या वचनावर श्रद्धा ठेवून डोळसपणे भटकणारा 'घुमक्कड' जरूर आहे. बँकेसारख्या डेबिट-क्रेडिटच्या जगात वावरताना माझे मन मात्र ॲमेझोनच्या खोऱ्यापासून ॲबिसिनियाच्या वाळवंटापर्यंत भिरभिरत असते, हे मला नाकबूल करता येणार नाही. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी व्हेनिस ते पेकिंग असा खडतर प्रवास करणारा मार्को पोलो, आफ्रिकेच्या जंगलात नवनव्या प्रदेशाचा शोध घेत तीस वर्षे भ्रमंती करताना मनुष्य भक्षक समजल्या जाणाऱ्या मसाई जमातीतही मशहूर झालेला डॉ. डेव्हीड लिविंगस्टोन आणि अनोख्या जगाच्या शोधात अटलांटिक महासागरावर अविश्रांत सफरी करीत असताना वेस्ट-इंडिज बेटांचा शोध लावणारा साहसी दर्यावर्दी ख्रिस्तोफर कोलंबस, ही माझी स्फूर्तिस्थाने!

त्यामुळेच की काय, रुपये-आणे-पैच्या रटाळ चाकोरीत जखडलेला असतानाही जेव्हा जेव्हा आणि जेवढेजेवढे शक्य होईल तेवढे जग पहायचेच हा माझा संकल्प आहे, नव्हे निर्धार आहे!

एकोणीसशे चौऱ्याहत्तर साली नोकरीच्या निमित्ताने मोटरसायकलसारखे सोयीस्कर वाहन घेण्याचा योग आला आणि माझ्यातला 'प्रवासी' जागा झाला. पूर्वी पुण्याच्या 'फर्ग्युसन महाविद्यालया'त शिकत असताना पाठीवर वळकटी बांधून मी सातारा, हैदराबाद वगैरे ठिकाणी साहित्यसंमेलने 'बघायला' गेलो होतो, तेवढाच काय तो प्रवासाचा अनुभव पदरी होता; त्यामुळे प्रथम 'मुंबई–बडोदे–मुंबई' आणि त्यानंतर ठाणे–दिल्ली–ठाणे असा प्रवास मोटरसायकलवरून करून बघितला आणि माझा आत्मविश्वास बळावला.

मोटरसायकलवरून खुष्कीच्या मार्गाने जितके दूरवर जाता येईल तितके गेलेच पाहिजे या एकाच विचाराने माझे मन झपाटले गेले. प्राचीन इतिहासाबद्दल उपजतच गोडी होती त्यामुळे 'रोम' शहराबद्दल आकर्षण होतेच. शहात्तरच्या नोव्हेंबरात मी 'मुंबई–रोम–मुंबई' असा साहसी प्रवासाचा संकल्प जाहीर करून टाकला आणि अल्पावधीतच आम्हा आठजणांचा चमू तयारही झाला.

नकाशांची जमवाजमव, रजेसाठी अर्ज, विनंत्या आणि वरिष्ठांच्या गाठीभेटी, परकीय चलनाच्या मंजुरीसाठी दिल्लीपर्यंतच्या वाऱ्या, व्हिसासाठी पायपीट, मोटरसायकल्सची डागडुजी, अत्यावश्यक सामानांची जुळवाजुळव, प्रवासाच्या मार्गाचा तपशीलवार आणि सूक्ष्म अभ्यास आणि तदनुषंगाने करावा लागणारा प्रचंड पत्रव्यवहार, यात सहा महिने कसे गेले ते कळलेदेखील नाही.

संयोजन केले त्याप्रमाणे तब्बल दीडशे दिवसांचा आणि साडेबावीस हजार किलोमीटर्सचा प्रदीर्घ पण रोमांचक प्रवास पूर्ण करण्यात आम्ही यशस्वी झालो.

आमच्या या प्रवासात लुटलेला मनमुराद आनंद, टिपलेले हृद्य क्षण, अनुभवलेले भलेबुरे प्रसंग–एकूण सारेच 'अष्टचक्री रोमायण' आबालवृद्धांपर्यंत पोहोचवावे ही आस माझ्या मनाला लागली होती. त्या भारावलेल्या अवस्थेत मी लिहीत गेलो आणि अखेर १९८३ मध्ये पुण्याच्या आनंद अंतरकरांनी मोठ्या आत्मीयतेने आणि कल्पकतेने 'विश्वमोहिनी प्रकाशना' तर्फे ते पुस्तकरूपाने वाचकांना सादर केले.

'काच कांचन संसर्गात धत्ते मारकतीम् द्युतिम्' असे संस्कृत वचन आहे. सुवर्णाच्या सान्निध्यात काचेला देखील पाचूची झाक येते. माझ्या या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीसाठी गो. नी. दांडेकरांसारख्या ऋषितुल्य साहित्यिकाने प्रस्तावना लिहून मला एकप्रकारे शुभ-आशीर्वादच दिले.

आज याच पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीसाठी मराठीतील मातब्बर पत्रकार, नाटककार, सिद्धहस्त लेखक आणि ६६व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. विद्याधर गोखले यांनी कौतुकाचे जे चार शब्द लिहिले आहेत ते त्यांच्या मोठ्या मनाचेच द्योतक आहेत.

'मोरया प्रकाशन'च्या दिलीप महाजनांनी द्वितीय आवृत्ती काढण्याची जबाबदारी आनंदाने उचलली त्याबद्दल त्यांचे आभार केवळ शब्दांनी व्यक्त करणे कठीण आहे.

अधिक काय लिहू? ज्ञानोबा माउलींच्या शब्दात एकच विनंती–

"तरी न्यून ते पुरते, अधिक ते सरते
करोनि घेयावे हे तुमते, विनवितु असे।"

प्रवीण कारखानीस

# प्रस्तावना

आजकाल वाहतुकीची–प्रवासाची–जलद नि सुखकारक साधने सहज उपलब्ध असल्यामुळे, (गांठी पुरेसा पैसा असेल तर) विदेशयात्रांचे पुण्य संपादिणे तसे अवघड नाही! देशां-देशांतील परस्पर संबंध गत काही वर्षांत खूपच वाढले आहेत, ह्यामुळेही 'फॉरेन-रिटर्न्ड' बनणे मुश्किल राहिले नाही. साहजिकच, प्रवासवर्णने बरीच लिहिली गेली आहेत. मात्र त्यांतील फारच थोडी प्रवासवर्णने प्रत्ययकारी असतात. अशा प्रवासवर्णनपर ग्रंथांत श्री. प्रवीण कारखानीस ह्यांचे 'अष्टचक्री रोमायण' आपल्या वैशिष्ट्याने सहज उमटून दिसेल. कारण हे विमानाने उडत उडत जाऊन, उडत उडत केलेले वर्णन नव्हे; योजनाबद्ध 'कंडक्टेड् टूर' मधून जन्मलेले ठरीव ठशाचे 'गाइड' टाइप पुस्तक नव्हे!

प्रवीण कारखानीस आपल्या ७ साहसी साथीदारांसह ४ मोटारसायकलींवरून, फारसे पूर्व-संयोजन न करता निघाले. अफगाणिस्तान, ईराण, तुर्कस्थान, युगोस्लाव्हिया, इटली असे देश 'चक्रा-क्रान्त' करून 'रोम'ला पोहाचले. अशा ह्या मुसाफिरीत झालेले विविध जन-दर्शन, आणि अनुभविलेले कडु-गोड प्रसंग ह्या प्रवासवर्णनात सुबोध ओघवत्या शैलीत त्यांनी वाचकांपुढे मांडले आहेत. उपर्युक्त विदेशांतील प्राचीन संस्कृतीचे अवशेष कोणते आणि आजचे विशेष कोणते, तेही त्यांनी जाता जाता नोंदले आहेत. आपल्या भारताबद्दल विदेशातील सामान्य जनांची काय भावना आहे, हेही ह्या 'अष्टचक्री रोमायणा'वरून आपणांस कळेल.

विदेशियांच्या मनमोकळ्या नि निकट संबंधामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरलेला हा प्रवासवर्णनपर ग्रंथ वाचकांना केवळ रंजकच नव्हे तर उद्बोधकही वाटेल. अशीच आणखी प्रवासवर्णने कारखानीस ह्यांच्याकडून लिहिली जावोत, ही शुभेच्छा.

विद्याधर गोखले.

(१)

केंद्रीय प्रवास दा. क्र. ७६६ २८७०८ २१३११८

# मुंबईचा निरोप

२२ मे १९७७. सकाळचे साडेनऊ वाजलेले.

भारताचं प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या मुंबईच्या सुप्रसिद्ध 'गेटवे ऑफ इण्डिया'चा परिसर आबाल-वृद्धांनी फुलून गेला होता. रविवारची सकाळ असूनही चहा-पोह्यांच्या न्याहरीला चाट मारून, ठाणे–डोंबिवली–अंबरनाथचे शेकडो लोक शिवछत्रपतींच्या पुतळ्याजवळ जमले होते.

मोटरसायकल्सवरून 'मुंबई–रोम–मुंबई' अशा धाडसी प्रवासाचा संकल्प सोडलेल्या आम्हा आठ तरुणांना निरोप देण्यासाठी महाराष्ट्राचे राज्यमंत्री सुशीलकुमार शिंदे मोठ्या आपुलकीने तिथं आले होते. 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे पश्चिमविभागाचे प्रमुख सी. जी. प्रधान अन् विभागीय अधिकारी एस्. ए. जोशी हे आपल्या अधिकारीवर्गाचा संपूर्ण ताफाच घेऊन आले होते. 'ईगल फ्लास्क'चा रंगीबेरंगी बॅनर मोठ्या दिमाखानं झळकत होता. 'सिएट टायर्स'चे प्रसिद्धी-अधिकारी कॅमेऱ्यानं निरोपाचा क्षण टिपण्यासाठी आतुर झालेले दिसत होते. आमच्या प्रवासयोजनेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या 'गॅब्रिएल् इण्डिया', 'स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स्', 'स्टँडर्ड बॅटरीज्', 'मायको', 'डकबॅक', 'एल्. जी. बालकृष्ण ब्रदर्स', 'फोर्बस् फोर्बस् ॲण्ड कॅम्पबेल' इत्यादी कंपन्यांचे प्रतिनिधीही मोठ्या उत्साहानं या समारंभाला आलेले होते.

आमच्या या निरोपसमारंभाला त्या दिवशीच्या इंग्रजी–मराठी वृत्तपत्रांनी ठळक प्रसिद्धी दिली असल्यानं कुलाबा, कफ परेड, मरीन ड्राइव्ह – इतकंच नव्हे, तर गिरगाव, दादर, कुर्ला, पार्ला वगैरे ठिकाणच्या अनेक हौशी आणि जिज्ञासू तरुण–तरुणींनी तिथं मोठ्या उत्साहानं गर्दी केली होती. मात्र या सगळ्यांशी हस्तांदोलन करीत असताना व त्यांच्या हार-तुऱ्यांचा स्वीकार करीत असताना आमच्या मनात मात्र भावनांचं चक्रीवादळ थैमान घालीत होतं!

# प्रस्तावना

आजकाल वाहतुकीची–प्रवासाची–जलद नि सुखकारक साधने सहज उपलब्ध असल्यामुळे, (गांठी पुरेसा पैसा असेल तर) विदेशयात्रांचे पुण्य संपादिणे तसे अवघड नाही! देशां-देशांतील परस्पर संबंध गत काही वर्षांत खूपच वाढले आहेत, ह्यामुळेही 'फॉरेन-रिटर्न्ड' बनणे मुश्किल राहिले नाही. साहजिकच, प्रवासवर्णने बरीच लिहिली गेली आहेत. मात्र त्यांतील फारच थोडी प्रवासवर्णने प्रत्ययकारी असतात. अशा प्रवासवर्णनपर ग्रंथांत श्री. प्रवीण कारखानीस ह्यांचे 'अष्टचक्री रोमायण' आपल्या वैशिष्ट्याने सहज उमटून दिसेल. कारण हे विमानाने उडत उडत जाऊन, उडत उडत केलेले वर्णन नव्हे; योजनाबद्ध 'कंडक्टेड् टूर' मधून जन्मलेले ठरीव ठशाचे 'गाइड' टाइप पुस्तक नव्हे!

प्रवीण कारखानीस आपल्या ७ साहसी साथीदारांसह ४ मोटारसायकलींवरून, फारसे पूर्व-संयोजन न करता निघाले. अफगाणिस्तान, ईराण, तुर्कस्थान, युगोस्लाव्हिया, इटली असे देश 'चक्रा-क्रान्त' करून 'रोम'ला पोहाचले. अशा ह्या मुसाफिरीत झालेले विविध जन-दर्शन, आणि अनुभविलेले कडु-गोड प्रसंग ह्या प्रवासवर्णनात सुबोध ओघवत्या शैलीत त्यांनी वाचकांपुढे मांडले आहेत. उपर्युक्त विदेशांतील प्राचीन संस्कृतीचे अवशेष कोणते आणि आजचे विशेष कोणते, तेही त्यांनी जाता जाता नोंदले आहेत. आपल्या भारताबद्दल विदेशातील सामान्य जनांची काय भावना आहे, हेही ह्या 'अष्टचक्री रोमायणा'वरून आपणांस कळेल.

विदेशियांच्या मनमोकळ्या नि निकट संबंधामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरलेला हा प्रवासवर्णनपर ग्रंथ वाचकांना केवळ रंजकच नव्हे तर उद्बोधकही वाटेल. अशीच आणखी प्रवासवर्णने कारखानीस ह्यांच्याकडून लिहिली जावोत, ही शुभेच्छा.

विद्याधर गोखले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. प्रवास
दा. क्र. ७६६
२८७०८
२७।३।९८

(१)

# मुंबईचा निरोप

२२ मे १९७७. सकाळचे साडेनऊ वाजलेले.

भारताचं प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या मुंबईच्या सुप्रसिद्ध 'गेटवे ऑफ इण्डिया'चा परिसर आबाल-वृद्धांनी फुलून गेला होता. रविवारची सकाळ असूनही चहा-पोह्यांच्या न्याहरीला चाट मारून, ठाणे–डोंबिवली–अंबरनाथचे शेकडो लोक शिवछत्रपतींच्या पुतळ्याजवळ जमले होते.

मोटरसायकल्सवरून 'मुंबई–रोम–मुंबई' अशा धाडसी प्रवासाचा संकल्प सोडलेल्या आम्हा आठ तरुणांना निरोप देण्यासाठी महाराष्ट्राचे राज्यमंत्री सुशीलकुमार शिंदे मोठ्या आपुलकीने तिथं आले होते. 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे पश्चिमविभागाचे प्रमुख सी. जी. प्रधान अन् विभागीय अधिकारी एस्. ए. जोशी हे आपल्या अधिकारीवर्गाचा संपूर्ण ताफाच घेऊन आले होते. 'ईगल फ्लास्क'चा रंगीबेरंगी बॅनर मोठ्या दिमाखानं झळकत होता. 'सिएट टायर्स'चे प्रसिद्धी-अधिकारी कॅमेऱ्यानं निरोपाचा क्षण टिपण्यासाठी आतुर झालेले दिसत होते. आमच्या प्रवासयोजनेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्या 'गॅब्रिएल् इण्डिया', 'स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स्', 'स्टँडर्ड बॅटरीज्', 'मायको', 'डकबॅक', 'एल्. जी. बालकृष्ण ब्रदर्स', 'फोर्बस् फोर्बस् ॲण्ड कॅम्पबेल' इत्यादी कंपन्यांचे प्रतिनिधीही मोठ्या उत्साहानं या समारंभाला आलेले होते.

आमच्या या निरोपसमारंभाला त्या दिवशीच्या इंग्रजी–मराठी वृत्तपत्रांनी ठळक प्रसिद्धी दिली असल्यानं कुलाबा, कफ परेड, मरीन ड्राइव्ह – इतकंच नव्हे, तर गिरगाव, दादर, कुर्ला, पार्ला वगैरे ठिकाणच्या अनेक हौशी आणि जिज्ञासू तरुण–तरुणींनी तिथं मोठ्या उत्साहानं गर्दी केली होती. मात्र या सगळ्यांशी हस्तांदोलन करीत असताना व त्यांच्या हार-तुऱ्यांचा स्वीकार करीत असताना आमच्या मनात मात्र भावनांचं चक्रीवादळ थैमान घालीत होतं!

परमेश्वराच्या कृपेची आणि आमच्या हितचिंतकांच्या नि मित्रपरिवाराच्या सदिच्छांची शिदोरी बरोबर घेऊन आमचा प्रवास आम्ही यशस्वीरित्या पार पाडू याबद्दल संदेह नव्हताच. पण नेमक्या त्याच दिवशी सकाळी घडलेल्या एका अपशकुनी घटनेमुळे मनात कसल्यातरी भावी संकटाची पाल चुकचुकत होती!

आमच्यातल्या सुधीर जोशीची हिरव्या रंगाची डौलडार 'जावा' नेमकी त्याच दिवशी पहाटे अनपेक्षितपणे डोंबिवलीहून चोरीला गेली होती. साहजिकच सुधीर आणि त्याचा सहकारी संजीव पेंढारकर यांच्यावर वज्राघात झाला होता. मढवी-बंधूंनाही त्यांच्याबरोबर थांबणं आवश्यक होतं. पण मी आणि विजय देवधरनं सुधीर-संजीव यांना धीर दिला आणि माझी निळी 'येझदी' घेऊन गेटवेच्या अश्वारूढ शिवपुतळ्याला प्रणाम करण्यासाठी ठीक वेळेवर येऊन पोचलो. रमेश फुलारे हा अविनाश कोलगेला पाठीशी घेऊन त्याची शेवाळी 'जावा' घेऊन ठाण्याहून अगोदरच आलेला होता.

आम्ही एकवार शिवछत्रपतींच्या तेजःपुंज चेहेऱ्याकडे दृष्टिक्षेप टाकला. क्षणभर वाटलं, महाराज आम्हाला सांगताहेत, 'जा वीरांनो, माझा तुम्हाला आशीर्वाद आहे. ज्या परकीयांनी आपल्या मातृभूमीवर अमर्याद आक्रमणं केली त्या मोगलांच्या, त्या फिरंग्यांच्या भूमीवर तुम्ही अनिरुद्धपणे संचार करून या! माझ्या कृष्णा घोडीची शक्ती तुमच्या वाहनांमध्ये येईल!' – अन् खरोखरच मराठी मातीतून अग्निपराग फुलवणाऱ्या या महान युगपुरुषाच्या आशीर्वादानं अन प्रोत्साहनानं आमचे बाहू स्फुरण पावू लागले.


आयुष्यातला तो चिरस्मरणीय ठरावा असा क्षण जवळ आला. माननीय सुशीलकुमार शिंदे यांनी स्नेहभावानं पाठ थोपटली. भोवतालच्या गर्दीतून 'नीट जा... सावकाश जा... सावध रहा... तब्येतीला जपा... पत्र पाठवा' अशा स्नेहल सूचना कानी पडत होत्या.

नयनांची निरांजनं ओवाळीत, कंठ दाटलेल्या अवस्थेत आमचे आई-वडील अन् आप्तेष्ट आम्हाला पुनःपुन्हा आलिंगनं देत होते. – आणि अखेर बिगुल वाजला! टाळ्यांचा कडकडाट झाला! सगळ्यांना हात उंचावून अभिवादन करीत आम्ही आमच्या गाड्या गतिमान केल्या. आमच्या संकल्पित 'मुंबई-रोम-मुंबई' या प्रदीर्घ प्रवासाला सुरुवात केली.

मुंबई–अहमदाबाद रस्त्यानं आम्ही निघालो. गजबजलेल्या मुंबापुरीची सरहद्द ओलांडून आम्ही पंचवीस–तीस किलोमीटर्स जातो–न जातो तोच आम्हाला रस्त्यालगतच्या एका झाडाखाली प्रभाकर मढवी त्याच्या पिवळ्या 'जावा'वर 'कोला' पीत बसल्याचं दिसलं. डोंबिवलीहून 'गेटवे ऑफ इण्डिया'ला वेळेवर येणं शक्य न झाल्यानं तो आणि एकनाथ भिवंडी–गणेशपुरीमार्गे अहमदाबाद रस्त्याला येऊन ठेपले होते. गाडीतलं पेट्रोल संपल्यानं एकनाथ ट्रकमधून पुढं पंपावर गेला होतो. अन प्रभाकर तिथं मार्गप्रतीक्षा करीत थांबला होता. त्याला पाहताच आम्ही खाली उतरलो. " 'कोला'सारखं महागडं पेय आपल्यासारख्या प्रवाशांनी वर्ज्य समजलं पाहिजे." अशी कानपिचकीही रमेशनं हसतहसत प्रभाकरला दिली. पुढच्या प्रवासात पाण्यालाही पैसे मोजावे लागणार असल्यानं सुरुवातीपासूनच नाहक गोष्टींवर पैसे खर्च करण्याचा मोह सपशेल टाळणं अतिशय आवश्यक होतं.

एव्हाना सकाळचे अकरा वाजले होते. पोटात कावळे कोकलू लागले होते: त्यात प्रभाकरनं तांदळाच्या दशम्या अन् लसणाची झणझणीत चटणी बरोबर घेतली आहे हे कळताच आम्ही अक्षरशः त्या अन्नावर तुटून पडलो! असलं अस्सल मऱ्हाटी खाणं पुढं मिळणार नव्हतं. त्यामुळं त्या न्याहरीत आम्ही विशेष रंगलो. सुमारे तासाभरानं एकनाथ पेट्रोल घेऊन परतला. त्या दिवशी टँकर्स–मालकांचा संप असल्यानं पेट्रोल–डिझेल या गोष्टी फार दुर्मिळ झाल्या होत्या. या संपामुळं आमच्या प्रवासातही खंड पडतोय की काय अशी शंका व भीती मनाला भेडसावीत होती. मनोरच्या मस्तान–नाक्यावर भरपूर पेट्रोल मिळतंय, अशी माहिती एकनाथनं पुरवताच मनोरच्या दिशेनं आमच्या गाड्या धावत सुटल्या.

मनोर पंपावर सुधीर–संजीव एका 'फियाट'मधून अगोदरच आलेले होते. त्यांच्या जिवाची घालमेल त्यांच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होती. पण गाडी चोरीला गेल्यानं नशिबाला दोष देत बसणारे ते नव्हते. संजीवच्या एका स्नेह्याकडून 'येझदी' मोटरसायकलची सोय करूनच ते आले होते. संजीव–सुधीरचा विरस होऊ नये म्हणून श्रीकांत शेंबेकर या तरुणानं आपली 'येझदी' मोटरसायकल त्यांना प्रवासासाठी मोठ्या आनंदानं देऊ केली होती. केवढं हे मोठं मन!



**मुंबईमध्ये मोटारसायकलवीरांना निरोप देताना**
**मा. सुशीलकुमार शिंदे आणि तरूण–समुदाय**

मात्र ती मोटरसायकल देशाबाहेर न्यायची असल्यानं ती 'आर. टी. ओ.'कडून नावावर करून घेणं भाग होतं. त्यासाठी किमान दोन दिवस तरी लागणार हे निश्चित होतं. त्यामुळं पुढे जाऊन आम्ही चारोटी–नाक्यावरच्या 'हॉटेल अप्सरा'मधे मुक्काम करायचं ठरवलं, अन सुधीर–संजीव मागे फिरले.

चारोटीच्या मुक्कामात असतानाच एक गमतीदार घटना घडली. काही महत्त्वाची कामं मुंबईत करायची राहिल्याचं मला एकाएकी आठवलं, आणि क्षणाचाही विलंब न करता मी नि विजय देवधर बाँडच्या आविर्भावात डोळ्यांवर गॉगल्स लावून, वर्तमानपत्राच्या आधारानं तोंड लपवीत 'सुरत–मुंबई' बसनं फोर्टच्या गजबजलेल्या भागात येऊन दाखल झालो. त्या दिवशीच्याच 'टाइम्स'मधे आमचा फोटो झळकत होता! आमच्या रोम–प्रवासाचा वृत्तपत्रांनी चांगलास गाजावाजा केला होता.

अशा वेळी आम्ही कुणा परिचितांच्या दृष्टीस पडलो असतो तर मोठीच आफत होती! परंतु आमची कामं झटपट आटोपून आम्ही शत्रूच्या छावणीतून सहीसलामत बाहेर पडावं अशा विजयी मुद्रेनं बिनबोभाटपणे चारोटीच्या निवासस्थानी परतलो!

चारोटी–नाक्यावर दोन दिवस अगदी कंटाळवाणे गेले. प्रवासाला अपशकुन होऊन खंड पडल्यामुळे आम्हा सर्वांचाच 'मूड' गेला होता. नाही म्हणायला एक संध्याकाळ मात्र दापचरीच्या आमच्या 'महाराष्ट्र बँके'तल्या सहकाऱ्यांबरोबर मजेत गेली, तेवढीच!

सुधीर–संजीव बुधवारी सकाळी सात वाजेपर्यंत न आल्यास आम्ही आमचा प्रवास पुढं चालू करणार होतो. मंगळवारी रात्रीपर्यंत त्यांच्याकडून कोणताच निरोप न आल्यानं आम्ही सगळेच बेचैन झालो होतो. त्या दोघांना मागे टाकून निघून जाणं मनाला पटत नव्हतं. पण त्याचप्रमाणं आणखी तिथं थांबणंही असह्य होणार होतं. सगळ्यांना एकच प्रश्न भेडसावत होता : 'उद्या सुधीर–संजीव येतील का?'

अन् पहाटेच्या नीरव शांततेला तडा गेला तो मोटरसायकलच्या आवाजानं. "आले–आले!" असं ओरडतच आम्ही आर्किमिडीजच्या 'युरेका–युरेका'च्या अभिनिवेशात धावत सुटलो. सुधीर–संजीव आले होते! आमचा आनंद गगनात मावेनासा झाला.

सकाळी गाड्यांसमोर नारळ फोडून आणि जवळच असलेल्या महालक्ष्मीचं दर्शन घेऊन आम्ही चारोटी सोडली.

मजल–दरमजल करीत आम्ही आता आठहीजण आमच्या चार मोटरसायकल्स एकापाठोपाठ एक अशा रीतीनं चालवीत गुजरातच्या दिशेनं निघालो होतो. महाराष्ट्राची सरहद्द आम्ही केव्हा ओलांडली ते कळलंही नाही! बलसाड, वापी, नवसारी, भडोच, बडोदा पार करून शेवटी अहमदाबाद गाठलं, तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. तिथल्याच एका 'खटिया–हॉटेल'मधे क्षुधाशांती करून उघड्यावर विनाशुल्क झोपण्याची अनुभूती घेतली. रस्त्यावरच्या वर्दळीनं आणि हॉटेलमधे जाणाऱ्या–येणाऱ्यांच्या आवाजानं आम्हाला पहाटे पाच वाजताच जाग आली. आज बराच लांबचा पल्ला गाठायचा होता. अहमदाबाद सोडल्यावर थेट उदयपूरलाच मुक्काम करायचा, असा निर्णय आम्ही घेतला

होता. त्यासाठी बरंच अंतर पार करायचं होतं. त्यामुळं अहमदाबादच्या खमण ढोकळ्याचा मोह आवरून आम्ही साबरमतीच्या काठानं हिम्मतनगरकडे निघालो.

उदयपूरला जाणारा रस्ता नक्की कुणीच सांगत नव्हतं. रिक्षावाले, टॅक्सीवाले–इतकंच काय, पण पोलिसही 'मणे खबर नथी' या थाटाची उत्तरं अगदी निर्विकारपणे देत होते. मोठ्या शहरांतून बाहेर पडून योग्य मार्गाला लागणं म्हणजे दिव्यच असतं, याचा प्रत्यय आम्हाला याच ठिकाणी प्रथम आला. शहराची नीट माहिती असणारे असें लोक कमीच. त्यात शहराबाहेर नेमकं कसं पडायचं याचं ज्ञान असणारे त्याहून कमी! तेही बरोबरच आहे म्हणा! एरवी बसटॅक्सीनं हिंडणारे लोक रस्ते लक्षात ठेवण्याचे श्रम घेतात कशाला? आता आपलंच पहा ना! 'बॉंबे सेंट्रल'हून नासिक–पुण्याला जाणारी एस. टी. ची बस सुटली की लागलीच आपण वर्तमानपत्रात किंवा मासिकात डोकं खुपसून प्रवासातला वेळ 'मजेत' घालवण्याचा प्रयत्न करतो. बाहेरची मजा लुटण्याचा, निसर्गसौंदर्य टिपण्याचा, महत्त्वाचे टप्पे लक्षात ठेवण्याचा खटाटोप करतो कोण? रोजचा प्रवाससुद्धा मग तो गाडीचा, बसचा असो किंवा पायी असो– डोळसपणे केला पाहिजे, हा महत्त्वाचा धडा या प्रवासात आम्ही शिकलो.

अहमदावाद सोडून आम्ही उदयपूरच्या दिशेनं भरधाव निघालो. गुजरातमधलं तापी–नर्मदेचं सुपीक खोरं मागं पडलं होतं, अन् राजस्थानचा ओसाड, डोंगराळ प्रदेश सुरू झाला होता. पावलोणच्याचं 'जेवण' करून अन् थोडीशी वामकुक्षी घेऊन आम्ही मार्गक्रमण सुरू केलं.

सूर्य आता खाली कलला होता. पण काळोख पडायला अजून दोनतीन तासांचा अवकाश होता. डोंगराळ प्रदेशातली वेडीवाकडी वळणं संपता संपत नव्हती. मैलन् मैल मनुष्यवस्तीचा मागमूसही दिसत नव्हता. सर्व बाजूंनी वेढलेल्या पर्वतांच्या रांगांमधून आम्ही चाललो होतो. अचानक थंड वारा वाहू लागला अन् पाठोपाठ पावसाची एक जोरदार सर आली.

मुंबई सोडल्यापासून आम्ही अंघोळ केली नव्हती. त्यामुळं निसर्गानंच आमच्यावर हा पर्जन्यधारांचा अभिषेक केला म्हणायचा! आम्ही मनसोक्त सचैल स्नान करून घेतलं. थोड्या वेळानं पावसाचा जोर कमी झाला. आम्ही पुढं निघालो. काही तासांतच आम्ही उदयपूर गाठणार होतो. सगळा प्रदेश पहाडी होता. चढउतार असंख्य. रस्ते पावसानं निसरडे झालेले. आमचा वेगही मंदावला होता.

अन तेवढ्यात धप्पदिशी आवाज आला. मी मागे बघितलं, तो काय? माझ्या बॅगचा खाली पडून साफ चुराडा झाला होता. गाडीचं मागचं कॅरिअर बॅगच्या वजनानं तुटलं होतं आणि बॅग रस्त्यावर पडली होती! आम्ही खाली उतरलो. कशीतरी ती बॅग त्या मोडक्या कॅरीअरला बांधली अन् मग मात्र जे धुम्म निघालो ते थेट उदयपूर येईपर्यंत थांबलोच नाही!

राजस्थानातल्या तीन प्रमुख शहरांपैकी उदयपूर हे एक. पृथ्वीराज चौहानचं अजमेर. राजा मानसिंगाचं जयपूर. तसं राणा संग अन् त्याचा पराक्रमी पुत्र राणाप्रताप यांच्या पराक्रमानं पावन झालेलं शहर म्हणजे उदयपूर. सुंदरसुंदर सरोवरांचं हे गाव. जवळच असलेलं 'पुष्कर सरोवर' तर तीर्थक्षेत्रच मानलं जातं. उदयपूर शहरातली रचना आणि घरांची बांधणी यावर राजघराण्याचा प्रभाव पडलेला दिसतो. राणा प्रतापचा अश्वारूढ पुतळा, त्याचप्रमाणं त्याच्या इमानी 'चेतक' अश्वाची स्मृति-वास्तू पहाण्यासारखी आहे.

उदयपूरला एका साध्याशा हॉटेलात आमचं सामान ठेवून गावातल्या एका ढाब्यावर अगदी राजस्थानी पद्धतीच्या जेवणावर आम्ही यथेच्छ ताव मारला. माझ्या कल्पनेप्रमाणं आमच्या संपूर्ण प्रवासात सर्वोत्कृष्ट जेवण आम्हाला मिळालं ते राजस्थानातच! उदयपूरला फक्त एक रात्र काढून सकाळीच आम्ही पुरीभाजीची न्याहरी करून जयपूरच्या दिशेनं निघालो.

उदयपूर ते जयपूर रस्ता एकूण यथातथाच. राजस्थानी वाळवंटाची थोडीफार झलक मात्र या भागात बघायला मिळत होती. रंगी-बेरंगी पेहेराव केलेले स्त्री-पुरुष असंख्य उंटांचे तांडे घेऊन जाताना दिसायचे. राज कपूरच्या 'जिस देशमें गंगा बहती है' या चित्रपटातलं 'आ, अब लौट चले' हे मुकेशचं गाणं नकळतच आमच्या ओठांवर यायचं. मंत्रमुग्ध होऊन आम्ही त्या नयनमनोहर दृश्याकडे कितीतरी वेळ पहात रहायचे! रस्त्यामधे पिसारा फुलवून नृत्य करणारे मोर दिसले की आम्ही लहान मुलांप्रमाणे त्यांच्या मागं धावायचो.

उदयपूर-जयपूरच्या दरम्यानच आम्हाला अजमेर हे ऐतिहासिक शहर लागलं. इथलं जैन-मंदिर जसं हिंदुधर्मीयांमधे प्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणे इथला 'ख्वाजासाहेबांचा दर्गा' हा आज हिंदुस्थानातली 'मक्का-मदिना' ठरली आहे. अजमेरला थोडीबहुत मराठी वस्तीही आहे. 'महाराष्ट्र-मंडळ' आहे. पण जयपूरला जाण्याची आमची ओढ तीव्र होती. त्यामुळं अजमेर शहराचं अक्षरशः

'धावतं दर्शन' घेऊन अगदी पूर्ण काळोख पडेपर्यंत आम्ही गाड्या चालवीत राहिलो. अखेर जयपूर शहरापासून अवघ्या साठ किलोमीटर्स अलीकडेच 'दूदू' नावाच्या गावी एका सरदारजीच्या 'खटिया हॉटेल'मधे मुक्काम ठोकला.

सकाळी गाड्या सुरू करणार तोच एकनाथच्या पिवळ्या 'जावा'मधलं पेट्रोल रातोरात चोरीला गेल्याचं लक्षात आलं. पण निदान सामान शाबूत होतं, याच समाधानात आम्ही जयपूरकडे आगेकूच केलं. साठ किलोमीटर्स अंतर कापायला असा कितीसा वेळ लागणार होता? अवघ्या दीड तासात आम्ही राजस्थानच्या या राजधानीच्या शहरात प्रवेश केला. इथं पूर्वी मी, रमेश अन् विजय आलो असल्यानं 'मिर्झा इस्माइल' रोडवरची 'प्रेमप्रकाश विश्रामधाम' ही धर्मशाळा आम्ही बिनचूकपणे शोधून काढली. रहाण्यासाठी आम्हाला प्रत्येकी फक्त दोन रुपये दर आकारला गेला. अंघोळी वगैरे आटोपून आम्ही त्वरित शहर बघायला बाहेर पडलो.

जयपूर शहराचे दोन भाग आहेत – जुनं जयपूर अन नवं जयपूर. इथले रिक्षावाले महाबिलंदर! रिक्षात बसण्यापूर्वी ते दर सांगतच नाहीत. "आपल्या मर्जीनुसार द्या" असं म्हणतात. पण प्रत्यक्षात त्यांच्याच मर्जीनुसार ते पैसे घेतात! माणसांनी ओढायच्या रिक्षाची ही अमानुष पद्धत कधी बंद होणार आहे कुणास ठाऊक!

जुन्या जयपुरातल्या सगळ्या इमारती गुलाबी रंगाच्या अन् प्राचीन पद्धतीच्या आहेत. म्हणूनच या शहराला 'पिंक सिटी' असं नाव पडलेलं आहे.

जयपूरजवळच 'आमेर'चा किल्ला आहे. या किल्ल्यातलं राजाचं शयनगृह खास किमती खड्यांनी मढलेलं आहे. शयनगृहाचे दरवाजे बंद करायचे अन् मेणवत्ती पेटवायची, म्हणजे हे खडे असे लखलखू लागतात की विचारूच नका! आमेरजवळ देवी शांतीचं प्राचीन मंदिर आहे.

जयपूर शहरात फेरफटका करीत असतानाच 'दाल–बाटी–चूर्मा' असा फलक दिसला. कुतूहल जागृत झालं. दुपारचं जेवण इथंच करायचं आम्ही ठरवलं. पण समोर आलेला 'बाटी' नामक पदार्थ खाण्याचं धाष्टर्य फक्त अविनाश कोलगेनं दाखवलं. बाकीच्यांनी फुलके अन कसलीशी भाजी खाऊन त्या हॉटेलमधून एकदम पळ काढला.



अविनाश कोलगे



संजीव पेंढारकर

संध्याकाळी फक्कडसा चित्रपट बघून 'प्रेमप्रकाश विश्रामधाम'मधे पथारी टाकली. दुसऱ्या दिवशी 'जयपूर-दिल्ली' या सर्वोत्कृष्ट राजमार्गाला लागलो.


तो दिवस रविवारचा होता. आमच्या प्रवासाला सुरुवात होऊन एक आठवडा झाला होता. दिल्लीत अजून कितीतरी कामं करायची होती. त्यामुळं हरियाना सरकारच्या एका अत्युत्कृष्ट 'मोटेल'चा अपवाद वगळता कुठंही न थांवता आम्ही पालम विमानतळाजवळून जाणाऱ्या 'धौला कुआँ' रोडनं नव्या दिल्लीत प्रवेश केला, आणि थेट करोल बागेमधल्या आमच्या 'बँक ऑफ महाराष्ट्र'च्या अतिथिगृहात जाऊन थडकलो.

भारताच्या या राजधानीत आमचं सर्वात महत्त्वाचं काम होतं पाकिस्तानचा व्हिसा मिळवणं! त्यासाठी मी आणि सुधीर चाणक्यपुरीतल्या पाकिस्तानी वकिलातीत गेलो. ही वकिलात इतर देशांच्या वकिलातींच्या तुलनेनं फारच वेगळी पण भव्य वाटली. इतर देशांच्या वकिलाती नावीन्यपूर्ण अन् अत्याधुनिक पद्धतीच्या. याउलट पाकिस्तानी वकिलात म्हणजे एक प्रचंड घुमट असलेली मशीदच जणू! पण ही वास्तू एवढी प्रचंड आहे, की बाकी देशांच्या 'एम्बसीज' त्यापुढं अगदी नगण्य वाटाव्यात.

पाकिस्तानी एम्बसीत शिरायला खास परवानगी लागते. मी यापूर्वी इथं आलो होतो. शिनवारी नामक एक बड्या अधिकाऱ्याशी माझा परिचय झालेला होता. त्यांनी मला प्रथम प्रवेश नाकारला होता. पण त्या वेळचे पाकिस्तानचे



विजय देवधर



सुधीर जोशी

पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांच्या पत्नी श्रीमती बेगम नुसरत भुत्तो यांचं मला आलेलं पत्र मी त्यांना दाखवलं होतं. त्यामुळंच त्यांनी आमचे अर्ज इस्लामाबादला खास शिफारस करून पाठवले होते.

वास्तविक आम्हाला पाकिस्तानमधून फक्त चारशे पन्नास किलोमीटर्स अंतर कापायचं होतं, अन् त्यासाठी फक्त २४ तासांचा ट्रान्झिट व्हिसा आम्हाला पुरेसा होता. परंतु 'राजकीय धोरणानुसार १९६२ पासून अशा तऱ्हेचा व्हिसा कुणा भारतीयाला देण्यात आलेला नाही' असं मला श्री. शिनवारी यांनी निक्षून सांगितलेलं होतं. पण आम्ही आशा सोडलेली नव्हती. त्यामुळं मी गेटवरूनच फोनवर परवानगी मिळवून पाकिस्तान एम्बसीत प्रवेश केला. माझ्याबरोबर एम्बसीचा एक माणूस देण्यात आला. त्यानं मला थेट शिनवारींच्या पुढ्यात नेऊन उभं केलं. पण पठ्ठ्या पुन्हा दारापर्यंत पोचवायलाही आला. अर्थात हा मानाचा भाग नव्हता हे न समजण्याइतका मी मूर्ख नव्हतो. साशंकतेपायी सुरक्षिततेच्या दृष्टीनं घेतलेली ती दक्षता होती हे उघड होतं. एरवी एम्बसीमधे आमच्यासारख्या सामान्य प्रवाशांची एवढी काळजी कोण कशाला घेईल?

अखेर पाकिस्तान-सरकारनं आम्हाला 'व्हिसा' नाकारला! आमच्यापुढं यक्षप्रश्न निर्माण झाला. आपण पाकिस्तानी लोकांना रस्त्यानं वा रेल्वेनं भारतामधून पुढं बांगलादेशमधे जायला परवानगी देत नाही, म्हणून पाकिस्तानही भारतीयांना पाकिस्तानमधून पुढं अफगाणिस्तानात जायला परवानगी नाकारतो. असं त्यामागचं राजकारण असल्याचं मला एम्बसीचा अधिक कानोसा घेतला तेव्हा कळलं.




रमेश फुलारे




प्रभाकर मढवी

कारणं काहीही असोत, आमचा मोठा विरस झाला. एकतर आता आकाशमार्गे काबूलला जाण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता. अन् दुसरं म्हणजे ज्या देशाविषयी आम्हाला अतिशय कुतूहल होतं त्या पाकिस्तानमधल्या लाहोर, रावळपिंडी अन् पेशावर या शहरांतलं जीवन आम्ही अनुभवू शकणार नव्हतो. झेलमच्या खोऱ्यातल्या पाक–व्याप्त काश्मिरचं सौंदर्य आम्ही लुटू शकणार नव्हतो. पण सगळ्यात खेद या गोष्टीचा होता की, मोगलांनी ज्या खिंडीतून भारतावर स्वाऱ्या केल्या, त्या अत्यंत बिकट, दुर्गम अशा खैबर खिंडीच्या भयानकतेचा दुर्मिळ असा आनंद आम्ही उपभोगू शकणार नव्हतो.

आम्ही ताबडतोब 'अरियाना अफगाण एअरलाइन्स'चं ऑफिस गाठलं. सरकारी मेहेरबानीमुळं मिळालेलं परकीय चलनाचं मंजुरीपत्र आमच्याजवळ असल्यानं काबूलची तिकिटं काढण्यात आम्हाला अडचण भासली नाही. शिवाय 'अफगाण एअरलाइन्स'नं आमच्या गाड्याही आमच्याबरोबरच विमानानं काबूलला नेण्याचं मान्य केल्यानं एक महत्त्वाचा प्रश्न निकालात निघाला. 'इंडियन एअरलाइन्स'नं अशा प्रकारे गाड्या नेण्याबाबतची असमर्थता लेखी पत्रानं मला कळवली होती. त्यामुळे अफगाणी विमान कंपनीनं आमची विनंती मान्य केली नसती तर? मग कसलं रोम अन कसलं काय! पुन्हा मुंबईकरांना (काळं) तोंड दाखवणं कठीण झालं असतं! पण परमेश्वरानंच या अफगाणी अधिकाऱ्यांना सद्बुद्धी दिली असली पाहिजे, असं मानून आम्ही तत्काळ आमच्या गाड्या घेऊन पालम विमानतळावर दाखल झालो. या ठिकाणी मात्र



एकनाथ मढवी



प्रवीण कारखानीस

आपल्या कस्टम–खात्यानं केलेल्या टोलवाटोलवीनं आम्ही पार वैतागून गेलो. कस्टम–खात्यानं परवानगी दिल्याशिवाय 'एअरलाइन्स' गाड्या ताब्यात घेणार कशी? अन् अशा प्रकारे गाड्या न्यायच्या म्हणजे एक्सपोर्ट विलाचे फॉर्म्स भरायचे की बॅगेज डिक्लरेशन करायचं हे कुणीही कस्टम–अधिकारी नीटपणे सांगत नव्हता. शेवटी वैतागून अन् काहीशा रागारागानंच मी अन् रमेश कस्टम–खात्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांच्या कचेरीत वेधडक घुसलो अन सगळा प्रकार त्यांना सांगितला. वृत्तपत्रांतली कात्रणं त्यांच्यापुढे ठेवली. पर्यटनखात्याची, शिक्षणखात्याची अन परराष्ट्रखात्याची आम्हाला आलेली पत्रं दाखवली. परराष्ट्रखात्यानं तर आमच्या मार्गावरच्या सर्व देशांतल्या आपल्या 'भारतीय एम्वसीज'ना आमच्या आगमनाच्या तारखादेखील कळवलेल्या होत्या. त्या पत्रांची प्रत माझ्याजवळ होतीच. हा सर्व प्रकार पाहिल्यावर ते अधिकारीही चपापले. त्यांनी विनाविलंब आम्हाला 'बॅगेज डिक्लरेशन' फॉर्म्स भरून द्यायला सांगितलं आणि आमच्या गाड्या 'क्लिअर' करण्याची व्यवस्था केली. वास्तविक या फॉर्ममधे डिक्लेअर केलेल्या वस्तूंची नोंद पासपोर्टमधेही करायला हवी. म्हणजे ती वस्तू पुन्हा आपल्या देशात आयातकर न भरता आणायचा हक्क प्राप्त होतो. पण आमचे कस्टम–ऑफीसर्स अशी नोंद आमच्या पासपोर्टमधे करायचं साफ विसरले! त्यामुळे परत आल्यानंतर अस्सल भारतीय बनावटीच्या आमच्याच मालकीच्या मोटरसायकल्स पुन्हा ताब्यात घेताघेता आमच्या कोण नाकी नऊ आले! त्याचं वर्णन पुढे येईलच.

अखेर ९ जून उजाडला. आमच्या दृष्टीनं हा कायमचा लक्षात राहील असा दिवस! मुंबई सोडून आज सतरा दिवस झालेले होते. परदेशगमनासाठी सगळेच कसे अधीर झाले होते. 'महाराष्ट्र बँके'च्या करोलबाग शाखेचे मॅनेजर श्री. एम. एल. मानकर यांचा निरोप घेऊन आम्ही आठजण सामानसुमान घेऊन 'पालम'वर येऊन ठेपलो. पाच–सहा मिनिटांतच आमची तपासणी पूर्ण झाली आणि दुपारी तीनच्या सुमारास आम्ही 'अफगाण एअरलाइन्स'च्या विमानात प्रवेश केला. आमच्या मोटरसायकल्सही त्याच विमानात चढवल्याचं प्रत्यक्ष बघितलेलं असल्यानं आम्ही निर्धास्त होतो.

क्षणार्धात विमानानं आकाशाकडे झेप घेतली, अन मातृभूमीला प्रणाम करून आम्ही बसल्या जागेवरच विचारांच्या एका वलयात साफ गढून गेलो.

विमान अमृतसरवरून पुढं गेलं अन् पाकिस्तानचा प्रदेश सुरू झाला. हिरवेगार गालिचे अंथरावेत अशी शेतं दिसत होती. नद्यानाले तर एखाद्या चित्रकारानं आपल्या कुंचल्यानं निळ्या–पांढऱ्या रेघोट्या ओढाव्या तसे वाटत होते. लाहोरचा परिसर ओलांडून विमान पेशावरकडे वळलं, अन् पेशावरही पार करून आता आम्ही हिंदुकुश पर्वताच्या अजस्र रांगांमधून, खैबरखिंडीवरून चाललो होतो. प्रदेश अती भयानक होता. विमान फारसं उंचावरून जात नसल्यानं दुपारच्या लख्ख उन्हात आम्ही या भयानकतेचा मनसोक्त आस्वाद घेत होतो..

–तोच अचानक एक शहर दिसू लागलं! बाप रे! लांबच लांब रस्ते! अन् हे काय? . . . सगळी वाहनं 'रॉंग साइड'नं – उजव्या बाजूनं कशी जाताहेत?. . . तेवढ्यात हवाईसुंदरीनं अनाउन्समेंट केली : "आपण आता काबूल विमानतळावर उतरत आहोत."

आम्ही ज्या क्षणासाठी आतुर झालो होतो तो क्षण आता अगदी जवळ आला होता! लहानपणापासून मनाशी बाळगलेलं परदेशगमनाचं आमचं स्वप्न साकार होत होतं.

फक्त दीड तासाचा विमानप्रवास करून आम्ही सायंकाळी पाचच्या सुमारास काबूलच्या भूमीवर पाय ठेवला!

⌘ ⌘ ⌘

२

# काबुली द्राक्षे : थोडी गोड; थोडी आंबट

परदेशात पाय ठेवल्यावर होणारा आनंद, वाटणारं कुतूहल शब्दांनी व्यक्त करणं खरोखर कठीण. लोकांचा वर्ण निराळा, भाषा निराळी, वेष निराळा अन चलनही निराळं! या निराळेपणामुळे कावूलला येताक्षणीच फॉरिनला आल्याची जाणीव आम्हाला होऊ लागली. त्यातून अफगाणी लोकांच्या दृष्टीनं आम्ही 'फॉरिनर्स'! त्यामुळे त्यांच्या पोलिस–अधिकाऱ्यांत कुजवूज सुरू झाली. आमच्यापैकी काहीजणांनी हस्तांदोलन करून आम्ही 'हिंदुस्तानी' असल्याचं त्यांना सांगितलं. त्यांनीही त्यांच्या भाषेत आनंद व्यक्त केला. अन् या क्षणापासून शब्दांचा आधार न घेता भावना व्यक्त करण्याचा आमचा मुद्राभिनयाचा प्रयोग सुरू झाला. कारण आम्हाला येणारी एकुलती एक परकीय भापा 'इंग्रजी' इथं अगदीच कुचकामी ठरत होती.

आमच्यापैकी सहाजण तिथंच विमानतळावर थांबले. मी आणि रमेश थोडेसे 'अफगाणी' घेऊन गावात जायला निघालो. इथला एक 'अफगाणी' म्हणजे आपल्याकडचे वीस पैसे. गावात जाणारी बस समोरच उभी होती. आपल्याकडच्या 'टाटा' कंपनीचीच, 'मर्सिडीज' बनावटीची. फक्त हिची दारं आपोआप बंद होणारी होती, एवढाच काय तो फरक! जास्तीत जास्त तिकीट एकच 'अफगाणी' होतं. त्यामुळं दोन तिकिटं घेऊन आम्ही गप्प बसलो. म्हटलं, जिथं योग्य असं हॉटेल दिसेल तिथं उतरावं. पण पाच मिनिटांतच शेवटचा स्टॉप आला अन् आम्ही 'पश्तुनिस्तान चौका'त उतरलो. पाकिस्तानमधल्या पठाणांच्या स्वतंत्र पश्तुनिस्तानच्या मागणीला पाठिंबा दर्शवण्यासाठीच कदाचित या चौकाला अफगाण–राजवटीनं हे नाव दिलं असावं.

या चौकामधल्या इमारती अत्याधुनिक होत्या. मध्यभागी सुंदरसं कारंजं होतं. समोर 'खैबर रेस्टॉरंट' अन् बाजूला एक चित्रपटगृह होतं. हॉटेलची चौकशी कुठं करावी या विचारात असतानाच आम्हाला पोस्ट–टेलिफोन–टेलिग्राफची

सोय असलेली 'पी. टी. टी.' दिसली, अन् दिल्लीच्या वास्तव्यात रानडे नामक व्यक्तीला पत्र लिहिल्याचं मला आठवलं. आम्ही लगबगीनं त्या बिल्डिंगमधे शिरलो. खाणाखुणांनीच काउंटरवरच्या माणसाला 'आम्हाला फोन करायचाय' असं सांगितलं अन् 'डिरेक्टरी' मागितली. पण या देशात 'टेलिफोन डिरेक्टरी' नावाची चीजच अस्तित्वात नसावी! मात्र त्या माणसानं आम्हाला भारतीय वकिलातीशी फोन जोडून दिला.

एव्हाना सायंकाळचे साडेपाच वाजलेले होते. त्यामुळे भारतीय वकिलातीतून काही माहिती मिळू शकेल याबद्दल मला तरी खात्री नव्हती. पण परदेशातल्या भारतीयांच्या कामकाजपद्धतीत इथल्यापेक्षा खूपच फरक आहे, या गोष्टीचा प्रत्यय आम्हाला त्या क्षणी आला. माणसं तीच; पण परदेशात गेल्यावर कशी विशेष कार्यतत्पर अन शिस्तबद्ध असतात. कदाचित आजूबाजूच्या वातावरणाचाही हा परिणाम असू शकेल!

एम्बसीतून रानड्यांचा फोन-नंबर मिळताच मी मोठ्या उत्कंठेनं त्यांच्याशी संपर्क साधला. "मी प्रवीण कारखानीस बोलतोय. आम्ही काबूलला आलो आहोत आणि पश्तुनिस्तान चौकातल्या 'पी. टी. टी.'च्या ऑफिसमधून बोलतोय," असं एका दमात सांगून टाकलं. श्री. रानडे पाच मिनिटांत आमच्या मदतीला धावून आले.

वयानं चाळिशीच्या आसपास आलेले, दाढी वाढवलेले श्री. रानडे करारी स्वभावाचे वाटले. भारत-सरकारतर्फे वास्तुशिल्पतज्ज्ञ म्हणून ते काबूल नगरपालिकेत काम करण्यासाठी आले होते. त्यांच्या मदतीनं आम्ही 'शाहर-ए-नाव' या काबूलच्या सुधारित भागातल्या चिकन स्ट्रीटवर 'स्टीक हाउस' नावाचं एक स्वस्त आणि मस्त हॉटेल रहाण्यासाठी निश्चित केलं. माणशी प्रत्येकी फक्त पंचवीस 'अफगाणी' म्हणजे पाच रुपयेच पडणार असल्यानं आम्ही अगदी खूष होतो. परदेशात एवढ्या स्वस्त दरात रहाता येतं या गोष्टीचं आम्हाला राहूनराहून नवल वाटत होतं.

रानड्यांचे आभार मानून आम्ही पुन्हा एकदा बसनं विमानतळावर गेलो आणि सगळ्या सहकाऱ्यांना घेऊन 'स्टीक हाउस'वर येऊन मुक्काम ठोकला.

हे हॉटेल म्हणजे एक आगळंच विश्व होतं. चारही बाजूंनी बंद असलेल्या या हॉटेलच्या हिरवळीवर मोकळ्या जागेत मजबूत खाटा टाकलेल्या होत्या, अन्

त्यांवर पंचतारांकित हॉटेलात शोभाव्या अशा गाद्या अन आकर्षक रंगीत रजया पसरलेल्या होत्या. खोल्यामधे जागा नसल्यानं एक रात्र आम्हाला बाहेरच काढायची होती.

समोरच जेवणाची सोय होती. अफगाणिस्तानात उघडपणे मद्यपान निषिद्ध असल्यानं 'बार'मधला 'तमाशा' इथं अजिबात नव्हता. चारपाचजणांचा वाद्यवृंद तंतुवाद्यांनी गिऱ्हाइकांचं मनोरंजन करीत होता. पण त्यांच्या गाण्याबजावण्यात तोचतोपणा होता. हे त्यांचं गाणं–वजावणं अगदी मध्यरात्रीपर्यंत चालू राही.

या हॉटेलमधेच जेवण घेण्याच्या इराद्यानं आम्ही पदार्थांची यादी मागितली. पाश्चिमात्य पद्धतीचं जेवणही इथं मिळत होतं. पण आम्हाला अफगाणी पद्धतीचंच जेवण करायचं होतं. ज्या देशात आपण जातो तिथल्या पद्धतीचंच जेवण्यात खरी मौज असते. एरवी आपण आपल्या पद्धतीचं जेवण घेतच असतो की! प्रवासातही तोच आहार चालू ठेवला तर मग प्रवास करण्यात काय हशील? आपल्याकडचे अनेक मराठी लोक दिल्ली–बंगलोरला सुट्टीत जातात अन् तिथं पोचताच मराठी पद्धतीच्या आहाराची सोय असणारी हॉटेल्स शोधून काढतात. दिल्लीची 'कुल्फी' वा 'छोले–भटूरे' अथवा बंगलोरचे 'सांबार–भाथ' खाऊन तृप्तीचा ढेकर ते देऊ शकत नाहीत, ही मोठी खेदाची गोष्ट आहे. तेव्हा, ज्या ज्या ठिकाणी जायचं त्या त्या ठिकाणी त्यांच्या पद्धतीचंच जेवण शक्यतो करायचं या आमच्या खाक्यानुसार अफगाणी पद्धतीचा 'काबूल–राइस' आम्ही मागवला. आपल्याकडच्या 'व्हेजिटेबल पुलाव'सारखा हा पदार्थ होता. त्याला प्रत्येकी वीस अफगाणी म्हणजे चार रुपये पडले. त्यानंतरच्या आमच्या मुक्कामातही आम्ही इतर अनेक अफगाणी पदार्थांची चव घेतली. त्यांपैकी 'अशाक' हा पदार्थ 'भयंकर' होता. याचं नाव 'अ–शाक' असलं तरी प्रत्यक्षात वेचव भाज्यांचा 'चव' भरलेल्या या करंज्याच होत्या! 'बलाणी' त्या मानानं सुसह्य होती. अफगाणिस्तानात सकाळ–संध्याकाळ मांसाहाराशिवाय गत्यंतर नसेल असंच आम्हाला दिल्ली सोडताना वाटलं होतं. पण इथं तर चक्क वांगी, बटाटे, भेंडी इत्यादी भाज्या सर्रास मिळत होत्या. आमच्यापैकी मढवी बंधू वारकरी–संप्रदायाचे असल्यानं मांसाहार त्यांना पूर्ण वर्ज्य होता. त्यामुळे

आम्हीही प्रामुख्यानं शाकाहारीच जेवण घेत असू. उपाहारासाठी पाकिस्तानी वकिलातीजवळ सकाळ-संध्याकाळ गरमगरम बटाटाचिप्स विकत मिळायचे. इतके चविष्ट चिप्स आम्हाला पुढे कुठेही मिळाले नाहीत. इथलं 'बदाम मार्केट' तर बदाम, अक्रोड, बेदाणा यांसारख्या पदार्थांनी भरलेलं आहे. फेरीवालेही गाड्यांवरून हे पदार्थ विक्रीसाठी घेऊन दारोदार हिंडत असतात. आपल्याकडे भुईमुगाच्या शेंगा विकतात ना, तसे! अवघ्या दहा रुपयांत किलोभर बदाम इथं मिळतात! बदामांचं अन बेदाण्यांचं सरबत इथं नाक्यावर विकत असतात. ग्लासभर सरबताची किंमत अवघे वीस पैसे!

'पश्तुनिस्तान चौका'तला सरबतवाला मुलगा तर आमच्यावर एवढा खूष असायचा, की बदामाच्या सरबताचे पैसे घ्यायला तो तयार नसायचा; आणि अगदी आग्रह करकरून आम्हाला तो सरबत प्यायला लावायचा. त्याच्यासारखा हसरा चेहेरा सबंध काबूलमधे आमच्या दृष्टीस पडला नाही. आमचा प्रवास संपवून जेव्हा आम्ही काबूलला परत गेलो, तेव्हा त्याला झालेला आनंद पाहून वाटलं : खरंच या मुलाशी आमचे पूर्वजन्मीचे ऋणानुबंध असले पाहिजेत. नाहीतर आम्हाला पाहिल्यावर याला प्रेमाचं भरतं का यावं? आजही हा सरबतवाला मुलगा माझ्या डोळ्यासमोर येतो अन्. काबूलच्या आमच्या वास्तव्याच्या आठवणींचा चित्रपट मनःचक्षूंसमोर दिसू लागतो.

चहा पिणाऱ्यांचं प्रमाण या देशात फार आहे. चहा अर्थातच बिनदुधाचा! चहाला इथं 'छाय' म्हणतात. दुधाला 'शीर', भाताला 'चावल', अन् पाण्याला 'आब'! 'पाणी पिणं आरोग्याला घातक असल्यानं पाण्याऐवजी प्रवाशांनी गरम चहाच प्यावा' अशा सूचना अफगाण-सरकारच्या पर्यटनखात्यानंच दिलेल्या होत्या. पण आम्ही मात्र बिनधास्तपणं सगळीकडे पाणी पीत असू. निदान त्यामुळे मुंबईला परतल्यावर शंभर गावचं पाणी प्यायल्याची प्रौढी तरी मारता येणार होती!

काबूल शहर तसं गजबजलेलं होतं. समुद्रसपाटीपासून ते सहा हजार फूट उंचीवर असल्यानं हवामान थंडच होतं. हिवाळ्यात इथं सहासहा इंचाचे बर्फाचे थर साचतात म्हणे. काबूल शहर हे हिंदुकुश पर्वताच्या रांगांमधल्या 'असमाई'


आणि 'शेरदरवाजा' या दोन पर्वतांच्या बेचक्यात वसलेलं आहे. या शहराचेही 'जुनं काबूल' अन् 'नवं काबूल' असे दोन भाग झाले आहेत. जुन्या काबुलमधे वस्ती दाट असून अस्वच्छता अधिक आहे. नव्या काबूलला 'शाहर-ए नाव' म्हणतात. निरनिराळ्या देशांच्या वकिलाती, चित्रपटगृहं, बाजारपेठा, मनीमार्केट अन् यूनोच्या योजनांखाली आलेल्या परकीयांची निवासस्थानं इथं आहेत. अफगाणिस्तानचे त्या वेळचे राष्ट्राध्यक्ष जनरल महंमद दाऊद यांची कचेरी अन् निवासस्थान शहराच्या मध्यभागीच होतं.

वास्तविक काबूलमधे तंबूत रहाणाऱ्या अन् चाकू-सुऱ्या विकणाऱ्या भटक्या जमातीच्या काबुलीवाल्यांशीच आमची गाठ पडेल असं वाटलं होतं. पण प्रत्यक्षात तर अशी एकही व्यक्ती आम्हाला तिथं आढळली नाही. तशी स्त्रियांची वर्दळ रस्त्यावर पुरुषांपेक्षाही अधिकच वाटली. बहुतेक स्त्रिया पश्चिमी पोशाखात वावरतात. पण अफगाणीखेरीज अन्य भाषा त्यांना येत नसावी. पुरुष सगळे एकजात बावळट अन् गबाळे! पायघोळ लेंगा, ढगळ अंगरखा अन् डोक्यावर भलंमोठं पागोटं अथवा टोपी, असा त्यांचा पेहराव! सांपत्तिक स्थिती यथातथाच. काबूलचा अपवाद वगळला, तर अफगाणिस्तानातले लोक तसे कमालीचे गरीब आहेत.

सुक्या मेव्याखेरीज इथं काहीच पिकत नाही. सगळ्याच जीवनावश्यक वस्तू आयात कराव्या लागतात. चहा सिलोनचा, चहाचे ग्लासेस फ्रान्सचे, भात पाकिस्तानचा, लवंगा सिंगापूरच्या, तूप हॉलंड-डेन्मार्कचं, कुलपं चीनची, आगपेट्या रशियाच्या, अन् सिगरेट्स तर इथं सगळ्याच देशांच्या आढळतात! काबूलमधली साधी वाण्याची दुकानंदेखील अशी परदेशी वस्तूंनी खच्चून भरलेली असल्यानं 'फॉरिन'ला आल्याचा 'फील' आम्हाला पदोपदी येत होता.

'मनी-मार्केट' ही इथली मोठी गमतीदार बाजारपेठ आहे. जगातल्या कोणत्याही देशाचं चलन इथं स्वीकारलं जातं, आणि त्या बदल्यात 'अफगाणी' मिळू शकतात. या प्रकारच्या व्यवहाराला सरकारचीच परवानगी असल्यानं प्रत्येक हॉटेलजवळ प्रायव्हेट मनीचेंजर्स धंदा करीत असतात. साधारणपणे एक डॉलरच्या बदल्यात चाळीस अफगाणी मिळतात.

काबूल शहरात शीख लोकांचं प्रमाण बरंच आहे. इथं त्यांचा 'गुरुद्वारा'देखील आहे. मी मुद्दाम एका शिखाशी दोस्ती करून गुरुद्वारातला 'लंगर' लाभ घेतला. 'लंगर' म्हणजे 'प्रसादाचं जेवण'. अर्थातच ते विनामूल्य असतं. गुरुद्वारात रहाण्याची सोय विनामूल्य होते, हे आम्हाला तिथंच कळलं. त्यामुळे परतीच्या वेळी 'अमृतसर ते ठाणे' असा सगळाच प्रवास आम्ही गुरुद्वारात रहातरहात विनामूल्य केला. गुरुद्वारात रहाण्या-जेवण्याची सोय तर होतेच, पण सामानही सुरक्षित रहातं हे अधिक महत्त्वाचं आहे. काबूलमधे येणाऱ्या शीख लोकांमधे नोकरीच्या आमिषात फसलेल्यांचंच प्रमाण अधिक!



अफगाणिस्तानात असे उंच,
शोभिवंत मनोरे टायीठायी दिसतात.

अमृतसर–चंदीगड भागांतले एजंट्स बेकार तरुणांना इराणमधे नोकरी मिळवून देण्याचं आमिष दाखवून रग्गड पैसे घेतात, अन् काबूलला आणून सोडून देतात. इराणचा व्हिसा भारतात मिळणं कठीण, म्हणून त्यांचा प्रयत्न काबूलमधे सुरू होतो. पण तिथंही वाटाण्याच्या अक्षताच वाट्याला येतात. मग इस्तंबूलला विमानानं जाण्याची धावपळ सुरू होते. –अन् हे सगळे गरजवंत आपली अक्कल सपशेल गहाण टाकून तुर्कस्तानच्या इस्तंबूल या शहरात येऊन उतरतात. आगीतून निघून फुफाट्यात जावं, तसे! इस्तंबूलमधल्या इराणी वकिलातीसमोर हे नाकदुऱ्या काढतात आणि 'आम्हाला आमच्या देशाला परत जायचंय अन् त्यासाठी विमानानं जाण्याइतके पैसे नसल्यानं इराणमार्गे बसनं जायचंय' असा बहाणा करतात. त्यासाठी इराणच्या 'ट्रॅन्झिट व्हिसा'साठी याचना करतात! कल्पना अशी की, इराणमधून जात असताना बसमधून बाहेर उतरायचं, आणि तिथंच राहून नोकरीचा प्रयत्न करायचा. अर्थात त्यांच्या याचनेची इराणच्या वकिलातीला दया आली तर ठीक! अन्यथा ते मोठ्याच अडचणीत सापडतात. शेवटी त्यांची – अन् पर्यायानं भारताची – प्रतिमा बाहेरच्या जगात डागाळू नये म्हणून आपलं मायबाप सरकार त्यांना भारतात परत आणण्याची व्यवस्था करतं!

अशाच लोकांची आपल्या काबूलच्या वकिलातीत अक्षरशः रीघ लागलेली असते. म्हणूनच की काय, आम्ही आठहीजण वकिलातीत शिरलो तेव्हा 'रिपॅट्रिएशन'चीच ही आणखी एक 'केस' असावी, असा बहुतेकांचा समज झाला. पण आम्ही मोटरसायकलवीर आहोत हे कळताच तिथले अधिकारी बेहद्द खूष झाले. 'काबूल टाइम्स'च्या संपादकांशी त्यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधला. 'काबूल टाइम्स'चं आम्हाला तत्काळ आमंत्रण मिळालं.

आपली वकिलात काबूलच्या अगदी हमरस्त्यावर असून तिचं आवार मोठं आहे. वकिलातीवर आपला तिरंगी झेंडा मोठ्या दिमाखानं फडकत होता. बाहेरच्या भिंतीवर भारतीय सांस्कृतिक कार्यक्रमांची क्षणचित्रं जशी लावलेली होती, तसंच नुकत्याच निवडून आलेल्या जनता–सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळाचं अन् 'वझीर–ए–आझम' मोरारजींचं छायाचित्र झळकत होतं. येणारे–जाणारे

मोठ्या कुतूहलानं ते न्याहाळीत होते.

अफगाणी लोकांना भारतीय नेत्यांबद्दल अन् भारताच्या इतिहासाबद्दल तसं प्रेम आहेच. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातले अग्रगण्य नेते नेताजी सुभाषचंद्र बोस हे तर एके काळी काबूल शहरातच वेषान्तर करून रहात होते. या गोष्टीचं स्मरण असल्यानं माझ्या मनातही काबूल शहराविषयी आत्मीयता निर्माण झाली होती.

आज आमचा काबूल शहरातला दुसरा दिवस होता. शुक्रवार असल्यानं शहरातले सगळे व्यवहार बंद होते. तरीही बाजारपेठेतल्या बहुतेक दुकानांची दारं आणि भिंती काचेच्या असल्यानं आत मांडलेल्या किंमती वस्तू आम्ही सहज बघू शकत होतो. मोठेमोठे गालिचे, स्वेटर्स, जर्किन्स, उबदार कोट अन् कशिदाकाम केलेल्या टोप्या वगैरे वस्तू फारच आकर्षक होत्या. दिवसभर फिरल्यानंतर संध्याकाळी श्री. रानडे यांच्या आमंत्रणावरून आम्ही त्यांच्या घरी अल्पोपाहारासाठी गेलो.

घर बैठंच होतं, पण अतिशय सुंदर होतं. सौ. प्रतिभा रानडे यांनी आमचं स्वागत केलं. सौ. रानडे या नियतकालिकांमधे लिहीत असतात. शहात्तरच्या कुठल्याशा दिवाळी-अंकात त्यांचा काबूलविषयीचा लेख वाचल्याचं मला आठवत होतं. अमृता प्रीतम या सुप्रसिद्ध पंजाबी लेखिकेच्या गाजलेल्या कादंबरीचा त्यांनी केलेला स्वैर अनुवाद 'बंद दरवाजा' या नावानं पुस्तकरूपानं प्रसिद्ध झालेला होता. मूळच्या त्या कोल्हापूरच्या असल्या तरी विवाहोत्तर जीवन दिल्लीच्या उच्चभ्रू समाजात व्यतीत केल्यानं साहजिकच त्यांच्या रहाणीत आधुनिकता अन् पश्चिमी ठसा स्पष्ट दिसत होता. परंतु बोलण्याचालण्यात मराठी मनाचा दिलखुलासपणा तेवढाच असल्यानं आमची खूप जुनी ओळख असावी अशा तऱ्हेनं त्या गप्पा मारू लागल्या. फ्रेंच मद्याची चव घेत आम्ही या रानडे कुटुंबात पूर्णपणे मिसळून गेलो. संजीवनं दोनचार गाणी म्हटल्यावर आम्ही सर्वांनीच कोरसमधे गायनाची हौस भागवून घेतली. सौ. रानडे याही उत्कृष्ट गायिका आहेत हे त्यांच्या कन्येनं आमच्या लक्षात आणून दिलं. मग आमच्या आग्रहाखातर त्यांनीही आढेवेढे न घेता दोन उत्कृष्ट गझला मोकळ्या मनानं म्हणून दाखवल्या. रानडे कुटुंबात

व्यतीत केलेली काबूलची ती रम्य सायंकाळ आमच्या स्मरणातून कधीच जाणार नाही.

वास्तविक काबूल शहरात अधिक काळ रहाण्याचा आमचा इरादा नव्हता. एअरपोर्टवर ठेवलेल्या मोटरसायकल्स ताब्यात मिळताच निघायचं, या विचारानं आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळीच आमची कार्नेट्स घेऊन कार्गो विभागात दाखल झालो. दिल्लीच्या 'ऑटोमोबाइल्स असोसिएशन'नं दिलेल्या या कार्नेट्समुळे मोटारसायकल्सवर आयात-कर बसणार नव्हता. मोटरसायकल्सचे ते पासपोर्टच होते म्हणा ना! पण हाय रे दैवा! काबूल कस्टमचा सर्वोच्च अधिकारी ही कार्नेट्स हातातही धरायला तयार होईना! एक तर इंग्रजीच्या नावानं तो भोपळा होता. त्यातून कार्नेट हा प्रकार कशाशी खातात याचीही त्याला कल्पना नसावी "आयात-कर भरा अन् गाड्या घेऊन जा" हा एकच धोशा त्यानं चालू ठेवला. आम्ही अगदी वैतागून गेलो. पण त्याच्यापुढे डोकेफोड करण्यात अर्थ नव्हता



अफगाणी ग्रामस्थांच्या सान्निध्यातील काही क्षण

तेवढ्यात एक तरुण आपला हीरो स्टाइल भांग सावरीत लगबगीनं आमच्या मदतीला धावून आला. त्याचं नाव राजेश. त्याचे आजोबा हिंदुस्तानातले. त्यामुळं मोडकंतोडकं का होईना, पण त्याला हिंदी येत होतं. त्यानं त्या कस्टम-अधिकाऱ्याशी बराच वेळ हुज्जत घातली, अन शेवटी आम्हाला अर्थखात्याच्या अधिकाऱ्यांकडून परवानगी आणण्याचा सल्ला दिला. आम्ही बसनं तडक मंत्रालयाकडे धाव घेतली, आणि अर्थखात्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांची – अर्थमंत्र्यांची – भेट घेतली. सुदैवाने त्यांना इंग्रजी येत होतं. त्यांनी कस्टम-अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. दोघांमधे अक्षरशः गरमागरमी झाली. आयातकर भरल्याशिवाय गाड्या ताब्यात द्यायला कस्टमनं नकार दिला. अर्थमंत्र्यांची प्रतिष्ठा पणास लागली. आमची परिस्थिती मोठी केविलवाणी झाली. अखेरीस अर्थमंत्र्यांनी वैयक्तिक जबाबदारी घेऊन आमच्या गाड्या सोडवण्याचा आदेश कस्टम-खात्याला दिला, तेव्हा कुठं गाड्या आमच्या स्वाधीन करण्यात आल्या. तोपर्यंत दुपारचे चार वाजले होते.

आम्हो गाड्यांवर स्वार होऊन रस्त्याच्या उजव्या बाजूनं सावकाशीनं गाड्या चालवीत प्रथम गेलो ते 'अन्सारी रोड'वरील 'काबूल टाइम्स'च्या कचेरीत. तिथं आमची जवळजवळ अर्धा तास मुलाखत घेतली गेली. त्यानंतर मात्र 'स्टीक हाउस'ला परतताच रमेश, सुधीर, प्रभाकर अन विजय गाड्या प्रवासयोग्य करण्याच्या कामाला लागले. मी आणि अविनाशनं गावात चक्कर मारणंच पसंत केलं. काबूल शहरातला तो शेवटचा दिवस होता. त्यामुळे आम्ही आमचा नवा मित्र राजेश याचं घर शोधून काढलं. काबूलमधे नुकत्याच येऊन गेलेल्या 'बॉबी' फेम ऋषी कपूरबरोबर काढलेला स्वतःचा फोटो त्यानं मोठ्या अभिमानानं दाखवला. एकंदरीत काबूलमधे आपल्याकडचे चित्रपट-नटनटी लोकप्रिय आहेत. त्यातही धर्मेंद्र-हेमामालिनी ही जोडी आघाडीवर. त्यांची चित्रं दुकाना-दुकानात लावलेली!

काबूलपासून सुमारे २०० किलोमीटर्सवर बामयान नावाचं एक प्रेक्षणीय ठिकाण आहे. या ठिकाणच्या डोंगरात गौतम बुद्धाची अती प्रचंड अशी मूर्ती कोरलेली आहे. बुद्धाची एवढी उंच मूर्ती अन्यत्र नाही. इस्लाम-संस्कृतीच्या या

देशात गौतम बुद्धाचा पुतळा ही एक कुतूहलाची बाब वाटते. बौद्धकालीन कलाशास्त्राचं केंद्र असलेली अन् सम्राट अशोकाचा मानबिंदू असलेली तक्षशिला नगरीही आज पाकिस्तानात आहे. या गोष्टीची आठवण मला त्या क्षणी झाल्याखेरीज राहिली नाही. असो.

चौदा जून उजाडला. आमच्या प्रवासाला पुनश्च आरंभ झाला. रस्त्याच्या उजवीकडून गाड्या चालवण्याचा सराव नसल्यानं आम्ही सावकाश चाललो होतो. हिंदुकुश पर्वताच्या रांगा अद्याप संपलेल्या नव्हत्या. समुद्रसपाटीपासून आम्ही बरेच उंचावर होतो. त्यामुळेच की काय, गाड्यांना वेगही येत नव्हता. काही तासांनी गझनी आलं. आम्ही चहापाण्यासाठी उतरलो. ज्या वेड्या महमदाबद्दल गमती प्रसिद्ध आहेत, त्याची कबर रस्त्यालगतच आहे. मुसलमानांच्या इतर मशिदी जशा, तशीच ही एक. खास वैशिष्ट्य असं काही नाही. त्यामुळं चहापाणी करून रणरणत्या उन्हात आम्ही पुढं निघालो. रस्ते उत्तम असले तरी झाडांचा अजिवात पत्ता नव्हता. साधं गवत कुठं दिसत नव्हतं. दुतर्फा डोंगरांच्या रांगा होत्या. मनुष्यवस्तीचा मागमूसही दिसत नव्हता. अगदी क्वचित कुठे उंटावरून जाणारे अफगाणी दिसत, बाकी प्रदेश निर्जनच म्हटला तरी चालेल.

बऱ्याच वेळानं एक अगदी छोटंसं खेडं दृष्टिपथात आलं. त्याचं नाव मुकुर. एका चायखान्याजवळ आम्ही गाड्या थांबवल्या. चायखान्यात जेवण अगदी स्वस्त मिळतं. शिवाय रहाण्यासाठीही तिथंच पथारी पसरता येते. आम्ही भुकेलेले असल्यानं, चवीचा विचार न करता भात आणि मटणावर यथेच्छ ताव मारला. पाकिस्तानातून उत्तम प्रतीचा तांदूळ अफगाणिस्तानात येत असल्यानं भाताचा दर्जा चांगला होता. पण त्यात कसलंतरी उग्र दर्पाचं तूप सढळपणे ओतलेलं होतं. या विचित्र उग्र दर्पानं अगदी थेट तुर्कस्तानपर्यंत आमची पाठ सोडली नाही. मुकुरच्या चायखान्यातलं मटण उंटाचं असावं, पण भुकेपुढे तर्ककुतर्क करण्यात अर्थ नव्हता. मिळेल ते खायला लागणार हे उघडच होतं. मग ते निदान आनंदानं खाल्लेलं काय वाईट? असा विचार करून उंटाचं मांसही आम्ही सशाच्या मांसासारखंच खुसखुशीत समजून चवीनं खाल्लं!

वास्तविक कावूल ते हेरात असा सरळ मार्ग असूनही आम्हाला मात्र कंदाहारमार्गे जाण्याचा सल्ला देण्यात आला होता. त्यामुळे आमचा प्रवास अर्धवर्तुळाकार होणार होता. कावूलच्या दक्षिणेस कंदाहार होतं. तुलनेनं ते पाकिस्तानच्या बरंच जवळ होतं. त्यामुळं जसजसे आम्ही दक्षिणेकडे सरकत होतो, तसतसा अफगाणी लोकांचा गौरवर्ण कमीकमी होत चाललेला आम्हाला दिसत होता.

संध्याकाळ व्हायला आली तरी एकनाथची गाडी काही केल्या वेग घेत नव्हती. सुदैवानं जंड नावाचं, अवघ्या दोन–तीनशे वस्तीचं गाव जवळच होतं. आम्ही या गावातल्या चायखान्यावर गाड्या थांबवल्या. गाड्यांचा आवाज ऐकून पृथ्वीराज कपूरसारखी एक प्रचंड असामी बाहेर आली. आमची अडचण समजताच त्यानं अवघ्या पन्नास अफगाणीत म्हणजे दहा रुपयांत आम्हा आठहीजणांची रहाण्याची सोय तर केलीच; शिवाय आमच्या गाड्यांची राखण करण्यासाठी एका नोकराला अडकवून ठेवलं. जेवताना आमचा थाट. या ठिकाणी चक्क टेबलखुर्चीवर करण्यात आला. भारताचे कंदाहारमधले राजदूत कावूल–कंदाहार प्रवासात याच चायखान्यात मुक्काम करतात असं मला नंतर त्यांच्याकडूनच कळलं. राजदूतांचं जीवन म्हणजे केवळ ऐषाराम आणि कॉकटेल–पार्ट्या, असं समीकरण मानणाऱ्या लोकांच्या माहितीसाठी हे मुद्दाम सांगितलं. या मागासलेल्या देशामधल्या राजदूतांनी त्यांच्या खडतर एकाकी जीवनाची कहाणी अवश्य प्रकाशित करावी.

कंदाहार आता आमच्या टप्प्यात होतं. पण दुपारचे बारा वाजलेले असल्यानं उन्हाची तीव्रता असह्य होत होती. आमची शिरस्त्राणं, जर्किन्स, गाड्या – सारं अगदी तापलं होतं! त्यामुळं कंदाहार शहरात शिरताच आम्ही फक्त पेट्रोल भरण्यापुरत्याच गाड्या पेट्रोलपंपावर वळवल्या. अफगाणिस्तानात पेट्रोल साधारण साडेआठ अफगाणींना एक लिटर – म्हणजे दीड रुपया लिटर या दरानं दिलं जात होतं. उन्ह मी म्हणत असल्यानं गाड्यांवरून उतरण्याचीही आमची इच्छा नव्हती. पण नजर मात्र हॉटेलच्या दिशेनं भिरभिरत होती. तेवढ्यात एका फटफटीवरून दोन अफगाणी इसम माझ्याजवळ आले.

मोडक्यातोडक्या हिंदीत त्यांनी विचारलं, "आप हिंदोस्तानके हैं?" मी म्हटलं, "जी हाँ! बम्बईके!" या माझ्या उत्तरानं अधिकच उल्हसित होऊन त्यांनी जो प्रश्न विचारला, तो ऐकल्यावर आम्ही स्तिमितच झालो! त्यांनी विचारलं, "बम्बई? फिर 'शिवसेना' कैसी है?"

त्याला उत्तर देण्याच्या मूडमधे आम्ही कुणीच नव्हतो. पण मुंबईच्या एका विशिष्ट परिस्थितीत जन्म पावलेल्या या छोट्याशा संघटनेचं नाव अफगाणिस्तानातल्या कंदाहार शहरातल्या माणसाला माहीत असावं या गोष्टीचा अभिमान मात्र मला त्या क्षणी जरूर वाटला. आजच्या शिवसेनेची जर ही कीर्ती, तर मग खुद्द महाप्रतापी शिवाजीमहाराजांनी अन् त्यानंतर संताजी-धनाजींसारख्या मर्द मराठ्यांनी, राघोभरारीसारख्या रणधुरंधरांनी मराठी साम्राज्याचा दबदबा हिंदुस्थानात अन् हिंदुस्थानाबाहेर किती निर्माण केला असला पाहिजे, याची कल्पनाच केलेली बरी! परतीच्या प्रवासात थोडी उसंत मिळणार असल्यानं कंदाहारच्या वास्तव्यात या गोष्टीचा अभ्यास करायचा असं ठरवून आम्ही एक बऱ्यापैकी हॉटेल गाठलं अन जेवण उरकून घेतलं.

कंदाहार हे काबूलच्या खालोखाल अफगाणिस्तानातलं दुसऱ्या क्रमांकाचं गाव. वस्ती लाखाच्या आसपास. अहमदशहा दुर्राणी या राजानं आठव्या शतकात हे शहर नावारूपाला आणलं. त्या वेळी हे राजधानीचं शहर मानलं जायचं. आजही व्यापाराच्या दृष्टीनं या शहराचं महत्त्व कमी नाही. सुका मेवा आणि रसदार डाळिंबं यांचा प्रचंड व्यापार इथून होतो. दोन्ही हातात मावणार नाहीत, एवढी मोठी आणि कमालीची रसाळ डाळिंबं या शहरात अवघ्या वीस पैशात मिळतात. डाळिंबांची निर्यातही इथून केली जाते.

कंदाहारजवळच 'खेर का शरीफ' या ठिकाणी महमद पैगंबराच्या काही वस्तू अनेक वर्षे जतन करून ठेवल्याचं सांगतात. अर्थातच हे आता तीर्थक्षेत्र बनलं आहे. 'जमे-मुई-मुबारक' या ठिकाणी श्रीनगरच्या 'हजरत बाल'प्रमाणेच महंमद पैगंबराचे पवित्र केस सोन्याच्या करंड्यात ठेवले आहेत. ही दोन्ही ठिकाणं इस्लामधर्मीयांची श्रद्धास्थानं झालेली आहेत.

कंदाहारमधे मुक्काम करायचा नसल्यानं, जेवण करून ताजंतवाने होताच आम्ही हेरातच्या दिशेनं गाड्या पिटाळल्या आणि मजल-दरमजल करीत अखेर संध्याकाळच्या सुमारास ठरल्याप्रमाणे दिलाराम गाठलं. मुकुर अथवा जंडपेक्षा दिलाराम वेगळं नव्हतं. रस्त्याच्या दुतर्फा जी काही पाच-पंचवीस घरं होती, तेवढीच! स्त्रिया तर इथं औषधालाही सापडणं कठीण! चायखान्याच्या ओसरीवर अनेक अफगाणी वर्तुळाकार बसून गुडगुडी ओढत होते. आमच्यापैकी दोघा-तिघांनी पुढे होऊन गुडगुडीचे दोनचार झुरके मारले. बस्स! सगळे कसे खूष झाले आमच्यावर!

जेवणानंतर कितीतरी वेळ या गरीब पण धट्ट्याकट्ट्या अफगाणी नागरिकांनी आमच्या संगतीत घालवला. झोपायला आमच्याकडे एअर-बेड्स होते. कलकत्त्याच्या 'डकबॅक' कंपनीनं ते खास भेट म्हणून आम्हाला पाठवले होते. सायकलच्या हवा भरण्याच्या पंपानं आम्ही जेव्हा ते फुगवू लागलो. तेव्हा तर कुतूहल जागृत होऊन सगळा गावच गोळा झाला! तिथल्या स्थानिक पोलिसांनी तर चक्क पंप हातात घेऊन बेड्समधे हवा भरायला सुरुवात केली. सगळ्यांचे बेड्स छान फुगल्यावर आळीपाळीनं त्यावर झोपून पहाण्याची त्यांच्यात जणू स्पर्धाच लागली होती. दृश्य मोठं गमतीदार होतं. झोपलेल्या गलिव्हरला बघायला लिलिपुटचे लोक आले होते ना, तसे आम्हा झोपी जाऊ इच्छिणाऱ्या 'गलिव्हर्स'ना बघायला हे अफगाणी खेडूत मोठ्या कौतुकानं जमले होते.

दिलारामपासून आता उत्तरेकडे हेरात होतं. उन्हाची तीव्रता वाढत होती. एक दिवसाच्या अंतरावर अफगाणिस्तानची हद्द संपणार असल्यानं आम्ही मोठ्या खुषीत गाड्या चालवीत होतो. अधेमधे गाड्या थांबवून विश्रांती घ्यावी म्हटली तरी ते शक्य नव्हतं. कारण सावलीचं असं ठिकाणच कुठं दिसत नव्हतं!

तिसऱ्या प्रहरी आम्ही हेरातजवळ आलो. रस्त्याच्या दुतर्फा सुमारे एक किलोमीटरभर अशोकवृक्ष पद्धतशीरपणे लावलेले होते. वाळवंटात 'ओयासिस' सापडावं तशा आनंदानं आम्ही त्या अशोकवृक्षांच्या शीतल छायेतून जात होतो.

हेरात हे शहरही अफगाणिस्तानातल्या काबूल, कंदाहार, जलालाबाद यांप्रमाणेच एक प्रमुख शहर मानलं जातं. अनेक आक्रमणांनी भुईसपाट झालेली

घरं इथं पुनःपुन्हा उभारण्यात आली आहेत. चौथ्या शतकात अलेक्झांडरनं युद्धात हे शहर पार उद्‌ध्वस्त केलं होतं. पण अर्थात ते जिंकल्यावर त्याचं पुनरुत्थानही त्यानंच केलं होतं. त्यानं बांधलेल्या किल्ल्यांचे अवशेष पंधराशे वर्षं उलटल्यानंतरही आज आपल्याला पहायला मिळतात! या शहरावर झियाउद्दीन घोरीनं सत्ता गाजवली होती. चंगीजखानाचा मुलगा तुली हाही इथला राजा होता. पण त्याच्या अन्यायाविरुद्ध उठाव करून इथल्या जनतेनं त्याचा शिरच्छेदच केला. तुलीच्या वधाची वार्ता कळताच चंगीजखान स्वतः ऐंशी हजार सैन्य घेऊन तुर्कस्तानातून हेरातवर चाल करून आला. तब्बल सहा महिने त्यानं या शहराला वेढा घातला. हेरातमधल्या लोकांची कोंडी झाली. हजारो लोक केवळ अन्नपाण्याविना तडफडून मेले.

आज मात्र हेरात हे एक गजबजलेलं व्यापारी शहर म्हणून नावारूपाला आलं आहे. रंगीबेरंगी गालिचे आणि मनोहर कशिदाकाम यांनी इथला बाजार मोठा चित्तवेधक झाला आहे. वस्ती जवळजवळ लाखाच्या आसपास आहे.

हेरातपासून अवघ्या वीस किलोमीटर्सवर इस्लामकाला हे अफगाणिस्तानच्या सरहद्दीवरचं ठिकाण असल्यानं आम्ही रात्रीच्या मुक्कामासाठी तिथंच राहणं पसंत केलं. पण इस्लामकाला हे गाव असं नव्हतंच! तो एक साधा चौकशी-नाका (चेक पोस्ट) होता. एक सरकारी विश्रामधाम जवळच होतं. तिथला दर भयंकर होता : माणशी पंचाहत्तर अफगाणी! काबूलसारख्या राजधानीच्या ठिकाणीही आम्हाला माणशी पंचवीस अफगाणीपेक्षा जास्त पैसे मोजावे लागले नव्हते. पण, आता आमचा इलाज नव्हता.

इस्लामकालाच्या त्या निर्जन महागड्या विश्रामधामामधे रात्र काढून सकाळीसकाळीच आम्ही सामानसुमानासहित कस्टम-ऑफिसमधे दाखल झालो. सुदैवानं इथलं काम झटपट झालं. हे कस्टम-अधिकारी अगदीच फाटके अन् बावळट होते. बहुधा कुठे कामधंदा मिळत नसेल, तर इथले लोक कस्टम-खात्यात नोकरी बघत असावेत! निदान आमच्या गाड्यांचा तपशील त्यांनी रीतसर आमच्या पासपोर्टसमधे नोंदवला हे फार बरं झालं. त्यामुळे परतीच्या प्रवासात तरी काबूल-एअरपोर्टवरचं नाटक पुन्हा होणार नव्हतं. या

समाधानात ‘तशक्कुर्र–तशक्कुर्र’ म्हणून त्यांचे आभार मानत, अन ‘सुटलो एकदाचे’ या भावनेतच आम्ही अफगाण–सरहद्दीवरून इरण–सरहद्दीकडे धूम निघालो.

⌘ ⌘ ⌘

(३)

## अनपेक्षित पाहुणचार!

प्राचीन काळात पर्शियाचा भाग असलेल्या इराणच्या या सरहद्दीचं नाव 'तायेबाद'.

अफगाणिस्तानच्या इस्लामकाला या दरिद्री प्रकारापेक्षा ही कितीतरी अद्ययावत! प्रवाशांची तोबा गर्दी इथं उसळलेली होती. एखाद्या एस. टी. स्टँडशी मिळतंजुळतं असं चित्र होतं. लोक आपापलं सामान वाटेल तसं जाण्या-येण्याच्या मार्गात टाकून बसलेले होते. नियमानुसार मोटरसायकलींचा तात्कालिक विमा उतरवणं आम्हाला भाग होतं. त्यासाठी सुरुवातीलाच आम्हाला डॉलर्सचं रूपांतर इराणी 'रियाल्स'मधे करून घ्यावं लागलं. विम्यापोटी प्रत्येक गाडीमागे नव्वद रियाल्स – म्हणजेच पर्यायानं दहा भारतीय रुपये – आम्हाला मोजावे लागले. इराण–पोलिसांनी आमच्या पासपोर्टस्‌वर शिक्कामोर्तब केलं. मेडिकल विंगच्या तपासनीसांनी आमची 'हेल्थ–कार्डस्' पाहून आम्ही देवी–कॉलरा यांवरची प्रतिबंधक लस टोचून घेतलेली आहे याची खातरजमा करून घेतली, आणि मग आमच्या सामानाच्या तपासणीचा कंटाळवाणा प्रकार सुरू झाला. व्यवस्थित भरलेलं सामान वाटेल तसं काढूनच तपासायचं असतं, असा एकंदर कस्टमखात्याचा रिवाजच दिसतो! त्यातून इराणमधे अफगाणिस्तानातून हशिश उर्फ चरसाची चोरटी आयात प्रचंड प्रमाणात होत असल्यानं इराणी कस्टम–अधिकारी फारच दक्षतापूर्वक तपासणी करणार याची कल्पना आम्हाला होतीच. लालबुंद वर्णाचे हे अधिकारी त्यांच्या सुरेख फिकट निळ्या रंगाच्या गणवेषात रुबाबदार वाटले. पण त्यांच्या संशयखोर वृत्तीनं आम्ही वैतागून गेलो. आमची प्रत्येक वस्तू त्यांनी बारकाईनं तर तपासलीच; पण गाड्यांचे टायर्स ते कितीतरी वेळ हुंगत होते! अखेर न रहावून एकानं रमेशच्या गाडीची बैठक काढून, टिचक्या वाजवून पाहिली. ही 'सीट' जुन्याची नवी केलेली. साहजिकच

'बदबद' असा आवाज झाला. झालं! हशिशचा बराच माल हाती लागणार या उमेदीनं दोघे अधिकारी कामाला लागले. एक जाडजूड तार त्यांनी पाचसहा वेळा त्या सीटमधून आरपार घालून पाहिली. एवढंच करून ते थांबले नाहीत! 'सीट'चा थोडा भाग चक्क फाडूनही त्यांनी बघितला. पण बिचाऱ्यांची घोर निराशा झाली. अहो, खिशात रेल्वेचा पास असूनही तिकीट-तपासनीस डब्यात चढताच उगीचच कासावीस होणारे आम्ही,- हशिशसारख्या अंमली पदार्थाचं स्मगलिंग कसलं करणार कपाळ? या सगळ्या प्रकारानं हशिशबद्दलचं आमचं कुतूहल मात्र जागं झालं आणि परतीच्या प्रवासात अफगाणिस्तानातल्या वास्तव्यात हशिशचा स्वाद निदान अनुभवापुरता घ्यायचाच, असं मी मनाशी ठाम ठरवून टाकलं!

कस्टम-अधिकाऱ्यांच्या जाचातून मुक्त व्हायला तब्बल तीन तास लागले. रस्त्याच्या दुतर्फा इंग्रजीत लावलेले बोर्डस् आणि चित्रांच्या माध्यमातून प्रवाशांना केलेलं मार्गदर्शन यांवरून पाश्चिमात्यांचा या देशावरचा प्रभाव उघड दिसतो.

'हॉटेल तायेबाद'चा थाट पाहिल्यावर तर एका वैभवसंपन्न देशात आल्याबद्दल आमची खात्रीच पटली. अद्ययावत सोफांची मांडणी, कलापूर्ण झुंबरं, रंगीत तावदानं, आरसे, गालिचे या गोष्टींमुळे रिसेप्शन हॉल मोठा चित्तवेधक झाला होता. टेलिव्हिजन चालू होता; पण बघायला मात्र कुणीच नव्हतं, याची त्यांना खंतही नसावी!

या 'पॉश' हॉटेलच्या 'पॉश' भटारखान्यात शिरकाव करणं तसं आम्हाला कठीण गेलं नाही. 'नान' ऊर्फ चपातीबरोबर कोंबडीचं मटण खाऊन आम्ही इराणी पद्धतीचं जेवण उरकलं. जसं हॉटेल तसं बिल या न्यायानं आम्हाला एक हजार रियाल्स म्हणजे चक्क शंभर रुपये द्यावे लागले. एकाच वेळी एवढं बिल देण्याचा आमचा हा पहिला अन् कदाचित शेवटचा प्रसंग! यानंतर मात्र पदार्थाच्या दराची चौकशी केल्याशिवाय पदार्थ मागवायचा नाही, असा कानाला खडा लावून आम्ही 'हॉटेल तायेबाद'मधून बाहेर पडलो.

त्यानंतर आम्ही गाड्यांमधे भरपूर पेट्रोल भरून घेतलं. पेट्रोलला इथं 'बेंझिन' म्हणतात. अवघ्या आठ रियाल्सला – म्हणजे एक रुपयाला– एक लिटर हा त्या वेळी भाव होता. सुटं ऑइल बंद डब्यापेक्षा खूपच स्वस्त होतं. पेट्रोल भरायचं म्हणजे कमीत कमी पाच लिटर तरी घ्यावंच लागे. तेही भरताना

इराणी माणसं आम्हाला आपादमस्तक 'न्याहाळून' पहायचे. कारण अर्धीमुर्धी टाकी भरणारेही लोक जगात असतात याचं त्यांना आश्चर्य वाटायचं!

आज आम्हाला 'तोरबात्-ए-जाम'ला जायचं होतं. साठ किलोमीटर्सवर असलेल्या या गावी रहाण्यासाठी मध्यम दर्जाचा लॉज मिळेल अशी आमची अपेक्षा होती. त्या दृष्टीनं आम्ही या देशाची नवलाई अवलोकन करीत मध्यम गतीनंच चाललो होतो. रस्ते अती सुंदर होते. एव्हाना उजव्या बाजूनं गाड्या हाकण्याचा चांगलाच सराव आम्हाला झालेला होता. सगळ्यांचा वेग सारखाच ठेवल्यानं एकमेकांमधलं अंतरही कायम सारखंच रहात होतं. एक प्रकारची लय आमच्या प्रवासाला आली होती.

संजीव-सुधीर सगळ्यांच्या पुढे होते. त्यांच्या मागे विजयला पाठीमागं घेऊन मी गाडी चालवीत होतो. इतक्यात अचानक संजीवच्या गाडीचं चाक पंक्चर झालं. गाडी चालवण्याचा त्याला म्हणावा तेवढा सराव नसल्यानं अन् त्यातून गाडी पंक्चर होण्याचा बहुधा पहिलाच प्रसंग असल्यानं त्याला गाडी सावरता आली नाही. ते दोघेही रस्त्यावर फेकले गेले. पाठोपाठ मी होतो. बघतो तर सुधीर-संजीव रस्त्यावर निश्चेष्ट पडले होते! मोठ्या शिताफीनं मी माझी गाडी बाजूला घेतली म्हणून बरं, नाहीतर ती सुधीरच्या हातावरून गेली असती!

आम्ही पटापट खाली उतरलो. संजीवच्या नाकातोंडाला जबर मार लागला होता. सुधीरचं मनगट दुखावलं होतं. दोघेही वेदनांनी विव्हळत होते. पाठोपाठ एक इराणी सद्गृहस्थ मोटारनं येत होते. त्यांनी गाडी थांबवून दोघांना दवाखान्यात न्यायची तयारीही दाखवली. पण आमचं मन त्या गोष्टीला तयार होईना. शंका ही की, न जाणो, दवाखान्यात गेल्यावर पोलिसचौकशीचा ससेमिरा मागे लागायचा!

आमच्याकडे स्टेपनी असल्यानं रमेश-विजयनं संजीवच्या गाडीचं चाक बदललं. तोपर्यंत दोघेही भानावर आले होते. सुधीरला मी पाठीशी घेतलं, अन् संजीवला घेऊन विजयनं त्याची गाडी चालवायला सुरुवात केली.

सगळ्यांच्या मनात कालवाकालव होत होती. असे किती अपघात पुढे होणार होते कुणास ठाऊक! सगळ्यांना त्या एकाच विचारानं ग्रासलं! आम्ही आठहीजण सुखरूपपणे परत जाणार आहोत ना? की आमच्यापैकी कुणीतरी दुर्दैवाचा बळी ठरणार आहे? . . . अन् असं झालं तर? . . .

'तोरबात्-ए-जाम' आलं. आम्ही अधिक चर्चा न करता सोयीचं एक हॉटेल निश्चित करून प्रथम सुधीर-संजीवच्या विश्रांतीची सोय केली. 'तोरबात्' मधलं स्वादिष्ट अन् सुगंधी आइस्क्रीम खाताच त्यांच्या वेदना कुठल्या कुठं पळाल्या! घरच्या मंडळींना उगीच काळजी वाटू नये म्हणून या अपघाताचा उल्लेख कुणीही आपल्या पत्रात करायचा नाही असं ठरवून आणि दुपारच्या जेवणावर शंभर रुपये खर्च केलेले असल्यानं केवळ फलाहारावरच वेळ निभावून आम्ही अंथरुणावर अंग टाकलं.

भरपूर विश्रांती मिळाल्यानं ताजेतवाने होऊन दुसऱ्या दिवशी पहाटेच्या नीरव शांततेतच आम्ही 'तोरबात्' सोडलं.

इराणसारख्या देशात रस्ते इतके सुंदर कसे, या गोष्टीचं कोडं मला पुढं उलगडलं. त्याचं असं आहे की, १९६० साली 'युनो'च्या 'इकनॉमिक कमिशन फॉर एशिया ॲण्ड फॉर ईस्ट' या आयोगातर्फे हा रस्तेबांधणीचा भलामोठा प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. आशियाई देशातल्या प्रमुख औद्योगिक शहरांमधलं, राजधान्यांच्या ठिकाणांमधलं, तसंच महत्त्वाच्या ऐतिहासिक वा पर्यटनाच्या स्थळांमधलं दळणवळण वाढावं आणि ज्यायोगे देशादेशांतले परस्परसामंजस्य, व्यापार यांची वृद्धी व्हावी या हेतूनं इराणपासून थेट व्हिएतनामपर्यंत सलग असा रस्ता बांधण्याची त्यांची योजना आहे. याला 'आशियाई मार्ग' असं नाव दिलेलं असून इराण-तुर्कस्तान-सरहद्दीवरच्या बझारगन या ठिकाणापासून त्याची सुरुवात झाली आहे. हा रस्ता अफगाणिस्तान, पाकिस्तान, भारत, बांगलादेश, ब्रह्मदेश, लाओस, थायलंड, कंबोडिया यामार्गे व्हिएतनामच्या सायगाव या महत्त्वपूर्ण शहराला जाऊन मिळणार आहे. फार उत्तम अशी योजना आहे ही. पण दुर्दैवानं पाकिस्तानच्या

'ट्रान्झिट व्हिसा'चा अडसर जोपर्यंत दूर होत नाही, तोपर्यंत आम्हा भारतीयांना याचा पुरेपूर उपयोग करून घेणं शक्य नाही. परकीय लोक मात्र आजही या रस्त्यानं अगदी थेट युरोपपासून भारतापर्यंत 'बस'नंसुद्धा अवघ्या दोनशे पन्नास डॉलर्समधे प्रवास करून याचा लाभ घेतात. आपल्या परराष्ट्रखात्यानंही या गोष्टीचा पाठपुरावा करून पाकिस्तान–सरकारला ट्रान्झिट व्हिसा द्यायला भाग पाडलं, तर शेकडो – नव्हे, हजारो भारतीय प्रवासी युरोपकडे झेपावती.

'फरायमान' आलं तसे आम्ही चहापानासाठी उतरलो. इथला चहाच विनदुधाचा! साखरेच्या वड्या तोंडात ठेवायच्या; आणि वरून कडवट चहाचे घोट घ्यायचे! चहाच्या ग्लासात साखर टाकणं म्हणजे सल्फ्युरिक ॲसिडमध्ये पाणी टाकण्याइतकं मूर्खपणाचं आणि अशास्त्रीय!

फरायमान गावाच्या सुरुवातीलाच अती सुंदर अशी कमान होती. मध्यभागी सोनेरी रंगाचे सिंहांचे भव्य पुतळे होते. बाजूला रंगीबेरंगी झाडं मोठ्या कलात्मक पद्धतीनं लावलेली होती. इराणमधल्या बहुतेक सगळ्याच गावांच्या सुरुवातीला अशा कमानी असतात. या कमानी आणि त्याभोवतालच्या रमणीय बागा बघूनच इराणी लोकांच्या रसिकपणाची कल्पना येते.


आमच्या गाड्यांनी गती घेतली. थोड्याच वेळात 'मशाद'चा औद्योगिक परिसर दिसू लागला. रस्त्यावर सतत वाहतूक होती. वाहनं तुफान वेगानं जात होती. जणू जिवाची पर्वा कुणाला नव्हतीच!

मशाद हे इस्लामधर्मीयांचं पवित्र स्थान. आठव्या इमाम रेझानं बांधलेली नवव्या शतकातली मशीद इथंच आहे. मक्का–मदिनाच्या खालोखाल मशादला महत्त्व आहे. दर वर्षी चार लाख यात्रेकरू इथं येतात असा सरकारी अंदाज आहे. मुसाफिरखाने, दुकाने, पंचतारांकित हॉटेल्स यांनी शहर गजबजलेलं आहे.

मशाद शहराच्या परिसराला 'खोरासन' म्हणतात. 'खोरासन' म्हणजे उगवत्या सूर्याचा प्रदेश! इराणी लोक सूर्याला देवता मानतात. ते स्वतःला आर्यवंशीय समजतात. त्यांचं कॅलेंडरही सूर्यमासावर आधारलेलं. त्याला 'जलाली' म्हणतात. वर्षाचे महिने बारा. पण वर्ष सुरू होते २१ मार्चला. पहिले सहा महिने ३१ दिवसांचे; पुढचे पाच महिने ३० दिवसांचे; शेवटचा महिना २९ दिवसांचा.

लीप–वर्षात फक्त शेवटचा महिना ३० दिवसांचा. इथलं कॅलेंडर सूर्यमासावर आधारित; पण धार्मिक गोष्टी मात्र चांद्रमासावर ठरतात. या लोकांची भाषा पर्शियन. एक ते दहा आकड्यांना इथे 'येक, दो, से, छार्, पाँज, शिश, हाफ्त, हाश्त, नोह, ड्यांना' असं म्हणतात. म्हणजे आपल्याकडच्या हिंदी, सिंधी, मऱ्हाटी अन् संस्कृत यांचा हा संगमच म्हणायला पाहिजे!

मशादच्या एका पंपावर आम्ही 'बेंझिन' घ्यायला थांबलो. पाचपन्नास इराणी विद्यार्थ्यांचा घोळका आमच्याभोवती क्षणार्धात जमा झाला. भारताविषयी त्यांना मोठं कुतूहल! त्यांनी त्यांच्या भाषेत प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. तर्कानं आशय जाणून आम्ही उत्तरं देत होतो. इंग्रजीबरोबर चक्क मराठीतही! त्या बिचाऱ्यांना दोन्हीही भाषा सारख्याच 'सुबोध' होत्या! आमच्याशी बोलण्याच्या



'मशाद'मधील हजार वर्ष पुरातन मशीद
इराणी लोकांचे पवित्र धर्मस्थान

नादात एका इराणी विद्यार्थ्यानं त्या गर्दीतल्या एका इराणी पोलिसाच्या खांद्यावर हात टाकला, – आणि काय सांगू? आधीच लालबुंद असलेला तो पोलिस रागानं अधिकच लाल झाला. क्षणाचाही विलंब न करता त्यानं खाडदिशी त्या विद्यार्थ्याच्या श्रीमुखात भडकावली. रंगाचा बेरंग झाला. आम्हाला कसंसंच झालं. पण पोलिस मोठ्या अदवीनं पुढं आला आणि आम्हाला समजावून सांगू लागला "सरकारी अधिकाऱ्याच्या खांद्यावर हात टाकून त्या विद्यार्थ्यानं सामान्य शिष्टाचाराचा भंग केला. मग त्याला शिक्षा नको का करायला?" – बापरे! या गोष्टीला ही शिक्षा; मग चोरी करणाऱ्याचं काय? त्याचे तर हातच तोडतात म्हणे! इराणी पोलिस गुन्हेगाराला दयामाया बिलकुल दाखवीत नाहीत. शिक्षा अशी जबरदस्त, की गुन्हेगार पुन्हा गुन्हा करायला असमर्थच ठरावा! आमच्याकडे चोरी करणारा प्रथम दंडाची रक्कम बाजूलाच काढून ठेवतो; अन् दहावीस रुपये खिशात असणारा विनातिकिट प्रवासं करायला अजिबात बिचकत नाही. आणि लाखांचे कर चुकवणारे तर एकदम 'निर्धास्त' असतात ही वस्तुस्थिती आहे!

मशादचं ओझरतं दर्शन घेऊन आम्ही पुढे निघालो. मशादजवळच्या 'नैशांबूर' या गावात जगप्रसिद्ध रुबायतकर्ता उमर खय्याम याची समाधी आहे. मदिरा आणि मदिराक्षी यांचा उपभोग घेत, शब्दांच्या सुरईतून शृंगारयुक्त काव्यरसाचे चषक ज्यानं भरभरून रसिकांना दिले, त्या विश्वविख्यात उमर खय्यामचं विश्रांतिस्थान इराण होतं याची कल्पना स्वतःला साहित्यप्रेमी म्हणवणाऱ्या मलाही तोवर मुळीच नव्हती; मग इतरांची काय कथा! मात्र त्याची समाधी त्याच्या काव्यासारखी सुंदर नसणार याबद्दल आम्हाला खात्री होती. त्यातून गणिती आणि खगोलशास्त्रज्ञ म्हणून त्याची ख्याती इथं अधिक. त्यामुळं त्याची समाधी म्हणून आत काहीही नसलेली केवळ एक मशीद पहावी लागेल, या विचारानं आम्ही पुढच्या प्रवासाला सुरुवात केली.

रस्त्याच्या दुतर्फा शेतं होती. ऑइल इंजिन्सच्या साहाय्यानं मोठमोठ्या पाइप्समधून त्यांना पाणी पुरवलं जात होतं. जागोजागी गर्द झाडीत पार्किंगची खास सोय केलेली होती. पिकनिकसाठी आलेले अनेक इराणी स्त्री–पुरुष–मुलं स्वैंपाक करण्यात, पिकनिकची मौज लुटण्यात दंग होती. इराणी स्त्रिया बुरख्यात तर नव्हत्याच नव्हत्या; पण कित्येकजणींनी जीन्स–शर्टसूही घातलेले

दिसत होते.

इराणी लोकांना एकंदरीतच पिकनिक्सची आवड दिसते. सुट्टीच्या दिवशी सगळ्या कुटुंबाला मोटारनं घेऊन निघावं, रस्त्यालगत गर्द झाडी नि पाण्याची सोय दिसली की खुशाल तिथंच सतरंज्या पसराव्यात, आणि बरोबर आणलेले हातभर लांब नान ऊर्फ चपात्या टरबुजाच्या गराबरोबर खाव्यात, सुट्टी मजेत घालवावी हा यांचा कार्यक्रम. दररोजच्या जेवणासाठी लागणारे नानही सगळ्यांना बेकरीमधून आणावे लागतात. त्यांमुळं रोज सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी ठराविक वेळी गरमागरम नान विकत घेण्यासाठी बेकऱ्यांपुढं लोकांची झुंबड उडते. मोठेमोठे श्रीमंत लोकही मोटारनं येऊन नानची खरेदी करीत असतात. हे नान रस्त्यानं मिरवीत नेण्यातही कुणाला लाज वाटत नाही. एका नानला साधारणपणे एक रुपया पडतो, आणि तुलनेनं तो चार चपात्यांइतका असतो. तशा खरोखरीच्या चपात्याही काही बेकऱ्यांमधे मिळतात. एकंदरीत घरी चपात्या करण्याच्या कंटाळवाण्या प्रकारातून इथला स्त्रीसमाज पूर्णपणे मुक्त दिसतोय! सकाळच्या न्याहरीसाठी गुलकंद आणि लोण्याबरोबर गरमागरम नान खायला फारच रुचकर लागतात. उपाहारगृहांतूनही सकाळच्या वेळी 'छरे–मुरब्बा–नान' हाच 'स्टँडर्ड ब्रेकफास्ट' दिला जातो. त्याला साधारणपणे तीन–साडेतीन रुपये पडतात.

दुपार झाल्यानं आम्हीही गावातून नान विकत आणले, आणि रम्य अशा झाडीत बसून त्या इराणी चपात्या, मुंबईपासून संभाळून आणलेल्या लोणच्याबरोबर फस्त केल्या. खरोखर चटणी–लोणचं यांची लज्जतच निराळी! या वस्तूंचा भरपूर साठा बरोबर असला की जगाच्या पाठीवर कुठंही अडत नाही. शिवाय अगदी कमी खर्चात मनमुराद समाधान मिळतं ते वेगळंच!

आम्ही ज्या ठिकाणी बसलो होतो त्या शेतात पाटाचं पाणी वाहत होतं. ते दिसायला स्वच्छ होतं इतकंच. पण पाणी कसलं ते? चक्क रॉकेल होतं! रॉकेलचा वास, रॉकेलचीच चव! हे पाणी पिणं म्हणजे कठीण काम होतं. इराणमधे नैसर्गिक झऱ्याच्या पाण्यालाही जिथं रॉकेलची चव लागते, तिथं मुद्दाम पंपानं उपसलेल्या पाण्याच्या चवीविषयी काय सांगावं? इथं तर म्हणे शेतात विहीर खणायची असली तरी शेतकऱ्याला सरकारची खास परवानगी मिळवावी लागते. कारण पाण्यासाठी विहीर खणावी तर तेलाच्या साठ्याचा शोध लागतो!

इराणमधे अशा तेलविहिरी अनेक आहेत. या नैसर्गिक संपत्तीमुळे या देशानं हेवा वाटावा असं वैभव प्राप्त केलं आहे. सोन्यापेक्षाही अधिक महत्त्व असलेल्या पेट्रोलच्या प्रचंड साठ्यामुळे इथं हजारात एक माणूस लक्षाधीश आहे. आता मात्र पेट्रोलचे हे साठे लवकरच संपणार असल्याची जाणीव त्यांना होऊ लागली आहे. या भीतीनं संपूर्ण इराणलाच ग्रासलेलं दिसतंय. असो. हे रॉकेलयुक्त पाणीच अखेर प्राशन करून आणि थोडीशी वामकुक्षी करून आम्ही उन्हाची तीव्रता कमी होताच बोजनुर्द या गावाकडे निघालो.

आता उन्हाचा नसला तरी वाऱ्याचा त्रास फारच वाटू लागला होता. या झंझावाती वाऱ्यामुळं मोटरसायकली अक्षरशः तिरक्या अवस्थेत चालत होत्या. कोणत्याही क्षणी आम्ही रस्त्याच्या कडेला फेकले जाणं शक्य होतं. त्यातून बाजूनं मोठमोठे ट्रक्स जात होते. एकेक ट्रक म्हणजे आपल्याकडच्या मालगाडीचे दोन डबेच. या ट्रक्सना आंतरराष्ट्रीय परमिट (TIR) असतं. दीडदीडशे किलोमीटर्स वेगानं जाणारे हे ट्रक्स अतिशय शिस्तबद्ध पद्धतीनं चाललेले होते. कुणीही वाटेल तसे ब्रेक्स लावत नव्हते. ड्रायव्हर्सच्या दोन्ही बाजूंना खूप मोठे आरसे होते. पाठीमागून येणारी वाहनं दुरूनही दिसावीत अशा रीतीनं ते लावलेले होते. शिवाय गाड्यांचे सगळे सिग्नल्स आणि लाइटस् व्यवस्थितपणे चालू होते. यामुळं या ट्रक्सच्या वाहतुकीची तशी भीती वाटत नव्हती. इराणमधल्या या राजमार्गावर पोलिसांची वाहती पथकं सारखी गस्त घालीत होती आणि लाउडस्पीकर्सवरून इराणी भाषेत सूचना देत होती.

बोजनुर्द शहर आता फक्त तासाभराच्या अंतरावर राहिलं होतं. एक टेलिफोन-बूथ दिसताच मी खाली उतरलो आणि बोजनुर्दच्या 'लायन्स क्लब'चे अध्यक्ष डॉ. शाडलू यांना फोन लावला. डॉक्टरसाहेब माझ्या इंग्रजी शब्दांनी पार गोंधळून गेले. पण मी मुंबईहून आलोय हे त्यांना कळलं. मी आधीच पत्र पाठवलेलं होतं. डॉक्टरसाहेबांना आम्ही येतोय हे अखेर टेलिफोन-केंद्रावरच्या माणसाच्या मदतीनं मी कळवताच त्यांची गडबड उडाली. पण त्यांना खूपच आनंद झालाय हे त्यानं आम्हाला सांगितल्यामुळं मोठ्या उत्साहानं आम्ही बोजनुर्दकडे निघालो.

बोजनुर्दच्या अलीकडे अवघ्या पाचसहा किलोमीटर्सवर एका रमणीय कॅम्पिंग साइटच्या प्रवेशद्वाराजवळ एक अती सुंदर तरुणी अद्ययावत पश्चिमी



इराणी शिल्पकलेतून साकार पर्शियन योद्धा

पोषाखात उभी होती. आमच्या गाड्या दिसताच ती हात उंचावीत समोर येऊन उभी ठाकली! मी गोंधळलो. अशा तऱ्हेची अनुभूती परदेशात प्रथमच येत होती. मी गाडीचा वेग वाढवला अन थेट बोजनुर्द गावात शिरलो. डॉ. शाडलूंचा दवाखाना शोधणं कठीण गेलं नाही. डॉक्टरसाहेब स्त्रीरोगतज्ज्ञ असावेत. कारण स्त्रियांची गर्दी बरीच होती. दवाखाना फार सुंदर अन् प्रशस्त होता. श्वेतवस्त्रातल्या एका सुंदर इराणी तरुणीनं माझं स्वागत केलं, अन् मोठ्या अदबीनं मला डॉक्टरांच्या केबिनमधे नेलं. सुधीर बरोबर होताच. डॉक्टरांचं हे केबिन म्हणजे भलामोठा दिवाणखानाच होता. अत्युत्कृष्ट फर्निचर, ड्रेसिंग टेबल, खिडक्यांना लावलेले उंची पडदे ... सगळा थाट 'ओबेराय–शेरॅटन'च्या रिसेप्शन रूमसारखा! डॉक्टरांची प्रॅक्टिस जबरदस्त होती, हे उघड होतं.

डॉक्टर शाडलूंनी अत्यानंदानं दोन्ही हात धरून माझं स्वागत केलं. बिचाऱ्यांना इंग्रजीचा एकही शब्द येत नसल्यानं केवळ हातवारे करून त्यांचा आनंद ते व्यक्त करीत होते. त्यांच्या हृदयाची भाषा आम्हाला कळत होती. मात्र इराणसारख्या देशातल्या ख्यातनाम डॉक्टर्सना इंग्रजी भाषा अजिबात येऊ नये याचं आम्हाला आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलं नाही. पण पुढं अनुभवानं कळून चुकलं की इंग्रजीला इकडे तसं स्थान नाही. इंग्रजीशिवाय आपला राज्यकारभार चालू शकणार नाही आणि जगातल्या ज्ञानाला आपण वंचित होऊ, ही आपली सपशेल भ्रामक समजूत आहे.

डॉ. शाडलूंनी तत्काळ चहा मागवला. आम्ही दोघेच होतो. मग पाचसहा ग्लास कशासाठी? आम्ही निमूटपणे चहा पिऊन ग्लास खाली ठेवतो तोच डॉक्टरांनी आणखी दोन ग्लासेस पुढं केले. पाहुणचाराची ही इराणी पद्धत होती तर!

सुधीरच्या हालचालीवरून त्याचा हात दुखावलाय हे त्या चाणाक्ष डॉक्टरांच्या नजरेतून सुटलं नाही. ते आस्थेनं जवळ आले आणि त्यांनी तपासणी करून चारपाच औषधं, मलम ताबडतोब मागवून आणली. नंतर संजीवच्या जखमांवरही या डॉक्टरांनी उपचार केले. 'लायन्स क्लब'च्या या अध्यक्षाकडून आम्हाला असं अनपेक्षितपणे सेवाभावी वृत्तीचं दर्शन घडलं. परदेशातही अशा प्रकारची आपुलकी बघून आम्ही भारावून गेलो.

आमचा चहा पिऊन होतोय तोच एक उमदे, मध्यमवयीन पण चटपटीत

असे गृहस्थ लगबगीनं अन् सस्मित मुद्रेनं आत शिरले. त्यांचंही नाव शाडलूच! ते 'लायन्स क्लब'चे सभासद तर होतेच; पण इथल्या पर्यटनखात्याचे उच्चाधिकारीही होते. त्यांना फर्ड इंग्रजी येत होतं. आम्ही येणार हे कळताच डॉक्टरांनी त्यांना मुद्दाम बोलावून घेतलं होतं. त्यांनीही हर्षभरानं आपल्या मुलीला मोटार घेऊन आमच्या स्वागतासाठी शहराच्या वेशीवर पाठवलं होतं. म्हणजे कॅंपिंग साइटवर उंच हात करून आम्हाला बोलवणारी ती सुंदर युवती अन्य कुणी नसून या शाडलूमहाराजांची सुकन्याच होती तर! अरेरे, या सुंदर युवतीच्या स्वागताकडे चक्क पाठ फिरवून आम्ही शहरात शिरलो ना! हा हन्त हन्त नलिनीं गजमुज्जहार!

डॉक्टरांचा निरोप घेऊन आम्ही या दुसऱ्या शाडलूमहोदयांबरोबर पुन्हा मागे कॅंपिंग साइटवर गेलो. बाकीचे सहकारी एव्हाना आम्हाला येऊन मिळाले होतेच, श्री. शाडलू अतिशय बोलके गृहस्थ होते. त्यांनी आम्हाला प्रथम कॅंपिंग साइटमधून फेरफटका करून आणलं. मग संभाषणाच्या ओघात, इराण-सरकार पर्यटकांसाठी कशा सोयी करीत आहे याची कल्पना दिली. आम्ही दमलेभागलो असल्यानं शाडलूंनी थंडगार 'पेप्सीकोला' मागवला. दिल्लीला 'पालम'कडे जाताना प्यालेलं 'मशिनका ठंडा पानी' हे आमचं शेवटचं शीतपेय! त्यानंतर आज आम्ही इराणमधे 'पेप्सी' पीत होतो. 'कोकाकोला' आणि 'पेप्सीकोला' ही इथली लोकप्रिय शीतपेयं आहेत.

कॅंपिंगचा परिसर खास परिश्रम करून तयार केलेला दिसत होता. रंगीबेरंगी फुलझाडं, विश्रांतीसाठी प्लॅटफॉर्म्स, पार्किंगची सोय, कायम वाहात राहणारे झरे, उंच उडणारे कारंजं, छोट्या पर्णकुटी यामुळे हे कॅंपिंग साइट आम्हाला फारच आवडलं. पण शाडलूंनी आमची रहाण्याची सोय गावातल्या पंचतारांकित हॉटेलमधे अगोदरच करून ठेवली होती. आम्ही दिवसभराच्या प्रवासानं थकलेले असल्यानं 'लायन्स क्लब'च्या सौजन्यानं मिळणाऱ्या या 'हॉटेल इझादी'चा लाभ घेणंच पसंत केलं.

'हॉटेल इझादी'मधल्या खोल्यांचा ताबा मिळताच आम्ही गरमागरम पाण्यानं अंघोळी उरकल्या. तोपर्यंत हॉटेलच्या डिनरहॉलमधे जेवणाची तयारी झाली होती. बोजनुर्दचे प्रमुख लायन्स आले होते. गोमांस भारतीयांना वर्ज्य असतं

याची त्यांना कल्पना होती. पण प्रभाकर–एकनाथ मांसाहाराशिवाय कसे राहू शकतात हे कोडं मात्र त्यांना उलगडत नव्हतं. आमच्यासाठी खास 'चिकन–कवाब' बनवले होते. ते भाताबरोबर खायचे. याला इथं 'छेलोकबाब' म्हणतात. जेवताना 'पेप्सीकोला', 'कोकाकोला' यांची रेलचेल असते. पाणी पिण्याची पद्धतच नाही. गरीब, श्रीमंत सगळेच पाण्याऐवजी 'पेप्सी' पितात. मद्यपानाला बंदी असल्यानं मद्यप्राशन करणारं कुणीही नव्हतं.

'लायन्स क्लब'च्या प्रथेनुसार मी आमच्या अंबरनाथच्या 'लायन्स क्लब'चा झेंडा 'बोजनुर्द लायन्स क्लब'चे अध्यक्ष डॉक्टर अमोनोल्लाह शाडलू यांना भेट दिला, आणि छोटंसं भाषण करून इराणी लोकांविषयीचा आमचा स्नेहभाव व्यक्त केला. दुसऱ्या दिवशी निघण्यापूर्वी डॉ. शाडलू आणि श्री. शाडलू यांचे आभार कसे मानावेत तेच आम्हाला कळेना. शेवटी आमच्या प्रेमाचं प्रतीक म्हणून दिल्लीहून खास नेलेले भारतीय बनावटीचे नेकटाय जेव्हा आम्ही त्यांना भेट दिले, तेव्हा तर बिचाऱ्यांना गहिवरूनच आलं. अवघ्या एका तासाच्या पूर्वसूचनेनं त्यांनी केलेला पाहुणचार अप्रतिम होता, अविस्मरणीय होता. भाषेच्या अडचणींमुळे अस्वस्थ झालेले पण खूपखूप बोलण्याची जबरदस्त इच्छा आपल्या नजरेनं व्यक्त करणारे तेजस्वी, रुबाबदार पण देवमाणसासारखे वाटणारे डॉक्टर अमोनोल्लाह शाडलू आजही माझ्या मनःचक्षूंसमोर उभे रहातात; अन् असं वाटतं की, पर्शियन भाषा आपणच शिकून घ्यावी आणि पुन्हा एकदा डॉ. शाडलूंना भेटून त्या दिवसाच्या मूक आणि निःशब्द भावनांना आविष्काराची वाट खुली करून द्यावी.

शाडलूंच्या सल्ल्यानुसार आम्ही पुढचा प्रवास कास्पियन समुद्राच्या किनाऱ्याकिनाऱ्यानं करायचा असं ठरवलं. इराणच्या दक्षिणेला पसरलेला 'पर्शियन गल्फ' जेवढा मोठा, तेवढा कास्पियन समुद्र मोठा नाही. पण कास्पियन समुद्राची रमणीयता आगळीच. त्याच्या तिन्ही बाजूंचा किनारा रशियाचा. फक्त दक्षिणेकडचा किनारा इराणचा. किनारपट्टी आपल्याकडच्या मुरुड–जंजिरा–गोव्यासारखीच पर्यटकांनी फुललेली. त्या मानानं इराणची पर्शियन समुद्रावरची दक्षिण–किनारपट्टी भिकार. नाही म्हणायला बंदर अब्बास, खोरमशार यांसारखी व्यापारी बंदरं आहेत, इतकंच.

बोजनुर्दच्या पुढं वाटेत 'गोन्बाद–ए–काबूस' या ठिकाणी नऊशे

वर्षांपूर्वीचा विटांनी बांधलेला उंच मनोरा पहायला मिळतो. याचा आकार टोकदार पेन्सिलीसारखा आहे. पण त्या मानानं आपल्याकडच्या म्हातारीच्या बुटाची नवलाईच अधिक म्हणायला हरकत नाही.

रात्रीचा मुक्काम शहापसंद या गावी करून आम्ही 'सारी'कडे निघालो होतो. या ठिकाणच्या 'लायन्स क्लब'चंही आम्हाला आमंत्रण होतं. त्यामुळं 'सारी'मधेही बोजनुर्दसारखाच विनपैशात मुक्काम होणार याबद्दल मला खात्री होती. पण परदेशात जाताना कोणतीही गोष्ट गृहीत धरून चालत नाही. तथापि अनपेक्षितपणे पाहुणचाराचा लाभही मिळू शकतो, याचा गोड अनुभव मात्र मला त्या वेळी आला.

त्याचं असं झालं : सारीच्या मार्गावर बेशाहर नावाचं गाव होतं. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांकडे नजर टाकीत मी चाललो होतो. सुधीर माझ्या मागे बसला होता. बाकीचे सहकारी बरेच मागे पडले होते. त्यामुळे एक टेलिफोन-केंद्र दिसताच मी खाली उतरलो - सारीच्या 'लायन्स क्लब'ला आमचं आगमन कळवावं या हेतूनं! पण इथंही अफगाणिस्तानप्रमाणे 'डिरेक्टरी' नव्हती! मी बुचकळ्यात पडलो.

तेवढ्यात आम्ही हिंदुस्थानी आहोत हे बघून जमलेली मुलं 'डोक्तोरऽ- हिंदुस्थान डोक्तोरऽ' असं हेल काढून विचारू लागली. त्यांना वाटलं, मी कुणी हिंदुस्थानी डॉक्टरांपैकीच असावा. मी उगाचच होकारार्थी मान हलवली. त्यावरोबर त्यांच्यातल्या एकानं चक्क माझा हात धरून मला काही यार्डांवरच्या एका घरासमोर नेऊन उभं केलं. दारावरची पाटी बघताच माझा आनंद गगनात मावेना. मी डॉक्टर सिंग नावाच्या एका भारतीय डॉक्टरच्या निवासस्थानी आलो होतो. दरवाज्यावरची घंटा मी वाजवताच त्याला लावलेल्या मायक्रोफोनमधून मंजुळ आवाजात पर्शियन शब्द ऐकू आले. मला काहीच अर्थबोध होणं शक्य नव्हतं. पण मी चक्क हिंदीमधे उत्तर दिलं. घरातल्या व्यक्तीनं वरच्या मजल्यावरून बसल्याबसल्याच कळ दाबून दरवाजा उघडला. मी आत गेलो.

सौ. सिंग यांनी सुहास्यवदनानं माझं स्वागत केलं. माझी ओळख मीच करून दिल्यावर त्या मनमोकळेपणानं गप्पा मारू लागल्या. त्यांनी दिलेल्या 'आइस्क्रीम जेली'चा आस्वाद घेत असतानाच डॉक्टर सिंग आले, आणि मला बघून बेहद्द

खूष झाले. त्यांचं दुपारचं जेवण व्हायचं होतं. मीही त्यांच्यावरोबर जेवलंच पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला. त्यांचं मन मला मोडवेना. सुधीर टेलिफोन केंद्रावर थांवला होता. त्यालाही मी बोलावून घेतलं. त्याला तरी आपल्यासमोर 'काय वाढून ठेवलंय' याची कुठं कल्पना होती? सिंग-दांपत्यानं फारच आपुलकीनं आमचं आदरातिथ्य केलं. श्री. सिंग विहारकडचे, तर सौ. सिंग ओरिसाच्या होत्या. फ्लॉवर-मटारची खमंग भाजी खुसखुशीत पराठ्यांवरोवर जेवून आम्ही तृप्तीचा ढेकर देत सिंग-दांपत्याला मनातल्या मनात दुवा दिला, आणि परतीच्या प्रवासात न विसरता सर्वांनी त्यांच्याकडेच मुक्काम करायचा असं ठरवून पुढे निघालो.

इतर बिचारे सहाजण तसेच उपाशीपोटी पुढं गेले होते. त्यांना आमच्या सुग्रास जेवणाची हकीकत सांगणं कठीणच होतं. पण म्हणतात ना, 'दानेदानेपर लिखा है खानेवाले का नाम!' या उक्तीनुसार वेशाहर या अनोख्या गावात आम्हा दोघांचंच जेवण घडण्याचा दैवी संकेत होता, त्याला कोण काय करणार?

'सारी' शहराच्या वेशीवर सगळेजण थांवले, आणि मी विजयला घेऊन तिथल्या 'लायन्स क्लब'च्या अध्यक्षांना - डॉ. सईद वोझोर्ग पोरसीरस यांना- शोधायला निघालो. सारं शहर आम्ही पालथं घातलं, प्रमुख डॉक्टर्सना फोन केले, पोस्टऑफिसात चौकशी केली, विमारेस्तान ऊर्फ इस्पितळातही प्रत्यक्ष जाऊन वघितलं; पण या नावाचे कुणी डॉक्टरच तिथं नव्हते! जंग जंग पछाडलं तरी लायन्स क्लवच्या कुणा इतर सभासदाचाही शोध लागेना. अखेर सारीच्या पाहुणचाराची स्वप्नं रंगवीत असलेले आम्ही हताश आणि निराश होऊन तसेच पुढं निघालो.

कास्पियन समुद्राच्या गर्द निळ्या लाटांचं लयवद्ध नृत्य निरखीत, किनारपट्टीच्या अमोल-वावोलसारख्या छोट्याछोट्या गावांतून आम्ही चाललो होतो. आपल्याकडच्या मुरुडजंजिरा किंवा रेवदंड्याच्या रस्त्यावरून जात असल्याचा भास सारखा होत होता. जत्रेचा मोसम होता. खेळण्यांची, रंगीत वस्तूंची, फुग्यांची, पिपाण्यांची दुकानं रस्त्याच्या दुतर्फा उभारलेली होती. लोकही मौजमजा करायला बाहेर पडलेले होते. फरक एवढाच की, समुद्राच्या लाटांच्या

आवाजाला जोड देणारी आणि धुंदफुंद करणारी कोळीगीतं कुठं लाउडस्पीकर्सवरून ऐकू येत नव्हती!

महमुदाबाद आलं, आणि रात्र बरीच झाल्यानं याच ठिकाणी रहावं असा विचार निश्चित झाला. समुद्राच्या किनाऱ्यालाच लागून चहू बाजूंनी बंदिस्त असं कार-पार्किंगसाठी एक विस्तीर्ण पटांगण होतं. त्याच ठिकाणी लाटांचं पार्श्वसंगीत ऐकत-ऐकत, चांदण्यांच्या धवलशीतल प्रकाशात आम्ही धरतीच्या मांडीवर विसावलो.

⌘ ⌘ ⌘

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
वा. क्र. ५८६५
२८७०८

४

# 'छेलो कबाब' आणि जलप्राशन

बावीस जून उजाडला. मुंबई सोडल्याला आज बरोबर एक महिना होत होता.

आज आम्ही इराणची राजधानी तेहरान गाठणार होतो. लांबच लांब आणि अती भयंकर अशा घाटामधून आम्हाला जायचं होतं. पंचवीस–तीस किलोमीटर्सचा हा घाट होता. त्याशिवाय वाटेत लागणारे चढउतार निराळे! आमच्या बाजूनं मोठमोठे ट्रक्स घोंघावत जायचे. त्यांच्या आवाजानं कानठळ्या बसत. बोगद्यांमधल्या वेड्यावाकड्या वळणांवर आमची कसोटीच लागायची. समोरून येणाऱ्या गाड्यांच्या प्रकाशझोतानं डोळे दिपून जायचे. खोलखोल दऱ्या पाहिल्या की अंगावर शहारे उभे रहायचे. एवढा लांबच लांब, दुर्गम घाट अन्यत्र क्वचितच असेल!

आम्ही आता खूपच उंचावर आलो होतो. दूर शिखरांवरचं बर्फ आम्हाला स्पष्ट दिसू लागलं होतं. म्हणजे चढ संपत आला होता तर. काही अंतर पार केल्यावर तेहरानचा औद्योगिक परिसर सुरू झाला. 'फिलिप्स', 'फायझर' यांसारख्या परिचित नावांचे फलक दिसू लागले. तासाभरानं आम्ही इराणच्या या राजधानीत प्रवेश करते झालो.

नेहमीच्या रिवाजाप्रमाणे शहराच्या वेशीवरच, झाडांची शीतल छाया बघून आम्ही उतरलो. तेहरानमधे 'टाटा कंपनी' तर्फे आलेले ठाण्याचे श्री. खंडकर हे रमेशच्या परिचयाचे होते. पण त्यांचा पत्ता त्याला ऐन वेळी शोधूनही सापडेना. मीही माझं सगळं सामान, वह्या, फाइल्स चाचपल्या. पण व्यर्थ! आम्हाला तर काहीही करून खंडकर भेटायला हवे होते. त्यांच्याशिवाय या शहरात आम्हाला दुसरा आधार कुठला? आणि न जाणो, ज्या खंडकरांवर आम्ही पूर्ण विसंबून होतो, ते नेमके त्याच सुमारास मुंबईला गेलेले असले तर?

सुदैवानं बरीच शोधाशोध केल्यावर आम्हाला एका चुरगळलेल्या चिठ्ठीवर खंडकरांचा पत्ता मिळाला. या प्रचंड शहरात त्यांचं घर शोधून काढणं हे एक आव्हानच होतं. पण आम्ही ते आनंदानं स्वीकारलं. मी आणि रमेश मोटरसायकल घेऊन तेहरानच्या अंतर्भागात बेदरकारपणे घुसलो.

दैव अजूनही आमच्या पाठीशी उभं होतं. शहराच्या ज्या भागात खंडकर रहात होते, तिथं आम्ही विनासायास येऊन पोचलो. पण तिथली 'कुचे हमीद' ही गल्ली काही केल्या मिळेना. आम्हीही चिवट! पत्ता मिळवल्याशिवाय जायचंच नाही, हा आमचा निर्धार. आमची मोटरसायकल एका दुकानाजवळ उभी करून आम्ही पायीच शोध घ्यायचं ठरवलं.

तेहरानमधे गाड्या रस्त्याच्या कडेला वाटेल तिथं 'पार्क' करता येत नाहीत. पोलिस ताबडतोब अशा गाड्यांच्या चाकांत कुलुपं ठोकून देतात. नंबर टिपून घेण्याच्या प्रकारावर त्यांचा विश्वास नसावा. अशा अनेक मोटर्स रस्त्याच्या कडेला शृंखलाबद्ध होऊन पडल्या होत्या.

बरीच पायपीट केल्यावर 'कुचे हमीद' एकदाचं सापडलं! पण मोठाच घोटाळा झाला होता! खंडकरांनी त्यांची रहायची जागा बदलली होती. त्यांच्या जागी आलेल्या इराणी सद्‌गृहस्थानं आम्हाला फोनवरून खंडकरांशी संपर्क साधून दिला. रात्री ठीक साडेआठ वाजता याच ठिकाणी त्यांना भेटून त्यांच्याबरोबरच त्यांच्या नव्या जागी मुक्कामाला जायचं ठरलं.

इकडे आमच्या सहकाऱ्यांनी आम्ही परतेपर्यंत केळी खाऊन वेळ मारून नेली होती. दहाबारा पंजाबी लोकांनी त्यांची आपुलकीनं चौकशी करून 'कोकाकोला' मागवला होता. तेहरानमधला हा पाहुणचार आटोपताच ठरल्याप्रमाणं खंडकरांना भेटण्यासाठी आम्ही पुनश्च गाड्यांवर स्वार झालो.

'कुचे हमीद'चा मार्ग फक्त मला आणि रमेशलाच माहीत असल्यानं रमेश–अविनाशच्या मागे एकनाथ–प्रभाकर, आणि प्रवीण–सुधीरच्या मागे विजय–संजीव अशा जोड्यांनी जायचं ठरवून आम्ही तेहरानच्या झगमगाटात हजारो वाहनांच्या प्रवाहात सामील झालो.

जगाच्या पाठीवर एवढी वेगवान आणि तितकीच अनियंत्रित वाहतूक–व्यवस्था दुसरीकडे क्वचितच असेल! भर शहरात ताशी शंभर–सव्वाशे किलोमीटर्स वेगानं वाहनं चाललेली असतात. अपघात होऊन त्यांचा चुराडा झाला

तरी बेहत्तर, अशीच इकडच्या लोकांची धारणा दिसते. स्त्रिया तर वाहनं चालवण्यात वाकबगार! आमच्यासारख्या पाहुण्यांना हूल देण्यात त्यांना मौज वाटत होती. सगळ्या प्रकारच्या मोटर्स या शहरात दिसत होत्या. 'होंडा', 'सुझुकी', 'यामाहा', 'कावासाकी' यांसारख्या मोटरसायकल्स तर शाळकरी मुलंही बेगुमानपणे चालवीत होती. मोटरसायकल्स चालवण्यासाठी या देशात लायसेन्सची आवश्यकताच नसते म्हणे. खरंखोटं देव जाणे! पण रहदारीच्या नियमांची इथं कुणालाच पर्वा दिसत नव्हती हे निश्चित!

त्यामुळंच या बेसुमार वाहतुकीत रमेश किती पुढं गेला ते आम्हाला कळलंच नाही. त्याच्या मागे असलेला एकनाथ गोंधळून गाडी बाजूला घेऊन आमची प्रतीक्षा करीत थांबला. आम्ही त्याच्यापासून फक्त पन्नास पावलं मागे होता. मधे एक चौक होता, इतकंच! सिग्नल मिळताच मी सरळ पुढे जाण्यासाठी चौकाच्या मध्यभागी आलो असेननसेन, तोच डावीकडून सहासात मोटर्स त्यांना सिग्नल अजिबात नसतानाही एकाच रांगेत भर वेगानं माझ्या अंगावर आल्या. क्षणाचाही विचार न करता आणि वेळ न दवडता मी झटकन सरळ दिशेनं जाणारी माझी गाडी चक्क माझ्या उजव्या अंगाच्या रस्त्याकडे विलक्षण वेगानं वळवली. माझ्या मागे असलेल्या विजयनंही प्रसंगावधान राखून त्याची गाडी माझ्यापाठोपाठ पिटाळली. तेहरानमधला आमचा पहिला अपघात टळला खरा; पण आम्ही भलत्याच चक्रव्यूहात सापडलो. सुमारे अर्धा तास वेडीवाकडी वळणं घेतल्यावर मोठ्या मुष्किलीनं आम्ही एकनाथ प्रभाकरना गाठलं, आणि अखेर 'कुचे हमीद'ला येऊन पोचलो. खंडकर आमची वाट पहात रमेश–अविनाशबरोबर उभे होते. त्यांच्या नव्या घरी पोचेपर्यंत रात्रीचे दहा वाजले होते.

खंडकरांचं घर खूपच मोठं होतं. पाच प्रशस्त खोल्या होत्या. जमिनीवर उंची गालिचे अंथरलेले होते. भिंतींवर सुंदर इराणी चित्रकृती होत्या. दिवाणखान्यातच मध्यभागी भलंमोठं अंडाकृती डायनिंग टेबल होतं. खंडकर इथं एकटेच रहात असले तरी त्यांच्या स्वभावातला नीटनेटकेपणा त्यांच्या घरातल्या टापटिपीवरून स्पष्ट जाणवत होता. नोकरीव्यतिरिक्त मिळणाऱ्या वेळात नखचित्रं काढण्याची कला त्यांनी अवगत केली होती. नखचित्रांचा एक आल्बमच करून त्यांनी तो इराणच्या शहांना भेट म्हणून पाठवला होता; अन् त्याबद्दल शहांच्या

स्वाक्षरीचं प्रशंसापत्रही त्यांना आलं होतं.

इराणचे शहा महंमद शाह रेझा पहलवी हे तेव्हाचे राष्ट्रप्रमुख. या राजाचा प्रजेवर चांगलाच वचक होता. पाश्चिमात्य संस्कृतीची, विचारांची अन् राजनीतीचीही छाप या शहांवर पडलेली होती. त्यांच्या अनेक धाडसी योजनांमुळं इराणची प्रगती इतक्या झपाट्यानं होऊ शकली. इंग्रजी–फारसी वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने या राजाविषयीच्या बातम्यांनी भरलेले असायचे. मुखपृष्ठांवर त्याचं छायाचित्र नाही असा दिवस क्वचितच उगवे. आपादमस्तक पाश्चिमात्य वेषभूषा केलेल्या या इराणच्या रुबाबदार शहांचं आणि त्यांची लावण्यवती राणी शहाबानू हिचं मुलांसमवेतचं रंगीत छायाचित्र प्रत्येक दुकानात नि कचेरीत लावलेलं बघायला मिळायचं. या शहांविरुद्ध जनतेत असंतोषाची एवढी आग धुमसत असेल अन् तिचा कालान्तरानं विस्फोट होणार असेल याची पुसटशी कल्पनाही आम्हाला त्या वेळी आली नव्हती.

तेहरान शहराला राजधानी म्हणून मान्यता प्राप्त झाल्यापासून इराणमधल्या साऱ्या संपत्तीचा ओघ या एकाच शहराकडे सतत वहातो आहे. श्रीमंतांचं हे विलासघर झालं आहे. या शहरातला 'सोन्याचा बाजार' अक्षरशः डोळे दिपवणारा आहे. अफगाणिस्तानप्रमाणे इथंही भलंमोठं 'मनीमार्केट' आहे. 'रियाल्स' हे या देशातलं चलन असलं तरी व्यवहारात 'तुमान' प्रचलित आहेत. वीस 'रियाल्स'चा एक 'तुमान' होतो.



**'रूबायत'कार उमरखय्याम आणि साठ हजार कडव्यांचा 'शाहनामा' लिहिणारा फिरदौसी हे इराणचे दोन महाकवि. फिरदौसीचा हा पुतळा.**

फोनवरून आधीच संपर्क साधून ठेवला. श्री. खंडकरांचा निरोप घेऊन आम्ही तेहरान सोडलं. साधारण चारच्या सुमारास झांजानला पोचू, असा आमचा अंदाज होता पण काझविन गावातून जात असताना मीच चुकून राश्तच्या दिशेनं गाडी पिटाळली होती. काहीतरी चुकतंय असं वाटताच माझ्या मागोमाग येणाऱ्या सहकाऱ्यांनी पटापट नकाशे बाहेर काढले. राश्तवरून पुढं तुर्कस्तानला जाता येत होतं; पण आम्ही सगळे उत्सुक होतो झांजानला जाण्यासाठी! कारण या गमतीदार नावाप्रमाणे इथल्या 'लायन्स क्लब'नं आम्हाला पाठवलेलं पत्रही मोठं गोड होतं. त्यामुळं चाळीस किलोमीटर्स पुन्हा मागे फिरून आम्ही काझविनला आलो आणि झांजानच्या रस्त्याला लागलो.

मजल–दरमजल करीत सायंकाळी पाचच्या सुमारास आम्ही झांजानच्या अलीकडे पाच किलोमीटर्सवर असलेल्या पोलिसचौकीवर येऊन पोचलो, तो काय? असंख्य इराणी तरुणतरुणी, लायन्स क्लबचे अधिकारी, आणि इतर हौशी नागरिक यांनी टाळ्यांच्या कडकडाटात आमचं स्वागत केलं. मोठमोठी पुष्पचक्रं त्यांनी आमच्या गळ्यात घातलीच; पण आमच्या गाड्यांनाही तो मान त्यांनी बहाल केला. परदेशातलं हे आमचं स्वागत 'न भूतो न भविष्यति' अशा प्रकारचं होतं. आमच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. ज्यांना कधी बघितलेलं नाही असे हे इराणी लोक आमच्याशी हस्तांदोलन करीत होते. आम्हाला कडकडून आलिंगनं देत होते. फक्त मुके घेऊन प्रेम व्यक्त करण्याचा खास इराणी प्रयोग त्यांनी आमच्यावर करायचा बाकी ठेवला होता!


आमच्या गाड्यांमधले 'पेंझिन' संपत आलंय असं कळताच क्लबचे अध्यक्ष झोल्गारियन यांनी तावडतोब त्याची व्यवस्था केली. चारही गाड्यांच्या टाक्या पाच मिनिटांत तुडुंब भरल्या. शहानवाझ हे क्लबचे उपाध्यक्ष. त्यांनीच आमचा हा स्वागतसमारंभ घडवून आणला होता. प्रसन्न मुद्रा, रुपेरी केस आणि उंचापुरा बांधा. देखण्या लाघवी शहानवाझनी आमची मनं तेव्हाच जिंकली.

आता आमची वरात अगदी शाही थाटात झांजान शहरातून चालली होती. पुढे पाच मोटारी, मागेही पाच–सात मोटारी आणि मधे ओळीनं आमच्या चार मोटारसायकल्स! एवढा बहुमान परदेशात मिळणं ही खरोखरच भाग्याची गोष्ट

होती.

'वीमे ईरान' या सर्वोत्कृष्ट, वातानुकूलित, पंचतारांकित, पाश्चिमात्य पद्धतीच्या हॉटेलमधे आम्ही येऊन पोचलो. कॉफीपानाच्या वेळीच उपस्थितांचे आभार मानण्याचं औचित्य दाखवून आम्ही आपापल्या खोल्यांचा ताबा घेतला.

संधी मिळताच अंघोळी उरकायच्या हा आमचा प्रवासातला अलिखित नियमच झाला होता. त्यामुळं अशा पंचतारांकित हॉटेलमधल्या उतारूं-टी ठेवलेल्या उंची सुगंधी सावणाचा पुरेपूर वापर करून घ्यायला आम्ही मागंपुढं पहात नसू!



तेहरानमधील अत्याधुनिक वास्तुशिल्पाचा एक सुंदर नमुना : 'शाहयाद'

मनसोक्त 'टब–बाथ' घेऊन, परीटघडीचे कपडे परिधान करून आम्ही तळमजल्यावरच्या डायनिंग हॉलमधे प्रवेश केला. 'लायन्स क्लब'चे बरेच सभासद आमची वाटच पहात असलेले दिसले. नेहेमीच्या प्रथेनुसार क्लबच्या झेंड्यांची देवाणघेवाण झाली. भारतीय संस्कृती आणि भारतीय इतिहास यांवर भर देऊन मीही एक छोटंसं भाषण केलं. अध्यक्ष झोल्गारियन यांनी इंग्रजीत भाषण करून क्लबची आठवण म्हणून नक्षीदार लोकरीचे हातमोजे आम्हा प्रत्येकाला भेट दिले. शहानवाझना इंग्रजी येत नव्हतं. माझ्या भाषणाचा सारांश त्यांना फारसी भाषेत समजावून सांगितल्यानंतर त्यांनी फारसी भाषेतच पाच मिनिटं भाषण केलं. ते अर्थात आम्हाला काय कळणार? पण त्यांच्या त्या फारसी शब्दांच्या शिंपल्यांत सद्‌भावनांची मौक्तिकं ठासून भरलेली होती, हे त्यांच्या आवाजाच्या भावगर्भ कंपनाने चांगलंच जाणवून दिलं.

दुसऱ्या दिवशीचा आमचा कार्यक्रम या लोकांनी आधीच ठरवून टाकला होता. सकाळची न्याहरी आटोपताच शहानवाझांबरोबर आम्ही मिनिबसनं एक आगपेट्यांचा कारखाना बघायला गेलो. व्यवस्थापकांसमवेत मोठमोठ्या पात्रांमधून टरबुजाचा रस प्राशन करून नंतर आम्ही कारखान्यातलं यांत्रिक पद्धतीनं चालणारं काम पाहिलं. सरकारी मालकीच्या या कारखान्याच्या व्यवस्थापकांना त्यांच्या कामात फारच आत्मीयता असावी असं त्यांच्या बोलण्यावरून जाणवलं.

झांजानपासून दहाबारा किलोमीटर्स अंतरावर 'सुलतानिया' नावाची प्राचीन वास्तू होती. शहानवाझांनी मोठ्या आग्रहानं आम्हाला तिथं नेलं. सध्या पाकिस्तानात असलेल्या मोहेंजोदारो व हडप्पा यांच्याप्रमाणे इथंही प्राचीन शहराचे अवशेष उत्खननात सापडले आहेत, इराणची राजधानी पूर्वी याच ठिकाणी वसली होती, असं या उत्खननात आढळून आलंय! तुर्की लोकांच्या म्हणजेच मोगलांच्या आक्रमणामुळं या शहराचा अखेर संपूर्ण विध्वंस झाला आणि या शहराची नामोनिशाणीही राहिली नाही. कदाचित यामुळंच इराणी लोकांना आजही तुर्की लोकांबद्दल कमालीचा तिरस्कार वाटतो. 'सुलतानिया'चा घुमट प्रचंड असून त्यावरचं नक्षीकाम नयनमनोहर आहे. या भग्न वास्तूचं पुनरुज्जीवन करण्याचा चंग खुद्द राणीसाहेब शहाबानूंनी त्या वेळी बांधलेला होता. कामाला सुरुवातही वेगानं झाली होती.

'सुलतानिया' बघून परतल्यावर शहानवाझ आम्हाला बाजारात फेरफटका

मारायला घेऊन गेले. 'बाजार' हा आपल्या मराठीत चपखल बसलेला शब्द मूळचा फारसी, 'बाझार' म्हणजे विकत घेणं. पण आम्ही बापडे तुटपुंजं चलन घेऊन प्रवासाला निघालेले! या 'बाझारा'त अवलोकनाव्यतिरिक्त आम्ही काय करणार कपाळ? शहानवाझांना मात्र आमच्या या 'विरक्त' वृत्तीचं नवल वाटल्याशिवाय राहिलं नसेल!

झांजानच्या पर्यटनखात्याच्या प्रमुखांनी आमच्या पुढच्या मुक्कामासाठी ताब्रिझमधल्या कँपिंग साइटवरच्या व्यवस्थापकांसाठी मला खास पत्र दिलं. शिवाय ताब्रिझमधल्या 'आयंदेगान' या क्रांतिकारी दैनिकाचे संपादक पत्रपंडित जलाल वफाए यांनाही फोन करून आमच्या आगमनाबद्दल सांगून ठेवलं.

या भागात रात्री आठ वाजता सूर्यास्त होत असल्यानं आम्ही जरा उशिराच झांजान सोडलं. इथून निघताना आम्हाला फार वाईट वाटलं. आमच्या संपूर्ण प्रवासातलं झांजानचं वास्तव्य स्वप्नमय तर होतंच; पण शहानवाझांच्या वात्सल्यपूर्ण वागणुकीनं त्याला आमच्या हृदयाच्या खोलखोल कप्प्यात कायमचं स्थान मिळालं होतं.

ताब्रिझ शहरातल्या कँपिंग साइटवर आम्ही पोचलो तेव्हा रात्रीचे दहा वाजून गेले होते. सारा परिसर लोकांनी फुलला होता. सरोवराच्या काठाकाठानं तरुण युगुलं चंद्रप्रकाशात हिंडत होती. हवेत कमालीचा गारवा होता.

सरोवराकाठी रंगीबेरंगी तंबू होते. पर्यटनखात्यांनच ते बांधलेले होते. एकेका तंबूत चार पलंग होते, टेबलखुर्च्या होत्या, विजेचे दिवे होते, उबदार रजया होत्या. बाहेर पाण्याचा नळ होता. प्रसाधनगृह होतं. एकूण थाट हॉटेलच्या रूमचाच. फक्त भिंती कॅन्व्हसच्या, एवढाच काय तो फरक. कँपिंग साइटवर तंबूत रहाण्याची मौज आम्ही आज प्रथमच या ताब्रिझ शहरात अनुभवत होतो.

ताब्रिझ हे इराणमधलं दुसऱ्या क्रमांकाचं शहर. विमानतळ तर या ठिकाणी आहेच; परंतु रेल्वेचं हे मोठं जंक्शन आहे. इराणमधे रेल्वेमार्ग अगदी मोजक्या शहरांतून जातात. त्या मानानं विमानवाहतूक अनेक ठिकाणी दिसून येते.


'केहान इन्टरनॅशनल' आणि 'इत्तलाद' यांच्या वार्ताहरांनी ताब्रिझच्या कँपिंगमधे आम्हाला गाठलं. आम्हीही त्यांच्याशी मोकळेपणानं वार्तालाप केला. 'तेहरान जर्नल'मधे प्रसिद्ध झालेली आमच्याबद्दलची बातमी आम्हाला इथंच बघायला मिळाली. त्यात वार्ताहरानं म्हटलं होतं. 'पश्चिमात्य देशांतले – युरोपातले

प्रवासी इराणमधे नेहमीच येत-जात असतात; पण आठ भारतीय तरुण मोटारसायकलवरून आमच्या देशात आलेले बघून आम्हा इराणी जनतेला निश्चितच कौतुक वाटत आहे.'

आमचा संध्याकाळचा खाना ताब्रिझच्या 'हॉटेल इन्टरनॅशनल' या तिथल्या एकमेवाद्वितीय हॉटेलमधे आयोजित केल्याचा निरोप जलाल वफाए यांच्याकडून येताच दुपारची वेळ आम्ही भुईमुगाच्या शेंगा खाऊनच मारून नेली. आमच्या प्रवासात हीच तर मौज होती! एक दिवस पंचतारांकित हॉटेलच्या मखमली गाद्यांवर तर दुसरा दिवस रस्त्याच्या कडेला थंडीत कुडकुडत नुसतं जलप्राशन!

'हॉटेल इन्टरनॅशनल'चा थाट आपल्याकडच्या 'ताज'ची आठवण करून देणारा होता. शहरातल्या प्रतिष्ठित नागरिकांना व 'लायन्स क्लब'च्या पदाधिकाऱ्यांना या भोजनाच्या कार्यक्रमासाठी आमंत्रण होतं. या सर्व उपस्थितांमधे जलाल वफाए यांचं व्यक्तिमत्त्व विशेष उठून दिसत होतं. जहाल विचारसरणीचे पत्रकार म्हणून त्यांची ख्याती होती. फारसी वाङ्मयातली 'डॉक्टरेट' त्यांनी मिळवलेली होती. कालिदास हा त्यांचा आवडता भारतीय लेखक होता. उमरखय्यामच्या 'रुबायत'चं इंग्रजी रूपांतर करण्याचा संकल्प त्यांनी सोडला होता. त्यांच्याशी रंगलेल्या चर्चेमुळे ताब्रिझमधली ती सायंकाळ माझ्या स्मरणात आजही ताजी आहे.

आज आम्ही 'माकू' या इराणच्या शेवटच्या गावाच्या दिशेनं गाड्या पिटाळल्या होत्या. वाटेत आम्हाला अनेकांनी तुर्कस्तानातून जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यात अनेक पाकिस्तानी प्रवासीही होते. नुकतेच ते तुर्कस्तानचा खडतर प्रवास करून आलेले होते. तुर्की लोकांच्या त्रासानं ते हैराण झालेले दिसत होते. फाजिल आत्मविश्वास बाजूला ठेवून, तुर्कस्तानपुरता तरी आम्ही आमचा प्रवास ट्रक्समधे गाड्या चढवून करावा, निष्कारण संकटं ओढवून घेऊ नयेत, असं त्यांनी परोपरीनं समजावून सांगितलं. पण संकटांना सामोरं जाण्यासाठीच तर आम्ही बाहेर पडलो होतो! त्यांनी सुचवलेले पर्याय आम्हाला थोडेच पटणार होते? संकटं जरूर यावीत आणि त्यांना धैर्यानं तोंड देता यावं याच उमेदीनं आम्ही निघालो होतो. त्यामुळं गाड्या ट्रक्समधे टाकून तोंडं लपवीत प्रवास करण्याचा भ्याडपणा आम्ही थोडेच करणार होतो?



**'सुलतानिया' या ठिकाणाजवळच्या उत्खननात सापडलेल्या अवशेषांवरून, इतिहासकाळात इराणची राजधानी इथे वसली होती असे म्हणतात.**

माकू शहर उंचउंच डोंगराच्या वळचणीत वसलेलं होतं. इथून पुढं फक्त पंधरा किलोमीटर्सवर 'बझारगन' ही इराणी सरहद्द होती. माकूमधल्या मुक्कामात अनेक इराणी तरुणांनी आमच्या भोवती एकच गिल्ला करून आमच्या विटलेल्या जीन्स दुप्पटतिप्पट किंमतीला विकत घ्यायची तयारी दाखवली. इराणी तरुणांना जीन्सचं वेड वरंच आहे असं ऐकलं होतं. पण त्यासाठी ते एवढे हपापलेले असतात हे बघून आम्हाला मोठी गंमत वाटली. आमच्यापैकी दोघातिघांनी ही पर्वणी साधून बऱ्यापैकी 'चांदी' केली.

इराणमधली आमची ती शेवटची रात्र होती. मी नकाशावरून नजर फिरवीत आठवणींना उजाळा देत होतो. अहवाझ, इस्फहान, शिराझ, झायेदान वगैरे पाचसहा शहरांचा अपवाद वगळता बहुतेक महत्त्वाच्या शहरांना आम्ही भेट दिली होती. पण आमच्या मार्गात आम्हाला तेलविहिरी कुठं बघायला मिळाल्या नव्हत्या. कारण इराणच्या 'अवादान' या दक्षिण–भागातल्या कुझिस्तान प्रांतातून आमचा प्रवास झालाच नव्हता. अन्यथा आम्हाला महंमद शाहरेझा पहलवी या राजाच्या नावाचं प्रचंड धरणही बघायला मिळालं असतं.

इराणी लोक मला सुखवस्तू वाटले. भिकारी तर इथं कुठं दिसलेच नाहीत. शिक्षकांना इथं प्रतिष्ठा आहे, मान आहे. विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांनाही विशिष्ट पद्धतीचा गणवेष असतो. प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचं आहे. इराणी लोकांची वृत्ती प्रवाशांना त्रास देण्याची अजिबात नाही. पण कधीकधी उडवाउडवीची उत्तरंही ते देतात. नकारार्थी उत्तरं द्यायची त्यांची पद्धत फारच और! 'नाही' म्हणताना ते हनुवटी उंचावून जणू 'काय पाहिजे' असं त्रासिकपणे विचारावं तशी मुद्रा करतात. 'योक' म्हणजे 'नाही'. पण कित्येकदा 'योक' हा शब्द उच्चारण्याचे श्रमही ते घेत नाहीत आणि नुसताच 'चक्' असा विचित्र आवाज काढतात. अशा उत्तरांनी आम्ही पार वैतागून जायचो आणि दोनचार इरसाल मराठी शिव्या हासडायचो. पण तरीही त्यांच्या मख्ख चेहऱ्यावर कुठलाही परिणाम न झालेला बघून आम्ही आमच्याशीच हसायचो अन् तिथून निघून जायचो.

भारतीय डॉक्टर्सना इराणमधे फार मानतात. इराण-सरकारच्या आमंत्रणावरून भारत-सरकारतर्फे अनेक तज्ज्ञ डॉक्टर्स तिकडे गेले आहेत. त्यांना पगार भरपूर मिळतो; पण त्यांच्याच बरोबर काम करणाऱ्या इराणी डॉक्टर्सच्या पगाराच्या तुलनेनं तो कमीच ठरतो. हा भेदभाव कटाक्षानं कायम राखला जातो असंही मला कळलं. पण असं असलं तरी सर्वसामान्य इराणी माणसाची श्रद्धा भारतीय डॉक्टर्सवरच अधिक! लहानशा गावातही अद्ययावत दवाखाना असतो. त्याला 'बीमारेस्तान' म्हणतात.

बेशाहरच्या डॉक्टर सिंगप्रमाणेच तेहरानमधेही डोणकरी नावाच्या बेळगावच्या एका तरुण डॉक्टरांशी आमचा अनपेक्षित रित्या परिचय झाला होता. त्याचं असं झालं की, मी आणि रमेश तेहरानच्या महापौरांना भेटण्यासाठी चाललो होतो. मुंबईचे त्या वेळचे महापौर मनोहर जोशी यांनी दिलेलं परिचयपत्र आम्ही बरोबर घेतलं होतं. वाटेत एका स्नॅकबारजवळ अल्पोपाहार करण्यासाठी आम्ही थांबलो. दुपारची वेळ असल्यानं बारमधे गर्दी बरीच होती. पण त्या कोलाहलातही 'बाबा, मला चॉकलेट घेता का' असा गोड प्रश्न एका चिमुरड्या मुलीनं मराठीत विचारल्याचं आम्हाला स्पष्ट ऐकू आलं. क्षणार्धात तेहरान-मुंबईमधलं हजारो मैलाचं अंतर नाहीसं झालं. अत्यानंदानं आम्ही त्या मराठी मुलीला उचलून घेतलं. डॉ. डोणकरी पुढे झाले आणि त्यांनी आपला परिचय करून दिला. आम्ही मोटारसायकलवरून आल्याचं समजताच त्यांनीही

आग्रहानं आम्हाला त्यांच्या घरी–नौकादेहला – मुक्कामाला येण्याचं आमंत्रण दिलं. नौकादेह मागे राहिलं होतं. तरीही परतीच्या प्रवासात त्यांच्या घरी जाण्याचं आम्ही तेव्हाच ठरवून टाकलं.

डॉ. डोणकरींना इराणमधे येऊन वर्ष लोटलं होतं. त्यांची चिमखडी छोकरी तर फारशी भाषा बोलयलादेखील लागली होती. डोणकरी पतिपत्नींनाही मराठी भाषा बोलायला या छोट्या गावात एकमेकांशिवाय दुसरं कुणीच नव्हतं. विचाऱ्यांचा मोठा कोंडमारा झाला होता. आज इतक्या दिवसांनी मनसोक्त मराठी बोलण्याची संधी त्यांना मिळाली होती. त्यातून ते आमच्या अंबरनाथलाही अनेकदा येऊन गेल्याचं त्यांनी सांगितलं. मग आमच्या गप्पांना एवढा रंग चढला, की महापौरांच्या भेटीचा बेत आम्ही रद्दच करून टाकला.

खरंच, परदेशात भेटलेला मराठी माणूस हा त्या वेळी त्या देशाच्या पंतप्रधानापेक्षाही जास्त महत्त्वाचा वाटतो. मराठीच नव्हे, तर कुणीही भारतीय नागरिक परदेशात आपल्या कुटुंबियांपैकीच एक वाटतो यात शंकाच नाही.

अशा या भारतीयांच्या हृद्य आठवणींचा सौरभ मनाच्या सांदीकोपऱ्यात दरवळत असतानाच आम्ही इराण सोडलं आणि तुर्कस्तानकडे दौडत निघालो.

⌘ ⌘ ⌘

## ५

# सारी कृपा राज कपूरची!

तुर्कस्तानच्या लालभडक राष्ट्रध्वजावरची तिरपी चंद्रकोर दुरूनही स्पष्ट दिसत होती. आमची 'हेल्थ सर्टिफिकेटस्' आणि मोटारसायकल्सची 'कार्नेटस्' या दोनच गोष्टींची तपासणी झाली आणि आम्ही या ऐतिहासिक देशाच्या भूमीवर पाय ठेवला.

आठ लक्ष चौरस किलोमीटर्स पसरलेला हा प्रजासत्ताक देश. वस्ती अवघी चार कोटी. पंचावन्न वर्षांपूर्वीच इथली सुलतानशाही संपुष्टात आली. मुस्तफा केमाल अतातुर्क हे यांचे पहिले राष्ट्राध्यक्ष.

या देशाचा इतिहास म्हणजे लढायाच लढाया! होमरचं 'इलियड' इथंच घडलं. हनिबालच्या स्वाऱ्या याच प्रदेशावर झाल्या. मिडास राजानं केलेली कोंडी फोडून अलेक्झांडर ऊर्फ शिकंदर आशियावर चाल करून आला तो याच प्रदेशातून. मार्क ॲन्थनीनं सम्राज्ञी क्लिओपात्राला लग्नाची भेट म्हणून दिला तो याच देशाचा एक भाग!

विरळ लोकवस्ती, ओसाड आणि डोंगराळ भूभाग आणि वारंवार होणारे भूकंप यामुळे या देशात रस्ते असे नाहीतच. वाटसरूंना लुबाडणं हा इथल्या लोकांचा जणू धंदाच झालाय!

इथलं चलन तुर्की लिरा. डॉलरला पंधरा लिरा मिळतात. म्हणजेच रुपयांच्या हिशेबात एक तुर्की लिरा आपल्या पन्नास पैशांबरोबरची. शंभर कुरुस म्हणजे एक लिरा. हे कुरुसाचं नाणं फारच बारीक. व्यवहारदृष्ट्या ते चलनात नाहीच म्हटलं तरी चालेल.

तुर्कस्तानात आम्हाला पैसे आणि पासपोर्टस् या दोन गोष्टींबद्दल विशेष सावध रहाण्याचा सल्ला मिळाला होता. प्रवाशांचे पासपोर्टस् लुबाडून आणि त्यावरचा फोटो बदलून अनेक बेकायदेशीर कामांसाठी असे पासपोर्टस् हजारो

रुपयांना विकण्याचा धंदा या देशात – विशेषतः इस्तंबूलसारख्या ठिकाणी – चालतो हे आम्ही ऐकलंच होतं. परंतु पैशाचं आमिष दाखवून पासपोर्टस् हस्तगत करणारे भामटेही या देशात वावरतात, ही माहिती आम्हाला नवीन होती. त्यामुळं पासपोर्टस् नि पैसे चोवीस तास अंगावरच बाळगून ठेवायचे, असं मनाशी पक्कं ठरवून आमचा अष्टचक्री प्रवास आम्ही पुढे सुरू केला.

एकमेकांना नजरेच्या टप्प्यात ठेवून आमच्या चारही गाड्या संथ गतीनं चालत होत्या. सगळ्यात पुढे मी होतो, आणि शेवटी रमेश. बंद पडलेली गाडी कमीत कमी वेळात चालू करण्यात तो वाकबगार! त्यामुळे त्यानं सर्वांच्या मागं रहाणंच आवश्यक होतं. कोणतंही ठिकाणी खात्रीचं आणि निर्धोक वाटल्याशिवाय गाड्या थांबवायच्या नाहीत, असं आम्ही पहिल्यापासूनच ठरवलं होतं. शिवाय इराणमधेच पेट्रोल भरून घेतल्यानं संध्याकाळपर्यंत पेट्रोलची फिकीर नव्हती.

'दोगूबाएझाद' या सरहद्दीवरच्या गावापासूनच भिकार रस्त्याला प्रारंभ झाला होता. रस्ता कसला; केवळ दगडगोटे अन् खाचखळगे! आमची खरी कसोटी इथंच होती. ताशी ऐंशी किलोमीटर्स वेगानं इराणमधे गाड्या चालवणारे आम्ही इथं तासाभरात वीस किलोमीटर्सही जाऊ शकत नव्हतो. कोणत्याही क्षणी



क्रीडेत रमलेली तुर्की ग्रामकन्या

कपाळमोक्ष होण्याची शक्यता होती. दगडगोट्यांनी भरलेला हा रस्ता संपता संपत नव्हता. आकाशातून गारांचा पाऊस पडावा तसा इथं दगडगोट्यांचा सडाच पडलेला होता जणू! असल्या या प्रवासात आमच्या गाड्या सपशेल निकामी होणार आणि आमच्या शरीराची हाडं पार खिळखिळी होणार, यात शंकाच नव्हती. कसेबसे आम्ही पुढे सरकत होतो.

क्वचित कुठं रस्त्याच्या कडेला स्त्रीपुरुषांप्रमाणेच लहान मुलंही दिसायची, खुणा करून ती आमच्याकडे सिगारेट्स मागायची. आम्ही तसेच पुढे जातोय असं दिसताच आमच्यावर दगड भिरकावायची. रस्त्यात शेळ्यामेंढ्या उभ्या करून आम्हाला थांबवण्याचाही प्रयत्न व्हायचा. या लोकांजवळ मोठमोठे रानटी कुत्रे असायचे. तुर्की कुत्रेच ते! लांडग्यासारखे हिंस्त्र आणि भयंकर! असले कुत्रे आमच्या अंगावर सोडले जायचे. एकदा तर रमेशच्या अंगावर कुणीतरी भलंमोठं टरबूजच भिरकावलं अन् ते नेमकं त्याच्या छातीवर बसल्यानं त्याला तिरीमिरीच आली. सुदैवानं वाटमारीचा प्रसंग ओढवला नाही. परतीच्या प्रवासात असा त्रास कुणी दिलाच, तर त्याला हिंदुस्थानचं पाणी चाखवल्याशिवाय रहायचं नाही, असं मनाशी पक्कं ठरवून आम्ही चाललो होतो.

दिवसभरात एका 'लोकान्तासी'मधे चहा प्यायला आम्ही थांबलो तेवढेच. अन्यथा आमच्या गाड्या सतत पळतच होत्या. आमचे सगळे अंदाज चुकीचे ठरत होते. सूर्य मावळेपर्यंत आताएर्झुरूमला पोचणं शक्यच नव्हतं. इकदिर, तुझलुका, कागीझमन, कारातुर्क वगैरे सटरफटर गावं ओलांडून आम्ही आता जेमतेम होरासनपर्यंत आलो होतो. सबंध दिवसात अवघं शंभर किलोमीटर्स अंतर आम्ही कापलं होतं. शरीराची हाडं पार ढिली झाली होती. आणखी पुढे जायला सगळेच कंटाळले होते. काय करावं या विवंचनेत आम्ही होतो, तोच मला दूरवर एक पेट्रोलपंप दिसला. आम्ही मोठ्या आशेनं तिथं गेलो. पहातो तर एक आडदांड माणूस लाकडं पेटवत बसला होता. मी भीतभीत पुढं झालो. आम्हाला इथं कुठं झोपायला मिळेल का असं खाणाखुणांनीच विचारलं. तुर्की भाषेत तो काहीसा गुरगुरला. मी पिच्छा सोडला नाही. अखेर वैतागून त्यानं आम्हाला त्याच्याच खोलीत पथारी पसरायला संमती दिली. चंगीजखानचा हा वंशज आमचा सरबळी तर देणार नाही ना, अशी भीती क्षणभर मनात डोकावली. पण आता त्याचं म्हणणं मानण्याखेरीज पर्यायच नव्हता.




इस्तंबूलमधली सुप्रसिद्ध निळी मशीद

'लोकान्तासी'मधे 'योमूर्था' ऊर्फ अंड्याची भुर्जी आणि 'एकमेक्' ऊर्फ पाव खाऊन आम्ही तुर्की जेवण उरकलं. पिण्यासाठी आम्हाला बंद बाटलीतले पाणी मिळालं. पाण्याला इकडे 'सू' म्हणतात. पैसे मोजूनच हे 'सू' घ्यावं लागतं. तुर्की लोकांनाही पाणी पिण्याची फारशी गरज वाटत नसावी. 'लोकान्तासी'मधे बसलेल्या अन्य तुर्की लोकांकडून आम्ही महत्त्वाचे तुर्की शब्द माहीत करून घेतले आणि काळोख पडण्यापूर्वीच पेट्रोलपंपावर परतलो. तुर्कस्तानातली ती पहिलीवहिली रात्र त्या अक्राळविक्राळ तुर्की राक्षसाच्या सान्निध्यात आम्ही कशी काढली ते आमचं आम्हालाच ठाऊक!

दुसऱ्या दिवशी एर्झुरूमला न थांबता आम्ही थेट एर्झिन्जान गाठलं. दुपारचे चार वाजले होते. थंडगार वारे वाहात होते. पावसाची लक्षणं दिसत होती. एकनाथ-प्रभाकर भरधाव पुढे गेले होते. ते निदान आमच्या नजरेच्या टप्प्यात येईपर्यंत तरी गाड्या चालवीत रहाणं भाग होतं. आता आम्ही एका दुर्गम घाटाच्या अगदी मध्यावर येऊन ठेपलो होतो. पावसाबरोबरच झोंबऱ्या वाऱ्याच्या चक्रात सापडलो होतो. अंगावर जर्किन्स असूनही आपादमस्तक ओलेचिंब झालो होतो. सगळ्यांना गाडीवरून उतरावं लागलं. थंडीनं तर आम्ही पार काकडलो

होतो. एका प्रचंड पाषाणाचा आडोसा बघून आम्ही प्रथम शेकोटी पेटवली आणि थोडी ऊब मिळाल्यावरच सुमारे तासाभरानं पुढे निघालो. मढवी–बंधूही वाटेत भेटले. चढ संपून आता उतार सुरू झाला होता. विजय संजीवला पाठीशी घेऊन त्याची गाडी चालवीत होता. अचानक त्या गाडीचे ब्रेक्स तुटले. झालं! म्हणजे आता पुन्हा कुठंतरी जवळच मुक्काम करणं क्रमप्राप्त होतं! मी आणि सुधीर पुढे निघालो. रेफानिया नावाच्या गावाजवळच एका भिंतीवर वेडीवाकडी लिहिलेली OTEL अशी अक्षरं मला दिसली. आमचा प्रश्न सुटला. बाकी मंडळी पाठोपाठ आलीच. वेळ न दवडता एकनाथनं तडक भटारखान्यात प्रवेश मिळवला आणि तुर्की 'एकमेक्'बरोबर खायला बटाट्याचा छानदार रस्सा तयार केला. जोडीला 'योमूर्था' होतीच.

दुसऱ्या दिवशी आमच्यातले तंत्रज्ञ कामाला लागले. अर्थात कोणत्याही प्रकारचा तांत्रिक दोष दूर करणं हा रमेश–सुधीर यांच्या हातचा मळ होता. त्यामुळं लवकरच आम्ही रेफानिया सोडलं, आणि शिवासच्या रस्त्याला लागलो.



आशिया आणि युरोप खंडांना जोडणारा
इस्तंबूलमधील बॉस्फरसच्या खाडीवरील अद्वितीय पूल

इम्रानली गावाजवळच्या 'लोकान्तासी'मधे आम्हाला एक वेगळ्याच प्रकारचा छंद बघायला मिळाला. या 'लोकान्तासी'च्या मालकानं जाणाऱ्यायेणाऱ्या परदेशी प्रवाशांकडून गोळा केलेले फोटो मोठ्या अभिमानानं भिंतीवर लावले होते. प्रत्येक प्रवाशाचं नाव आणि पत्ताही त्याखाली लिहिलेला होता. आमचेही फोटो त्यानं हौसेनं मागून घेतले. आमच्यानंतर त्या रस्त्यानं जाणाऱ्यांना ते पहायला मिळतील अशी आशा बाळगायला हरकत नाही.

झारा, हाफिक मार्ग टाकून आम्ही शिवासच्या जवळ आलो होतो. शिवास हे तुर्कस्तानातलं व्यापारी शहर. याचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. झाउलची ही भूमी जेव्हा ज्युलियस सीझरनं सहजासहजी जिंकली, तेव्हा त्याच्या तोंडून 'Veni, Vidi, Vinci' म्हणजेच इंग्रजीत सुप्रसिद्ध असलेलं 'I came, I saw, I conquered' हे वचन बाहेर पडलं.

शिवासजवळ संजयची गाडी केव्हा पंक्चर झाली हे मला आणि एकनाथला समजलंच नाही. आम्ही आपले आपल्याच नादात पुढंपुढं जात राहिलो. अखेर यिल्डीझेलीच्या एका हॉटेलसमोर आम्ही उतरलो तेव्हा तर आमच्यात आणि मागे राहिलेल्या सहाकाऱ्यांत तब्बल पंचवीस किलोमीटर्सचं अंतर पडलं होतं. एव्हाना सूर्यास्त होऊन किट्ट काळोख पडला होता. आमचे सहकारी येण्याची चिन्हं दिसेनात. आम्ही हॉटेलच्या मालकाला चुचकारायला सुरुवात केली. आमचे सहकारी मागे राहिले आहेत आणि रात्र कुठे काढावी हा आमच्यापुढे बिकट प्रश्न आहे हे त्यानं ओळखलं. वास्तविक ते हॉटेल रहाण्यासाठी नव्हतंच; पण तरीही त्याच्या कॅश काउंटरच्या मागे आम्ही सामान उतरवलं आणि टेपरेकॉर्डवर चालू असलेली रटाळ तुर्की गाणी ऐकत झोपी गेलो.

आमच्या अंदाजाप्रमाणं मागे राहिलेले सहकारी सकाळी सात वाजता आम्हाला येऊन मिळाले, आणि आमचा जीव भांड्यात पडला.

दगडा–धोंड्यांचा रस्ता आता थोडाच शिल्लक होता. अंकारा या तुर्कस्तानच्या राजधानीपासून पुढे रस्ता चांगला आहे हे आम्हाला माहीत होतं. त्या आशेवरच आम्ही मजल–दरमजल करीत योझगात पार केलं आणि किरीकिलेजवळ चहापानासाठी उतरलो. सर्वात मागे असलेल्या रमेश–अविनाशना आमच्या गाड्या दिसल्याच नाहीत आणि ते तसेच न थांबता वेगानं पुढे निघून गेले.

चहापान होताच आम्ही त्वरेनं निघालो. पण खुद्द अंकारा शहर दृष्टिपथात आलं तरी या दुकलीचा पत्ता लागेना. इतर सहकारी एका झाडाखाली थांबले. मी आणि सुधीरनं हायवेवरून अंकाराच्या मागेपुढं पाच–दहा किलोमीटर्स शोध घेतला. पण व्यर्थ! अंकारा शहरात तर ही जोडी घुसली नसेल ना, असा विचार करून मीही अखेरीस सुधीरला बरोबर घेऊन अनोख्या, अपरिचित अशा अंकारा शहरात गाडी घातली.

एक वेळ हायवेवर गाड्या चालवणं सोपं. पण रस्त्याचं जाळं पसरलेल्या शहरात चुकामूक झालेले साथीदार शोधत फिरणं महा कठीण! तरीही आम्ही स्वतःच चुकणार नाही याची दक्षता घेत जवळजवळ तासभर अंकारा शहरात इतस्ततः फिरत होतो. अखेर हताश होऊन, सहकाऱ्यांना घेऊन आम्ही एका लॉजवर येऊन थडकलो. अंकाऱ्याच्या अगदी प्रमुख रस्त्यावर हा लॉज होता. सहाव्या मजल्यावर पण अगदी रस्त्यालगतच्या दोन खोल्या आम्ही घेतल्या. आकाशाचं चुंबन घेणाऱ्या अंकाऱ्यातल्या उत्तुंग इमारती इथून फारच सुंदर दिसत होत्या. निऑन साइन्सच्या रंगीबेरंगी झगमगाटात सगळी नगरी उजळून निघत होती. शेकडो गाड्यांची वर्दळ रस्त्यावर अगदी मध्यरात्रीपर्यंत चालू होती. आणि या कोलाहलात रमेशच्या 'जावा'चा सुपरिचित आवाज कुठं ऐकू येतोय का इकडे आम्हा सर्वांचे कान लागले होते.

यापूर्वी शिवासजवळ झालेली चुकामूक वेगळ्या प्रकारची होती. रस्ता एकच असल्यानं मागं राहिलेली मंडळी दुसऱ्या दिवशी आम्हाला येऊन मिळणार हे निश्चित होतं. पण ही दुक्कल पुढं गेली की मागं राहिली याबद्दलच संभ्रम होता. शिवाय अंकारा एवढं अवाढव्य पसरलेलं, की चुकलेले साथीदार शोधून काढणं केवळ कठीण! अशा वेळीच तर हिंमतीप्रमाणे हिकमतीचीही आवश्यकता असते. आम्ही रहाण्यासाठी ठिकाण निवडलं ते अगदी मध्यवर्ती ठिकाणी. खोल्या घेतल्या त्या रस्त्यालगत. गाड्या ठेवल्या त्याही अशा पद्धतीनं, की रस्त्यावरून जाणाऱ्यायेणाऱ्यांना त्या सहज दिसाव्यात!

सकाळीसकाळीच मी, एकनाथनं आणि सुधीरनं बरीच पायपीट करून आपली एम्बसी शोधून काढली. रविवार असल्यानं कामकाज बंद होतं. तरीही मी दारावरची बेल वाजवली. तिथंच रहात असलेले कुणीतरी अधिकारी बाहेर आले. मी त्यांना सगळी हकीगत थोडक्यात सांगितली. शिवाय रमेश–अविनाश एम्बसीत आल्यास, आम्ही ठीक दुपारी दोन वाजता अंकारा सोडून शंभर

किलोमीटर्सवर रस्त्यालगतचा निवारा पाहून मुक्काम ठोकणार आहोत, असा निरोपही देऊन ठेवला. त्या अधिकाऱ्यांनी निर्विकारपणे मान डोलवली आणि दार बंद करून घेतलं.

काळजीनं व्यग्र झालेले आम्ही एम्बसी हा एक आधार समजून आलो होतो. पण हाय! चुकामूक झालेल्या आमच्या मनांना दिलासा मिळणं दूरच राहिलं; उलट आमच्यातल्या कुणीतरी प्यायला पाणी मागितलं, तर या *गृहस्थानं* चक्क बागेला पुरवण्यासाठी ठेवलेल्या नळाकडे अंगुलिनिर्देश केला! ही गोष्ट निखालसपणे चीड आणणारी होती. वास्तविक पाणी पिणं हे निव्वळ निमित्त होतं. पाच मिनिटं स्वस्थपणे बसून सगळी हकीगत त्यांना सांगायची आमची इच्छा होती. पोलिसखात्याला साधा फोन करून, वायरलेसच्या मदतीनं सर्वत्र संदेश रवाना करून आमच्या साथीदारांचा शोध घेणं एम्बसीला मुळीच अशक्य नव्हतं. पण कसलं काय! आमचा सगळाच विरस झाला.

अधिक अस्वस्थ होऊन आम्ही जड अंतःकरणानं लॉजवर परतलो. – आणि काय आश्चर्य! आमच्या तीनही गाड्यांच्या रांगेत रमेशची चौथी 'जावा' दिमाखानं उभी होती! आमचे हरवलेले सहकारी आम्हाला येऊन मिळाले होते! मनावरचं मोठं दडपण दूर झालं. काळेठिक्कर पडलेले आमचे चेहेरे क्षणार्धात प्रफुल्लित झाले.

त्याचं असं झालं : आम्ही जेव्हा एम्बसीमधे चौकशीसाठी गेलो होतो, तेव्हा लॉजवर राहिलेला प्रभाकर खिडकीतून बाहेरची मौज लुटत होता. मुंबईतल्या महंमद अली रोडसारखा तो रस्ता रुंद होता. वाहनं वेगानं जातयेत होती. हॉर्नचे कर्णकर्कश आवाज सतत येत होते. सहाव्या मजल्यावरून दिसणारा वाहनांचा तो प्रवाह डोळे दिपवून टाकील असाच होता. त्या वाहनांच्या प्रवाहात 'फट्-फट्' करीत चाललेले आमचे 'जावा'वरचे वीर नेमके प्रभाकरच्या दृष्टीला पडले. क्षणाचाही विलंब न करता त्यानं होतीनव्हती तेवढी शक्ती एकवटून अगदी बेंबीच्या देठापासून शिट्ट्या वाजवायला सुरुवात केली. आणि भर वेगात चाललेला रमेश त्या विशिष्ट शिट्ट्यांच्या परिचित आवाजानं जागच्या जागी थांबला. बिनगजांच्या त्या खिडकीतून जास्तीत जास्त अंग बाहेर काढून प्रभाकरनं रमेशला बोलावून घेतलं. अशा रीतीनं केवळ परमेश्वराच्या कृपेन आम्ही सगळेजण पुनश्च एकत्र आलो.

पण या सगळ्या प्रकारामुळं अंकारा शहर पुन्हा एकदा फिरत वघण्याची आमची मुळीच इच्छा नव्हती. सुमारे वीस–वावीस तास आम्ही बेचैनीत काढले होते. त्यातून आम्ही उतरलो ते हॉटेल दुपारी वारा वाजेपर्यंत न सोडल्यास आणखी एका दिवसाचा पूर्ण आकार द्यावा लागला असता. या गोष्टीचा विचार करता, पुढं जाणंच सगळ्यांनी पसंत केलं.

अंकारा शहर बघण्यासारखं नक्कीच होतं. तुर्कीचे पहिले राष्ट्राध्यक्ष जनरल मुस्ताफा अतातुर्क यांनीच हे शहर राजधानीचं ठिकाण म्हणून घोषित केलं. सतरा लक्ष लोकसंख्येचे हे शहर अनेक डोंगरांवर वसलेलं आहे. शहराच्या एका भागातून दुसऱ्या भागात जायचं म्हणजे एक डोंगर पार करायचा, आणि दुसरा चढायचा. या शहरातली सार्वजनिक स्नानगृहं प्रसिद्ध आहेत, त्यांना 'हमाम' म्हणतात. वाष्पस्नानाची इथं व्यवस्था असते. मूलतःच अंघोळीचा कंटाळा असणाऱ्या तुर्की लोकांना शारीरिक स्वच्छतेसाठी प्रवृत्त करण्यासाठीच या 'हमाम'ची निर्मिती केली आहे की काय न कळे!

तुर्कस्तानची ही राजधानी इथल्या संस्कृतीचं केंद्रस्थानच झाली आहे. तुर्की पद्धतीचे 'होरोन', 'झेनेक' वगैरे खास नृत्यप्रकार या शहरात पहायला मिळतात. या नृत्यात शृंगाररसापेक्षा वीररसालाच महत्त्व अधिक. ढाल–तलवारींचा वापरही नाचात केला जातो. या लोकांचे राष्ट्रीय खेळही विचित्र. तेलानं सारं अंग माखून कुस्त्या खेळतात. त्याला 'यागली गुरूस' म्हणतात. घोड्यावरचे आणि उंटावरचे खेळही आवडीनं खेळले जातात. 'तावला' नावाचा बैठा खेळ 'काहवे' ऊर्फ कॉफीगृहात नेहमीच चालतो. या लोकांचं आवडतं पेय 'राकी'. 'राकी म्हणजे सिंहिणीचं दूध. वनस्पतींच्या अर्कापासून बनवलेलं हे पांढऱ्या रंगाचं पेय 'सिंहिणीचं दूध' कसं काय मानलं जातं, अल्ला जाणे! 'जोर्बा' ऊर्फ सुप्, 'पिलव' ऊर्फ खिचडी अन् 'केवाप' ऊर्फ कबाब हे प्रकार इथं कुठल्याही हॉटेलमधे असतातच. मुसलमानांच्या राज्यात केवळ गायी–बैलाचंच मांस खाल्लं जात असेल, ही आपली समजूत चुकीची आहे, माझ्या मते या देशांमधे शेळ्या, मेंढ्या अन बकऱ्यांच्याच मांसाला अधिक मागणी असावी. इराणमधे तर थेट स्वीडन–डेन्मार्कहून शेळ्यामेंढ्या भरभरून ट्रक्स येत असलेले

आम्ही प्रत्यक्ष बघितलेच होते.

अंकाऱ्याचं अखेरचं ओझरतं दर्शन घेऊन दुपारी दोनच्या सुमारास आम्ही 'आशिया खंडाचं पॅरिस' समजल्या जाणाऱ्या इस्तंबूलच्या दिशेनं गाड्या पिटाळल्या. आता चुकामूक होऊ द्यायची नाही असं ठाम ठरवून आम्ही चालतो होतो. पण तरीही तासाभरानं माझ्यात आणि इतर सहकाऱ्यांत अंतर पडलंच!

एका निर्जन, निबिड जंगलातून मी चालतो होतो. विजय माझ्या मागे बसला होता. अंकाऱ्याची पुनरावृत्ती नको म्हणून मी डोंगराच्या एका कड्यापाशी गाडी उभी केली, आणि त्या डोंगरांच्या बेचक्यात साठलेल्या जलाशयाकडे नजर टाकीत, मागं राहिलेल्या सहकाऱ्यांची वाट पहात थांबलो.

पाच मिनिटं झाली असतीलनसतील तोच समोरून एक जीप आमच्या पुढ्यात येऊन ठेपली, आणि पटापट पाचसहा अक्राळविक्राळ, हत्यारबंद तुर्की खाली उतरले क्षणार्धात त्यांनी आम्हाला घेरलं आणि विचित्र हातवारे करून ते भेडसावू लागले. आमची पाचावर धारण बसली. आता आम्ही पूर्ण लुटले जाणार य़ावद्दल शंकाच राहिली नाही. चंबळच्या खोऱ्यातून आम्ही निर्विघ्नपणे आलो होतो; पण या तुर्कस्तानात कल्पना नसताना हा भलताच प्रसंग गुदरला होता. वास्तविक अंकारा सोडल्यानंतर आम्ही पूर्णपणे निर्धास्त होतो. डॉलर्सचं पुडकं तर माझ्या अगदी वरच्या खिशात होतं. त्याचा वास या चांडाळचौकडीला आला होता का? "फरा... फरा" असं ते ओरडू लागले. आता मात्र आल्या प्रसंगाला तोंड देण्यातच आमची कसोटी होती. मी पटकन पुढे झालो आणि हस्तान्दोलनासाठी हात पुढं करीत गरजलो, "हिन्दोस्तान! ... हिन्दोस्तान!"

जादूची कांडी फिरावी तसा परिणाम माझ्या या नेमक्या शब्दांनी झाला! उगारलेले हात झटदिशी खाली आले, अन् हे चंगीजखानाचे वंशज मोठमोठ्यानं ओरडू लागले, "हिन्दोस्तान? ... हिन्दोस्तान? ... राज कपूर? रा ऽ ज कपूर?" मीही त्वरेनं तावडतोब उत्तरलो, "यस यस! राज कपूर! 'आवाज'! 'आवारा'!" अन् काय सांगू? त्या लुटारूंनी तत्क्षणी आम्हाला उचलून घेतलं आणि गिरक्या घेऊन ते अक्षरशः नाचू लागले. त्यांच्या हातातल्या शस्त्रांची जागा फिडलसारख्या तंतुवाद्यानं घेतली, आणि 'आवारा हूँ,

आसमानका तारा हूँ' या जगप्रसिद्ध गाण्याच्या स्वर्गीय सुरांनी सारा आसमन्त निनादून गेला.

अचानक झालेल्या या 'ट्रान्सफर सीन'मुळं आमच्या आनंदाला पारावार राहिला नाही. आम्हीही फेर धरून त्यांच्याबरोबर नाचू लागलो. भाषेचे बंध तुटून सुरांच्या जादूनं आम्ही एकमेकांजवळ आलो होतो. धन्य आमचा राज कपूर आणि आमची चित्रपटसृष्टी! धन्य ते शंकर–जयकिशन आणि धन्य त्यांचं ते वेड लावणारं संगीत!

कालिदासाचं 'शाकुंतल' डोक्यात घेऊन जर्मन कवी गटे नाचला ही गोष्ट नक्कीच खरी असली पाहिजे. रशियामधे राज कपूर–नर्गीस प्रख्यात आहेत हे मी ऐकलं होतं. पण तुर्कस्तानात, एवढ्या दूर जंगलामधे सामान्यातल्या सामान्य माणसाच्या हृदयात राजनं एवढं मानाचं स्थान पटकावलं आहे हे मात्र मला आजच कळलं.

एव्हाना आमचे इतर सहकारीही आले होते. आम्हा सर्वांना या तुर्की मित्रांनी बळेबळेच एका झाडीत नेलं. आम्हाला बघून प्रत्यक्ष राज कपूरलाच बघितल्याचा आनंद त्यांना मिळत असावा. त्यांच्यापैकी एकानं तर तंतुवाद्यावर 'घर आया मेरा परदेसी' या गाण्याचे स्वर इतके अचूक वाजवून दाखवले, की आम्ही चकितच झालो. आमच्यासाठी खास चवदार मासेही त्यांनी तळायला सुरुवात केली. त्यांनी मोठ्या प्रेमानं दिलेल्या 'व्होडका'चा अव्हेर करणंही आम्हाला कसं शक्य होतं? त्यांच्यापैकी एकानं तर संजीवला बरोबर घेऊन त्याच्याच मोटरसायकलवरून जाऊन जवळच्या खेड्यातनं वांगी, बटाटे, कांदे आणि मिरच्या आणल्या. तेल त्यांच्याकडे होतंच. एकनाथनं स्वैंपाकाचा 'चार्ज' घेतला. एकीकडे 'व्होडका'चे राउंड्स चालूच होते. त्यातच पावसाची एक जोरदार सर आली. 'बरसातमें हमसे मिले तुम भी सजन तुमसे मिले हम' या गाण्यानं जोर धरला. आम्ही बेभान झालो होतो. या तुर्की मित्रांच्या सहवासात पूर्णपणं रंगून गेलो होतो. एकनाथचा आज वाढदिवस होता. तो इतक्या अकल्पितपणे, धुंद वातावरणात साजरा होईल, असं अंकारा सोडताना कुणाला वाटलं तरी होतं का?

या तुर्की मित्रांना सोडून जाताना आम्हाला जड जात होतं. आम्ही त्यांच्या घरी रहावं असा त्यांनी आग्रह धरला होता. त्यांचं मन मोडवत नव्हतं; पण पुन्हा मागे जायची कल्पनाही मानवणारी नव्हती. आमचं अंतिम उद्दिष्ट असलेलं रोम अजून कितीतरी दूर होतं. या तुर्की मित्रांना 'गुले–गुले' ऊर्फ गुडबाय करण्यासाठी आम्ही हात उंचावले, आणि काय सांगू? बाह्यतः क्रूर वाटणाऱ्या त्या लोकांच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले. त्यांच्यापैकी प्रत्येकानं न रहावून आम्हाला आलिंगन दिलं, आणि मग मोठ्या प्रेमानं त्यांच्या जवळ असलेलं फ्राइंग पॅन ऊर्फ तवा आठवण म्हणून आम्हाला भेट देऊन टाकला. भारावलेल्या अंतःकरणानं अन् पाणावलेल्या डोळ्यांनी त्यांचा निरोप घेऊन आम्ही आमच्या गाड्या गतिमान केल्या.

जेमतेम पन्नास–साठ किलोमीटर्स अंतर कापून, काळोख पडण्यापूर्वी एका गावात मुक्काम ठोकून, दुसऱ्या दिवशी आम्ही बोलू, अडापाझरी, इझमिट वगैरे गावं पहातपहात इस्तंबूलच्या दिशेनं आगेकूच करीत होतो. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत इस्तंबूलला पोचणं आज अगदी शक्य होतं. पण विधिलिखित तसं नव्हतं! एरवी बोलूच्या घाटात झिमझिम पडणाऱ्या पावसानं निसरड्या झालेल्या रस्त्यात प्रभाकर घसरून पडला नसता; अन् त्यापुढंच काही अंतरावर माझी गाडीही पंक्चर झाली नसती!

आमचा चांगलाच खोळंबा झाला. भूक तर कडाडून लागली होती. पण या निर्जन घाटात आम्हाला काय मिळणार होतं? सुदैवानं आमच्याबरोबर थोडी वांगी होती. पण बाकी मालमसाला काहीच नव्हता. अखेर चार काटक्या गोळा केल्या, शेकोटी पेटवली अन ती वांगी निव्वळ भाजून तशीच गट्ट केली.

थंडी कडाक्याची होती. त्यामुळं तसाच प्रवास करीत अगदी अपरात्री इस्तंबूलला पोचणं शहाणपणाचं ठरलं नसतं. भुकेला कोंडा तसा निजेला धोंडाही आम्हाला चालण्यासारखा होता. पण आमच्या नशिबानं अगदी थोड्या अंतरावर एक मशीद दिसली. सुरुवातीला आमची शिरस्त्राणं बघून त्या मशिदीच्या इमामाला आम्ही सैनिकच वाटलो. तो आम्हाला आसरा द्यायला तयार होईना. पण तेवढ्यात गस्त घालणारे पोलिस आमच्या मदतीला धावून आले. त्यांच्या

सांगण्यावरून इमामानं जेमतेम मशिदीच्या ओसरीवर झोपायची परवानगी दिली. पण आम्ही महा वस्ताद! 'भटाला दिली ओसरी अन भट हातपाय पसरी' या उक्तीनुसार, इमाममहोदयांचा डोळा लागताच आम्ही बिनधास्तपणे मशिदीच्या गाभाऱ्यात ताणून दिली!

आज आमचा प्रवास 'मारमारा' नावाच्या समुद्राच्या किनाऱ्यानं चालला होता. इझमिट पार करून आम्ही इस्तंबूल शहरापासून अवघ्या पंचवीस किलोमीटर्सवर आलो होतो. प्रत्यक्ष शहरात रहाण्यापेक्षा जरासं दूरच रहाणं अनेक दृष्टींनी फायद्याचं असतं, ही खूणगाठ आम्ही मनाशी बांधली होती. शिवाय इस्तंबूलसारख्या शहरात वाहनांच्या चोरीचं भयही होतंच. पार्किंगच्या समस्येमुळं दुचाकी वाहनांना या शहरात कित्येक ठिकाणी प्रवेशच दिला जात नाही, हेही आम्हाला अनेकांनी सांगितलं होतं. त्यामुळं गेवझे आणि पेंडिक या दोन उपनगरांच्या मधे एका पेट्रोलपंपालगतच्या हॉटेलात आम्ही मुक्काम ठोकला. या ठिकाणापासून इस्तंबूल शहरात जाण्यासाठी मॅटॅडोरसारख्या छोट्या वाहनांची सोय होती. आमच्यापैकी चौघेजण हॉटेलवरच थांबले, आणि मी, रमेश, संजीव आणि विजय या मॅटॅडोरनं इस्तंबूलकडे निघालो. या बसमधे माणसं अगदी खच्चून भरली होती. एक तुर्की तरुणी तर विजयला बिलगूनच बसली होती. त्याच्या खिशातल्या सिगारेटच्या पाकिटावर तिची नजर खिळली होती. अखेर उतरताउतरता तिनं लाडिकपणे सिगारेट मागितलीच. विजयनंही मोठ्या तत्परतेनं त्याच्याजवळचं इराणी सिगारेट्सचं पाकिट पुढे केलं. पण हाय रे दैवा! सिगारेट्ससाठी हपापलेली ती तुर्की तरुणी विजयकडच्या इराणी सिगारेट्सना हातही लावायला तयार होईना. तुर्की लोकांना इराणी गोष्टींविषयी एवढा तिरस्कार असावा याचं आम्हाला नवल वाटलं. विजय मात्र या घटनेनं भलताच नर्व्हस झाला.

प्रवासी चेक्स वटवण्यासाठी आम्ही प्रथम बँकेकडे धाव घेतली. इथल्या बँकांची नावं मोठी गमतीदार. 'तुर्क तिकारेट बँकासी', 'यापी वे क्रेडी बँकासी', 'तुर्कीचे बँकासी' वगैरे बँका प्रमुख मानल्या जातात. या बँकांमधे

स्त्री-कर्मचारीच अधिक होते. कदाचित इथल्या स्त्रिया आकडेमोडीत पुरुषांपेक्षा अधिक हुशार असाव्यात!

इस्तंबूल शहरातल्या कारेकॉय या भागात आम्हाला जायचं होतं. 'एक्स्पेरिमेंट इन् इन्टरनॅशनल लिव्हिंग' या संस्थेच्या एक कार्यकर्त्या या भागात रहात होत्या. त्यांच्या नावे आम्हाला एक परिचयपत्र मिळालं होतं.

कारेकॉयला जायचं म्हणजे बोटीचा प्रवास आला. मुंबईतल्या लोकल्ससारखी या बोटीची ये-जा चालू असते. बॉस्फरसच्या या खाडीत नांगरलेल्या अनेक देशांच्या बोटी बघून मला एखाद्या युद्धपटाचीच आठवण होत होती.

आम्हाला हवा असलेला पत्ता सहजासहजी मिळाला. या कार्यकर्त्या बाई जन्मानं तुर्की असल्या, तरी अमेरिकेत अनेक वर्षं वास्तव्य केल्यानं त्या इंग्रजी अगदी सफाईदारपणे बोलत होत्या. तुर्कस्तानात आज आम्ही प्रथमच इंग्रजीतून मनमोकळ्या गप्पा मारत होतो. जिथं इंग्रजी कुणी बोलू शकत नाही तिथं इंग्रजी जाणणारी व्यक्ती भेटली म्हणजे केवढा दिलासा वाटतो!

या बाईंनी आमचा पाहुणचार तर केलाच; पण लॉजवर राहिलेल्या आमच्या सहकाऱ्यांसाठीही मोठ्या प्रेमानं पेटीभर केक आणि फळं भेट दिली. परदेशात मिळालेल्या या मायेनं आम्ही खूपच सुखावलो होतो.

दुसऱ्या दिवशी आम्ही सगळे एकत्रितपणं इस्तंबूल शहर बघायला बाहेर पडलो.

इस्तंबूल हे आशिया खंडातलं नावाजलेलं शहर. प्राचीन रोमन साम्राज्याची ही राजधानी. त्या काळी या शहराचं नाव होतं. 'कॉन्स्टँटिनोपल'. मारमारा समुद्र आणि काळा समुद्र यांच्या संगमातून निर्माण झालेल्या बॉस्फरसच्या सामुद्रधुनीवरच ते नेमकं वसलं आहे. या शहराचा अर्धा भाग आहे आशिया खंडात, अन् अर्धा युरोप खंडात! पूर्वीच्या काळी आशिया खंडातून युरोपमधे जायला बोटीशिवाय पर्याय नसायचा. हल्ली मात्र बॉस्फरसच्या या सामुद्रधुनीवर प्रचंड असा पूल बांधला गेला आहे. या पुलाला खालून काहीच आधार नाही. त्यामुळं मोठमोठी जहाजं याच्या खालून सहज जाऊ शकतात. या भागात कायम धुकं असतं. आपल्याकडच्या 'लोकप्रभा' जहाजाची रशियन जहाजाशी टक्कर

झाली ती बॉस्फरसच्या सामुद्रधुनीतल्या दाट धुक्यामुळंच!

इस्तंबूलला आशियाचं 'पॅरिस' म्हणतात; परंतु या शहराचा बराचसा भाग खास आशियाई ढंगाचा आहे. शहराच्या मध्यभागातच उत्तुंग मिनार असलेली भव्य निळीशार मशीद आहे. तुर्कस्तानचा प्रख्यात वास्तुशिल्पकार मिनार यानं ही मशीद मोठ्या कलापूर्ण पद्धतीनं बांधली आहे. युरोपच्या रस्त्यावर आशियाई संस्कृतीची ही शेवटची निशाणीच म्हटली तरी चालेल.

सुप्रसिद्ध 'गलाटा ब्रिज' जवळ समुद्राच्या पाण्यात असंख्य मचवे नांगरलेले होते. नुकतेच पकडलेले ताजे मासे तिथंच तळून पावाबरोबर दिले जात होते. माझ्या आणि अट्टल मासेखाऊ अविनाशच्या तोंडाला ते मासे पाहून पाणी सुटलं. माशांना या देशात 'बालिक' म्हणतात. मुंबई सोडल्यापासून आज प्रथमच मनसोक्त मासे खाण्याची हौस आम्ही भागवून घेतली.

'टोपकापी पॅलेस' हे या शहरातलं दुसरं प्रेक्षणीय ठिकाण. तुर्की सम्राट आटोमन यांचा दरबार याच प्रासादात भरायचा. या राजवाड्याची भव्यता डोळे दिपवणारी आहे.

आशियाई आणि युरोपियन संस्कृतीची विचित्र सरमिसळ या शहरात झाली आहे. इस्लाम धर्माचं प्राबल्य इथं पदोपदी जाणवत असलं, तरी युरोपियन पद्धतीची वेषभूषा आणि रीतिरिवाजही लोकांच्या पसंतीस उतरले आहेत. इस्तंबूलचे लोक वर्णानं लालभडक अन शरीरानं मजबूत आहेत. त्यांच्या मानानं अंकाऱ्याचे लोक जरा मागासलेलेच. तुर्कस्तानातल्या पश्चिमेकडच्या भागात रहाणारे लोक पूर्वेकडच्या रहिवाशांचा तिरस्कार करतात. इस्तंबूल आणि अंकारा या शहरांमधल्या रहिवाशांमधली तेढ महा भयंकर! त्या मानानं आपल्या पुण्या–नागपूरच्या लोकांमधला वाद कितीतरी सौम्य आणि मवाळ! तुर्कस्तानमधल्या सगळ्या संपत्तीचं केंद्रीकरण इस्तंबूल शहरात आणि पश्चिम–भागातच झालंय. अंकारा आणि त्याच्या पूर्वेकडचा प्रदेश त्या मानानं उपेक्षित आहे हे आम्हालाही जाणवलं. परिणामतः या देशाचा पूर्वभाग गरिबीनं गांजलेला; तर पश्चिमेकडे संपत्तीचा महापूर! अशा या विषम अर्थव्यवस्थेमुळेच या ठिकाणी साम्यवादाची बीजं तग धरू पहाताहेत!

इस्तंबूलमधल्या बाजारातून फेरफटका मारीत असताना आम्हाला एखादा स्टोव्ह घ्यावासं वाटलं. पण स्टोव्ह कुठं दिसेना. त्याला तुर्की भाषेत काय म्हणतात हे कुणा लेकाच्याला ठाऊक होतं? खात्रीचा उपाय म्हणून मी चक्क स्टोव्हचं चित्र खरडलं. त्याबरोबर दुकानदाराला आमची गरज उमगली. गॅसचं सिलिंडर असलेला एक अजब स्टोव्ह आम्हाला स्वस्तात मिळाला.

इस्तंबूलच्या भ्रमंतीतच आम्हाला झुल्पिकार अली भुत्तो पदच्युत झाल्याचं समजलं. संध्याकाळच्या झाडून सगळ्या वर्तमानपत्रांनी ही बातमी ठळकपणं दिली होती. वर्तमानपत्रं घेण्यासाठी त्या दिवशी लोकांची एकच झुंबड उडाली होती. लोक आम्हाला पाकिस्तानी नागरिक समजून जागोजागी थांबवीत होते आणि आमची प्रतिक्रिया विचारीत होते.

इस्तंबूल शहरातलं सगळ्यात मोठं आकर्षण म्हणजे नाइटक्लब्ज! 'वेबेक', 'माक्सीम गाझीनोसू' वगैरे हॉटेल्स 'खास' नृत्यप्रकारांसाठी प्रसिद्ध आहेत. आमच्या दुर्दैवानं या रंगीन दुनियेच्या जवळपास फिरकणंही आम्हाला परवडणारं नव्हतं. त्यामुळे काहीशा आंबट तोंडानंच आम्ही लॉजकडे वळलो.

या लॉजमधे रहाणं सुरक्षित नाही हे एव्हाना आमच्या लक्षात आलं होतं. रात्रीच्या वेळी सारखं कुणी ना कुणी चाव्या लावून चक्क दार उघडून आत यायचं आणि काळोखातच आमचं सामान चाचपून बघायचं. आम्ही रात्रभर जागे असायचो म्हणून बरं. नाहीतर तुर्की चोरांनी आम्हाला नेसत्या वस्त्रानिशीच मायदेशी परत पाठवलं असतं!

हा लॉज सोडताना मालकानं बिलावरून भांडण • उकरून आम्हाला धाकदपटशा दाखवून पाहिला. पण त्याला भीक न घालता आम्ही ठरल्याप्रमाणंच त्याच्या हातावर पैसे टेकवून पुढे निघालो.

इस्तंबूल शहराला 'गुले गुले' करीत आम्ही बॉस्फरसच्या सामुद्रधुनीवरचा प्रचंड पूल ओलांडला आणि युरोपखंडात पदार्पण केलं. तुर्कस्तानातला प्रवास आता अगदी थोडाच राहिला होता. या देशातला आमचा सगळा प्रवास मुख्यत्वे करून मध्यभागातूनच झाला होता. एर्झुरूमपासून उत्तरेकडे जाऊन गुमशान, ट्राबझोन, ओर्डू, सॅमसन वगैरे गावातून काळ्या समुद्राच्या किनाऱ्याकिनाऱ्यानं

आम्हाला प्रवास करता आला असता. परंतु कित्येक वेळा या काळ्या समुद्राचं पाणी रस्त्यावर येऊन वाहतूक बंद पडते. त्यामुळे मध्यमार्ग जरासा धोकादायक आणि खडकाळ असला तरी तोच आम्ही स्वीकारला होता. या देशाच्या दक्षिणेकडेही भूमध्यसमुद्र पसरला असून, एकूण किनारपट्टी तब्बल सात हजार किलोमीटर्सवर लांबीची आहे. पण एवढं असूनही इस्तंबूलचा एक अपवाद वगळता मोठी बंदरं नाहीतच. दक्षिण–किनाऱ्याला अंटाल्या नावाचं निसर्गरम्य ठिकाण आहे. गरम पाण्याचे झरे अनेक ठिकाणी असतात. पण इथं तर असे धबधबेच आहेत. अन् या धबधब्यांच्या पायथ्याचा सगळा भूभाग पांढरा झाला आहे. रोमन काळातलं एक स्टेडियमही अद्याप जसंच्या तसं उभं आहे.

मजल–दरमजल करीत कोरलू, लुलेबुझर्ग, बाबाएस्की, हावसा या मार्गे आम्ही एडिर्ने या तुर्कस्तानच्या शेवटच्या शहराजवळ आलो आणि एका पेट्रोलपंपाचा आडोसा बघून गाड्या थांबवल्या. आजपासून आम्हाला हॉटेलची आवश्यकता अशी भासणार नव्हती. आमच्याजवळ गॅसचा स्टोव्ह होता. आम्ही स्वावलंबी झालो होतो. आजपासून आमच्या स्वैपाकाला सुरुवात झाली होती. आमच्या दृष्टिपथात असलेला पुढचा देश – बल्गेरिया – कसा असेल याची चित्रं मनातल्या मनात रेखाटत, आम्हीच केलेला बटाट्याचा खमंग रस्सा तुर्की 'एकमेक'बरोबर फस्त करून आम्ही बसल्या जागीच पथारी पसरली.

⌘ ⌘ ⌘

(६)

# "दोब्रो दोश्ली!"

अफगाणिस्तान, इराण आणि तुर्कस्तान या वैराण, रखरखीत देशांमधला प्रवास संपवून आज आम्ही पूर्व–युरोपच्या नंदनवनात – बल्गेरियात प्रवेश करीत होतो.

हसऱ्या चेहेऱ्याच्या स्त्री–कस्टम–ऑफिसर्सनी आमच्या मोटरसायकलवरची 'इण्डिया' ही अक्षरं वघताच 'दोब्रो दोश्ली' म्हणत आमचं स्वागत केलं. आतापर्यंतच्या प्रवासात असा गोड अनुभव आम्हाला प्रथमच येत होता. गुलाबी वर्णाच्या या सुंदर–सुडौल युवती कस्टमखात्याच्या रुबाबदार गणवेषात अधिकच आकर्षक दिसत होत्या. आपल्याकडच्या काश्मिरी युवतीही निःसंशय सुंदर आहेत. पण गरिबी आणि सामाजिक बंधनं यामुळं या निस्तेज वाटतात. याउलट पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून वावरणाऱ्या या बल्गेरियन स्त्रियांचं सौंदर्य उठून दिसत होतं.

बल्गेरियात प्रवेश करायला भारतीयांना काहीच अडचण येत नाही. व्हिसा मिळवण्याची यातायात करावी लागत नाही. भारत हे त्यांचं मित्रराष्ट्र. त्यामुळं 'एन्ट्री परमिट' तावडतोब मिळतं.

हा देश इवलासा आहे, आपल्याकडच्या चार जिल्ह्यांएवढा. इथलं चलन घ्यायला प्रवासी फारसे उत्सुक नसतात. कारण चोवीस तासांत हा देश पार करता येतो. पण कायद्यानुसार माणशी पाच डॉलर्सच्या बल्गेरियन 'लेवा' घ्याव्याच लागतात. हे चलन खूपच भारी आहे. एक डॉलरच्या बदल्यात जवळजवळ एकच 'लेवा' मिळते. म्हणजे आम्हा आठजणांना चाळीस डॉलर्स नाहक मोडावे लागणार होते. बरं घेतलेल्या लेवा याच देशात उपयोगाच्या. इतरत्र त्यांना कोण विचारणार? म्हणजे आमच्या दीड दिवसाच्या प्रवासात तीनशे–साडेतीनशे रुपयांचा भुर्दंड निष्कारणच होणार होता. मग आम्ही एक

युक्ती केली. त्याच दिवशी संध्याकाळच्या आत आम्ही बल्गेरिया पार करणार आहोत असं दिलं ठणकावून सांगून! अखेर आठजणांत वीस डॉलर्सच्या 'लेवा' घेण्याची परवानगी आम्हाला मिळाली. प्रत्येकाच्या वाट्याला अडीच लेवा आली. एवढंच तुटपुंजं बल्गेरियन चलन जवळ बाळगून आम्ही 'प्लॉव्हदिव'कडे निघालो.

आतापर्यंतच्या आमच्या प्रवासात मदिरा आणि मदिराक्षी यांचं दर्शन दुर्मिळच होतं. पण इथं तर बीयरसारख्या पेयाची वाहतूक स्त्रियाच करीत होत्या. 'आरे'च्या दुधाची वाहतूक करतात, तसे इथं स्त्रिया बीयरचे क्रेटच्या क्रेट्स छोट्याछोट्या टेंपोमधून सर्रास नेत होत्या.

बल्गेरियात शिरताक्षणीच जाणवलेली गोष्ट म्हणजे इथल्या लोकांचे अतिस्वच्छ कपडे. व्यक्तिगत जीवनाप्रमाणंच सामाजिक जीवनातही स्वच्छतेचं महत्त्व अनन्यसाधारण! इथल्या कुणाही व्यक्तीचा पेशा काहीही असो, कपडे अस्वच्छ दिसणार नाहीत.

सरहद्दीजवळची स्वेलिनग्राडसारखी गावं ओलांडल्यावर आम्ही एका स्वप्नमय प्रदेशातून चाललो होतो. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या हजारो झाडांवरच्या सफरचंदांचा नुसता सडा पडला होता. ही सफरचंदं गोळा करायलाही कुणी फिरकत नव्हतं. गाड्या थांबवून आम्ही मनसोक्त सफरचंदं खाल्ली. शक्य तितकी बरोबरही घेतली. एवढी चवदार सफरचंदं जगाच्या पाठीवर क्वचितच कुठं मिळत असतील! रस्त्यावर पडलेली सफरचंदं चक्क तुडवीतच आम्हाला गाड्या चालवाव्या लागत होत्या.

फळांप्रमाणं फुलांचीही विपुलता पदोपदी जाणवत होती. छोट्याछोट्या गावातही प्रत्येक घरासमोर आणि गल्लीगल्लीतही असंख्य फुलझाडं लावलेली होती. नगरीचं सौंदर्य वाढवण्यासाठी नगरशासनानंच फुलझाडं लावण्याची ही बल्गेरियामधली पद्धत निश्चितच अनुकरणीय आहे. या बहरलेल्या फुलझाडांकडे बघितल्यावर जाणाऱ्या-येणाऱ्या नागरिकांचं मन का प्रसन्न रहाणार नाही?

गंमत अशी की, प्लॉव्हदिवसारख्या औद्योगिक शहरातही या फुलझाडांनी आमची साथ सोडली नाही. तिथं तर एका आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शनाची तयारी चाललेली होती, अन् ही संधी साधून प्लॉव्हदिवच्या राजपथावर सुमारे दोन किलोमीटर्सपर्यंत लालभडक कर्दळीची झाडं इतक्या रेखीवपणं लावलेली होती, की आकाशातून पाहिलं तर या नगरीला लाल फुलांचा हारच घातलाय

असं वाटावं! खरोखर बल्गेरिया हा फळाफुलांचा देश आहे असं म्हणतात, त्याचा पूर्ण साक्षात्कार इथं होतो.

वाटेत सुंदरसं हॉटेल दिसताच आम्ही गाड्या थांबवल्या. बल्गेरियन जेवण कसं असेल याचं कुतूहल आम्हाला होतंच! देश साम्यवादी असल्यानं स्वस्तात मस्त जेवण असणार अशी आमची भाबडी समजूत होती. प्रत्यक्षात मात्र पदार्थांच्या किंमती बघून आमची भंबेरी उडाली. पण आता काहीच न घेता बाहेर तरी कसं पडणार? त्यामुळं नाइलाजास्तव आम्ही ऑम्लेटस् आणि सॅलड ऊर्फ कोशिंबीर मागवली. कोशिंबिरीत कसलीशी पानंच अधिक होती अन् ती अगदीच बेचव होती. त्यामुळं वैतागून प्रभाकरनं वेटरला हिरव्या मिरच्या आणण्याचं फर्मान सोडलं. बऱ्याच वेळानं वेटर एका भल्यामोठ्या बशीत एकच मिरची घेऊन आला. आम्ही बुचकळ्यात पडलो, हा कद्रूपणा कशासाठी? मागाहून त्याचं स्पष्टीकरण मिळालं. या देशामधे मिरच्या फारच महाग आहेत. एका मिरचीला जवळजवळ दीड रुपया पडतो! चहाची इथली पद्धतीही पूर्वी पाहिलेल्या देशापेक्षा खूपच निराळी होती. दोरीनं बांधलेल्या चहाच्या लहानलहान पुड्या उकळत्या पाण्यात सोडायच्या आणि हवा तसा चहा कमीअधिक 'स्ट्राँग' करून प्यायचा! आमच्याजवळच्या प्रत्येकी अडीच लेवांपैकी एकएक लेवा तर याच हॉटेलात संपली. बल्गेरियात एवढी महागाई तर पुढं काय वाढलेलं असेल, या विचारानं आमची मती गुंग झाली.

संध्याकाळच्या सुमाराला आम्ही कोस्तनेक या छोट्याशा गावाजवळ आलो होतो. दीड लेवामधे प्रत्येकाला ती रात्र आणि उद्याचा दिवस काढायचा होता. त्यामुळं रात्रीचा मुक्काम बिनपैशात करणं आवश्यक होतं. इतर देशांप्रमाणे पेट्रोलपंपाच्या आधारानं रहाणं जमणार नव्हतं; कारण थंडी मरणाची होती. त्यातून रमेशला किंचित ताप आल्यासारखं वाटत होतं. गावातल्या चौकात गाड्या उभ्या करून आम्ही विचारविनिमय करू लागलो. पाच मिनिटात पन्नास माणसं आमच्या भोवती गोळा झाली. आमच्या हातवाऱ्यांवरून त्यांना आमची गरज समजली. एकानं ताबडतोब आम्हाला त्याच्या घरी पाचारण केलं. बल्गेरियन माणसाचं जीवन जवळून पहाण्याची संधी अगदी सहजासहजी आमच्याकडे चालून आली. आम्ही त्या इसमाचं आमंत्रण तत्काळ स्वीकारलं.



**बहरलेली फुलझाडं : प्रसन्न नागरिक**

ते एक ख्रिश्चनधर्मीय कुटुंब होतं. चार खोल्यांचं छोटंसं घर होतं. त्यातल्या एका खोलीत आम्हा आठजणांना निवारा मिळाला. तो दिवस कसल्यातरी बल्गेरियन फेस्टिव्हलचा होता. समोरच्या हॉटेलमधे शेकडो लोक नाचगाण्यासाठी जमले होते. वाद्याचे सूर मध्यरात्रीपर्यंत ऐकू येत होते. कडाक्याची थंडी पडली होती. बल्गेरियातली ती आमची ऐकमेव रात्र संपून दिवस केव्हा उजाडला ते कळलंच नाही.


बल्गेरियातल्या या छोट्या खेड्यातही गरम पाणी सार्वजनिक नळांवाटे पुरवलं जातं. आमच्यासारख्या प्रवाशांना तर ही गोष्ट पथ्यावरच पडली. आम्हाला आसरा दिलेल्या त्या दयाळू कुटुंबाचा निरोप घेऊन आणि दूध–पावाची न्याहरी करून खिशात फक्त प्रत्येकी एक लेवा शिल्लक राहिलेली असताना आम्ही 'सोफिया'कडे निघालो.

सोफिया ही बल्गेरियाची राजधानी. या देशावर तुर्की आक्रमणं वारंवार होत. रोमन सम्राट कॉन्स्टन्टाइन यानंही काही काळ या देशावर सत्ता गाजवली. जर्मन फॅसिस्टांनी तर या देशाची साफ धूळधाण उडवली होती, पण दुसऱ्या महायुद्धाच्याच राखेतून एक ठिणगी बाहेर आली. आणि सारी बल्गेरियन जनता

स्वातंत्र्याच्या अन् समाजवादाच्या ईर्ष्येनं पेटून उठली. सोव्हिएत रशियाच्या मदतीनं ९ सप्टेंबर १९४४ रोजी बल्गेरिया समाजसत्तावादी, स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र म्हणून घोषित झालं.

उत्तरेला रुमानिया, पूर्वेला काळा समुद्र अन् तुर्कस्तानचा काही भाग, दक्षिणेला अल्बानिया अन् पश्चिमेला युगोस्लाव्हिया असलेला हा चिमुकला देश. आकाराच्या अन् लोकसंख्येच्या मानानं इथली राष्ट्रीय संपत्ती विपुल आहे. उत्तम हवामान, निसर्गदत्त औषधी पाण्याचा मुबलक पुरवठा, कसदार जमीन आणि कष्ट करणारे लोक यामुळं भारताएवढाच वयानं असलेला देश आज स्वतःच्या पायावर उभा आहे. इथल्या लोकांचं आयुर्मानही बरंच असतं. सर्वसामान्यतः पन्नास वर्षापर्यंत मृत्यूचं भय नसतंच. शतायुषी लोक तर इथं शेकड्यांनी आहेत.

साम्यवादी राष्ट्रात माणूस अगदी यंत्रच बनला असणार अशी इतरांप्रमाणं आमचीही समजूत होती. साहित्य, शास्त्र, शिल्प, संगीत यांचं त्यांना वावडं



सोफिया विद्यापीठ, बल्गेरिया

असणार, अन् या वर्गरहित समाजरचनेत सामान्य माणूस मानेवर जू ठेवलेल्या बैलाप्रमाणं मूकपणं राबत असेल, अशीच आमची कल्पना. त्यामुळं या देशात 'कलेचं कलेवर' झालेलं असणार असं आम्ही गृहीत धरून होतो.

पण वस्तुस्थिती अगदी उलट होती. शासनाचं कलाप्रेम आणि नागरिकांची रसिकवृत्ती जागोजाग सिद्ध होत होती. सोफियामधली 'नॅशनल आर्ट गॅलरी' ही याची जिवंत साक्ष होती. वितोशा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या बोयाना चर्चवरची चित्रकृतीही याचंच द्योतक म्हणावी लागेल. बल्गेरियन नेता वासील लेवस्की याचा भव्य पुतळा हा शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. संगीताबद्दल तर हा देश पूर्व युरोपमधे मशहूर आहेच. ऑरफ्युअस हा जगप्रसिद्ध संगीतकार बल्गेरियामधलाच. संगीताचा एक राष्ट्रीय सप्ताहच सोफियामधे दर वर्षी फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो, रात्रीच्या वेळी संगीत आणि नृत्य यातच बहुतेक लोक तल्लीन झालेले दिसून येतात. दिवसभराचं काम काटेकोरपणं करून सगळा वेळ देशाच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी इमानेइतबारे लावल्यानंतर या श्रमजीवी लोकांना रात्रीच्या प्रशांत वेळी स्वातंत्र्याचा उपभोग मनमुरादपणे घेण्यात एक वेगळीच मौज वाटत असणार!

बल्गेरियन भाषा समजणं महाकठीण. 'सोफिया' म्हणजे सूज्ञपणा. भाषेच्या लिपीचा मात्र काहीच अर्थबोध होत नाही. इंग्रजी भाषेचा वापर तर इथं औषधापुरताही होत नाही.

सोफियाला आम्ही पोचलो तेव्हा सकाळचे नऊ वाजलेले होते. सोफिया शहर पाहून साधारणपणं तीनच्या सुमारास सरहद्द गाठायची, असा आमचा बेत होता. सरहद्द इथून अवघ्या ऐंशी किलोमीटर्सवर होती. सामान्यतः राजधानीचं ठिकाण देशाच्या मध्यवर्ती भागात असतं. निदान ते सरहद्दीपासून फारसं जवळ नसतं. पण सोफिया या गोष्टीला अपवाद आहे.

सोफिया हे आंतरराष्ट्रीय रेल्वेस्थानकही आहे. थेट मॉस्कोपासून येणारी 'डॅन्यूब एक्स्प्रेस', 'फ्रँकफुर्ट'हून येणारी 'इस्तंबूल एक्स्प्रेस', वॉर्सा–बुखारेस्टमार्गे येणारी 'कार्पापियन एक्स्प्रेस', इतकंच नव्हे तर लंडन ते इस्तंबूल अशी लांब पल्ल्याची जगप्रसिद्ध 'ओरिएण्ट एक्स्प्रेस' या गाड्या सोफियाला थांबूनच पुढं जातात. रेल्वेचं जाळं युरोपात एवढं प्रचंड पसरलेलं आहे, की शाळांच्या सहलीसुद्धा एका देशातून दुसऱ्या देशात नेणं सोपं झालं आहे.

सोफिया शहरात आम्ही शिरलो आणि तटातूट या गोष्टीचा पुनः प्रत्यय आला. एका भल्यामोठ्या चौकात नेमकी माझी गाडी पेट्रोल संपल्यानं बंद पडली. सिग्नल मिळाल्यानं बाकीचे सहकारी चौक ओलांडून पुढं निघून गेले. मला मात्र खाली उतरून गाडी बाजूला न्यावी लागली. पेट्रोलपंप जवळच पण एका गल्लीत आतल्या बाजूला होता. तिथं जाऊन प्रथम पेट्रोल भरणं क्रमप्राप्त होतं.

पेट्रोलपंपावर गाड्यांची बरीच मोठी रांग होती. एकापाठोपाठ एक अशा पद्धतीनं सगळेजण अगदी शांतपणं पेट्रोल भरून घेत होते. घिसाडघाई कुणी करीत नव्हते. सारं कसं शिस्तीत चाललं होतं. आम्ही दोघे मात्र बेचैन झालो होतो. आमच्या हाडीमांसी खिळलेल्या सवयीनुसार आम्ही आमची गाडी इतर वाहनांतून वाट काढीत सर्वांपुढे नेऊन उभी केली. त्याबरोबर सगळेजण हॉर्न वाजवून या अतिक्रमणाबद्दल निषेध व्यक्त करू लागले. चूक लक्षात येताच आम्ही खजील झालो. पण नंतर, आम्ही परदेशी प्रवासी आहोत एवढाच मुद्दा लक्षात घेऊन आम्हाला त्वरित पेट्रोल देण्यात आलं.

पण आता आमच्या सहकाऱ्यांना शोधणं फार कठीण होतं. एक तर या शहरातल्या रस्त्यांवर पिवळ्या रंगाच्या गुळगुळीत फरश्या बसवलेल्या असल्यानं गाड्या थांबवून चौफेर नजर टाकून पहावं, तर तेही शक्य नव्हतं. आता सहकाऱ्यांचा शोध घेत बसण्यापेक्षा एम्बसीच गाठावी, असा मी विचार केला. एका बल्गेरियन मोटरवाल्यानं आम्हाला भारतीय वकिलातीपुढं अचूक आणून सोडलं.

शुक्ला नावाचे थर्ड सेक्रेटरी खिलाडू–वृत्तीचे वाटले. त्यांनी आमची विचारपूस केली. एम्बसीमधेच सामान ठेवून, गाडी 'पार्क' करून मी आणि विजय सोफिया शहर बघायला बाहेर पडलो.

आपल्या मुंबईच्या 'फोर्ट'सारखाच हा भाग होता. फरक इतकाच की इथं रस्त्यावरचे फेरीवाले नव्हते. सोव्हिएत स्वातंत्र्यसैनिकांचं स्मारक या शहरात आहे. आपल्याकडच्या राजघाटाप्रमाणं याही ठिकाणी पुष्पांच्या राशीच राशी वाहिलेल्या असतात. अनेक बल्गेरियन पुढाऱ्यांचे पुतळे शहरात उभारलेले आहेत; परंतु लेनिनचा पुतळा या सगळ्यात सरस वाटतो. 'नॅशनल म्युझियम' आणि सोफिया यांचं बाहेरूनच दर्शन घेणं भाग होतं. दुपारची वेळ असल्यानं सर्वत्र जेवणासाठी गर्दी उसळली होती. आमच्या खिशात तर आता दोघांमधे मिळून



**स्वातंत्र्यसैनिकांचे स्मारक – बल्गेरिया**

अवघी एक लेवा उरली होती. त्यात काय मिळणार होतं? हॉटेल्समधून जेवूनखाऊन तृप्त झालेले लोक आपल्याकडे मुखशुद्धीसाठी हॉटेलबाहेरच्या पानवाल्याकडे 'मसालापान' खातात, तसे इथं बल्गेरियन लोक हॉटेलबाहेरच्या स्टॉल्सवर आइस्क्रीम खात होते. हॉटेलमधे जायची तर आमची प्राज्ञाच नव्हती! त्यामुळं हे स्वस्तातलं आइस्क्रीम खाऊनच आम्हाला वेळ मारून न्यावी लागली.

आमचे सहकारी काही एम्बसीत आलेच नाहीत. त्यामुळं अधिक वेळ न दवडता आम्ही सरहद्दीकडे मोर्चा वळवला.

एव्हाना दुपारचे तीन वाजले होते. आइस्क्रीम खाऊन आमची क्षुधाशांती थोडीच होणार होती? पोटात कावळे कोकलू लागले होते. दोन तासांत बल्गेरिया संपणार होता. त्यामुळं डॉलर्स मोडून लेवा घेण्यात हशील नव्हतं. संथ गतीनं आमचं मार्गक्रमण चालूच होतं.

इतक्यात एक भलामोठा ट्रक जोरजोरानं हॉर्न वाजवीत आमच्या मागून पुढं येऊन थांबला. आम्हाला वाटलं, ड्रायव्हर काही अडचणीत असावा, किंवा

आम्हाला त्याला काही सूचित करायचं असेल. पण तसं काही नव्हतं. आमच्या बॅग्जवरची 'इण्डिया' ही मोठमोठी अक्षरं बघून तो थांबला होता. मोठ्या आनंदानं 'इण्डिया, इण्डिया' या शब्दांचा उद्घोष करीत पटापट पाचसहा मोठमोठे टोमॅटो काढून त्यानं आमच्या हातात दिले अन् 'दोविजेन्या' करीत तो निघूनही गेला. एकएक टोमॅटो संत्र्याएवढा आकाराचा. आमच्या जेवणाची ही उत्तम सोय झाली!

वैषम्य या गोष्टीचं वाटतं की, भारतीय वकिलातीत आम्हाला साधा चहाचा कप कसा कुणाला द्यावासा वाटला नाही? याउलट या अनोळखी बल्गेरियन माणसानं मात्र निव्वळ भारताबद्दलच्या प्रेमापोटी मुद्दाम ट्रक थांबवून हे टोमॅटो आम्हाल दिले! माणुसकीचा स्पर्श सामान्यजनांतच मिळतो तो असा!

मजल–दरमजल करीत आम्ही बल्गेरियाच्या सरहद्दीवर येऊन पोचलो. या देशातून पुढच्या देशात – युगोस्लाव्हियात प्रवेश करताना आम्हाला मोटरसायकलवरून खाली उतरावंदेखील लागलं नाही. ठीक पाच वाजता आम्ही युगोस्लाव्हियात पदार्पण केलं.

## ७

# टिटोंच्या उमद्या देशात

युगोस्लाव्हिया म्हणजे मार्शल टिटोंचा देश. पूर्व युरोपमधील हा अग्रगण्य देश. याच्या दक्षिणेला ग्रीसचा काही भाग आहे. सर्व दक्षिण–किनारा ॲड्रिआटिक समुद्रानं वेढलेला आहे. पूर्वेला अर्थातच बल्गेरिया. उत्तरेला रुमानिया, हंगेरी आणि थोडासा ऑस्ट्रियादेखील आहे. पश्चिमेला पश्चिम–युरोपचं प्रवेशद्वार असलेली इटली आहे.

युगोस्लाव्हियात प्रवेश करायला भारतीयांना फारच सोपं. व्हिसादेखील लागत नाही. एकच गोष्ट आवश्यक आहे : आपल्याजवळ भरपूर पैसे असले पाहिजेत. कस्टम ऑफिसर्सना खिशातले डॉलर्स दाखवताच त्यांनी आमच्या पासपोर्टस्‌वर भराभरा शिक्के मारले आणि आम्हाला प्रवेश दिला.

या देशात ट्रॅव्हलर्स चेक्स मोडून आम्ही प्रथम थोडे 'दिनार' घेतले आणि उकडलेली अंडी नि थंडगार दूध असा अल्पोपहार उरकला. आमच्या सहकाऱ्यांची इथंही भेट झालीच नाही. ते मागे बल्गेरियात सोफियालाच तर राहिले नसतील ना अशीही शंका आमच्या मनाला चाटून गेली. पण काही झालं तरी उद्या संध्याकाळचा मुक्काम बेलग्रेडच्या 'यूथ होस्टेल'मधे करायचा हा माझा बेत सर्वांना माहीत होता. शिवाय आम्हा सर्वांनाच इटलीच्या व्हिसाची मुदत वाढवून घेण्यासाठी वेलग्रेडमधल्या इटलीच्या एम्बसीत जाणं भाग होतं. उद्या आणि परवा शनिवार–रविवार असल्यानं एम्बसी बंद असणार. म्हणजे कुणी कुठंही असलं तरी सोमवारी सकाळी ते बेलग्रेडमधल्या इटालियन एम्बसीमधे हमखास येणार याची मला खात्री होती. हा सगळा विचार करून आणि मोटरसायकलमधे पुरेसं 'बेंझिन' भरल्यानंतर आम्ही आमचं पुढचं मार्गक्रमण सुरू केलं.

युगोस्लाव्हियाचा हा प्रदेश डोंगराळ असला, तरी अधूनमधून लांबच लांब पसरलेली शेतंही दिसत होती. या शेतांवरची नांगरणी अर्थातच यांत्रिक पद्धतीनं

चाललेली होती. चारचार ट्रॅक्टर्स एकेका शेतात फिरत होते. स्त्री–पुरुष खांद्याला खांदा लावून काम करीत होते. ज्यांचं काम आटोपलं होतं ते शेतकरी आपापली अवजारं घेऊन, त्यांना न्यायला येणाऱ्या वाहनांची वाट बघत रस्त्याच्या कडेला उभे होते. काम टाकून राजकारणावर फुकटचा काथ्याकूट करीत कुणी बसलेलं नव्हतं. पडीक जमीन अशी कुठंच दिसत नव्हती. मनुष्यबळाचा पुरेपूर वापर या देशात होत असला पाहिजे हे स्पष्टच होतं. खऱ्या अर्थानं इथं हरितक्रांती झालेली होती. नुसतीच 'हरितक्रांती'ची पोपटपंची नव्हती.

संध्याकाळी साडेसातच्या सुमाराला आम्ही दोघं 'क्रेवेनारेका' या खेड्याजवळ येऊन पोचलो. आता आणखी पुढं जाण्यात अर्थ नव्हता. शिवाय रहाण्यासाठी शहरापेक्षा छोटं खेडंच सोयीचं असतं ही खूणगाठ आम्ही एव्हाना मनाशी पक्की बांधलेली होती. त्यानुसार आजूबाजूला बंद दुकानाचा आडोसा वगैरे दिसतोय का ते मी आणि विजय न्याहाळू लागलो. तेवढ्यात माझी मोटरसायकल बघून वीसबावीस वर्षांचे दोन युगोस्लाव्ह तरुण जवळ आले, आमची गरज त्यांनी ओळखली, आणि आम्ही काही बोलायच्या आतच आमचा हात धरून त्यांनी आम्हाला त्यांच्या घरी नेलं.


ते एका सुताराचं घर होतं. आमचा तरुण मित्र मायलेन्कोव्ही हा त्याचा मुलगा, त्याच्याकडेही एक डौलदार मोटरसायकल होती – पूर्व–जर्मन बनावटीची, पाच खोल्यांचा त्या कुटुंबाचा बंगला सगळ्या दृष्टीनं सुसज्ज होता. पडवीत वर्कशॉप होतं. त्याला लागून छानशी खोली होती. एका सामान्य सुताराकडचं हे सारं ऐश्वर्य पाहिल्यावर, युगोस्लाव्हियामधला सर्वसामान्य नागरिक निदान खाऊनपिऊन सुखी असला पाहिजे असंच माझं मत झालं.

रात्रीच्या जेवणासाठी मायलेन्कोव्हीनं आम्हाला गावातल्या हॉटेलमधे नेलं. गावातली वस्ती अवघी दोन–तीन हजार; मग तिथलं हॉटेल ते काय असणार, अशी माझी कल्पना! पण प्रत्यक्षात या छोट्या हॉटेलमधेही चक्क नाच–गाणी चालू होती. हॉटेलचं सगळं व्यवस्थापन स्त्रियाच करीत होत्या. आम्हा दोघा परदेशी तरुणांना बघताच त्या अक्षरशः हुरळून गेल्या. आमची बडदास्त ठेवण्यासाठी त्यांच्यात जणू अहमहमिका लागली, एकीनं तर चक्क माझ्या खांद्यावर हात टाकून (हो, खांद्यावरती! कारण तीही पुरेपूर सहा फूट उंच होती!) मला जवळ ओढलं अन् स्वैंपाकघरात नेऊन गोदरेजच्या कपाटाएवढ्या

मोठ्या फ्रीजमधले मांसाचे विचित्र प्रकार दाखवले. तिला वाटत होतं की हे सगळं बघून माझ्या तोंडाला पाणी सुटेल. पण मी बापडा मुखस्तंभासारखा ते सारं पहात होतो. ते मांस किती दिवसांचं शिळं होतं आणि कुठल्या प्राण्याचं होतं, देव जाणे! त्याला दुर्गंधी नव्हती एवढं मात्र खरं! "गायबैलांचं तर हे मांस नाही ना?" असं मी त्या बाईला इंग्रजीत विचारलं, पण तिला माझ्या विचारणेचा काय अर्थबोध होणार? तिनं प्रश्नार्थक नजरेनं माझ्याकडे पाहिलं. मी पेन सरसावलं आणि झरझर गाईचं चित्र काढून तिच्यापुढं धरलं. त्यावरोबर खुपीत येऊन ती स्लाव्ह भाषेत उद्गारली, "होय तर! तुमच्यासारख्या प्रवाशांसाठीच तर हे गाईचं मांस आम्ही अगदी राखून ठेवलंय!"

मी कपाळावर हात मारला अन गाईच्या चित्रावर फुली मारली.

"म्हणजे? तुम्हाला नको हे मांस?"



बेलग्रेडमधल्या वाहनसंपन्न रस्त्यांचे एक दृश्य.

"छे छे! आम्ही लोक गाय-वैलाचं मांस खात नाही हो!" केविलवाणा चेहेरा करून मी उत्तरलो.

माझ्या उत्तरानं ती बिचारी नाराज झाली. खाणाखुणांनी पार पडलेल्या या संभाषणानंतर मी फ्रीजमधील चार अंडी बाहेर काढली अन् त्यांची ऑम्लेट्स बनवायला तिला सांगितलं झालं!

युगोस्लाव्हियातलं ते पहिलंवहिलं जेवण कसंबसं आटोपून आम्ही मायलेन्कोव्हीच्या घरी परतलो. स्लाव्ह शब्दांची माहिती करून घ्यायला ही चांगली संधी होती. मायलेनकडून स्लाव्ह शब्द जाणून घ्यायला मी सुरुवातही केली. मायलेनची आई आमच्यासाठी दूध घेऊन पडवीत शिरत होती, अन नेमकं त्याच वेळी मी मायलेनला पाण्याला स्लाव्ह शब्द विचारला होता. मायलेनच्या आईला आमचं काय चाललंय याची कल्पनाच नव्हती. मायलेननं पाण्याला स्लाव्ह भाषेत 'वोडा' म्हणतात असं सांगताच त्या माउलीला वाटलं की आम्हाला पाणीच पाहिजे आहे; दूध नको! ती बिचारी तशीच मागं फिरली अन दुधाचे ग्लास परत नेऊन पाण्याचं भांडं घेऊन आली!

दुसऱ्या दिवशी सकाळी या युगोस्लाव्ह कुटुंबाचा निरोप घेऊन आम्ही बेलग्रेडच्या रस्त्याला लागलो. आज शनिवार असल्यानं सुटीची मौज लुटण्यासाठी असंख्य लोक आपापल्या मोटारी घेऊन बाहेर पडले होते. म्हणजे या कम्युनिस्ट राष्ट्रात शेकडो – नव्हे, हजारो लोकांकडे मोटर्सदेखील आहेत तर! आणि त्या मोटारीही किती विविध प्रकारच्या! 'ऑस्टीन', 'बी. एम. डब्ल्यू.', 'सिट्रॉन', 'फोर्ड', 'मर्सिडीज', 'ओपेल', 'पीजोट', 'रोव्हर', 'ट्राइम्फ', 'व्हाल्वो', 'फोक्स वॅगन', 'सिमको', 'स्कोडा' . . . कितीतरी प्रकार! रविवारी तर या देशात ठिकठिकाणी मोटारींचा बाजारच भरतो. किंमतीचा कागद चिकटवून मोटारी विक्रीला ठेवतात. खरेदी-विक्री करणाऱ्यांची जणू जत्राच भरते. आपल्याकडच्या खेडेगावात गुरांचा बाजार भरतो ना, तसलाच हा प्रकार!

युगोस्लाव्हियातही वाहतूक बल्गेरियाप्रमाणंच मंद गतीची. अपघात कुठं दिसलेच नाहीत. अर्थात या शिस्तबद्ध वाहकांकडून अपघात होतीलच कसे! आपण नेहेमी अपघात झाला की दोष देतो रस्त्यांना अन् पर्यायानं सरकारला. पण वेगमर्यादेचं उल्लंघन करणं, इतर वाहनांना 'ओव्हरटेक' करणं आणि सिग्नल्स 'तोडून' पुढं जाणं यालाच आम्ही ड्रायव्हिंगचं कसब समजतो; मग

आपल्या देशातलं अपघातांचं प्रमाण कमी होणार कसं?

बल्गेरियापासून खऱ्या अर्थानं युरोपमधला प्रवास सुरू झाला होता. युरोपचं पहिलं वैशिष्ट्य जाणवलं ते म्हणजे शिस्त! वैयक्तिक जीवनात तर ती होतीच; परंतु सार्वजनिक जीवनातही ती प्रकर्षानं जाणवत होती. वाहतुकीतली शिस्त हा सार्वजनिक शिस्तीचाच एक भाग होता. आमच्याकडे सगळंच उलट! नियमांचं अन् कायद्यांचं उल्लंघन करणारा इसम स्वतःला कर्तृत्ववान समजतो. धूम्रपान निषिद्ध असलेल्या ठिकाणी मुद्दाम धुराची वलयं सोडत बसण्यात आम्ही 'पुरुपार्थ' समजतो! सिग्नल नसताना रस्ता क्रॉस करण्यात आम्हाला 'स्मार्टनेस्' वाटतो. धावती गाडी पकडण्यात 'चपळाई' वाटते. किती किती उदाहरणं सांगावी आमच्या बेशरमपणाची!

बेलग्रेड शहराच्या वेशीवर आम्ही आलो तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. थंडगार वारा सुटला होता. आकाश ढगाळलेलं होतं. पावसाची रिपरिप चालू होती. पेट्रोलपंपावर आम्ही बसून होतो. पण संध्याकाळ होत आली तरी आमच्या सहकाऱ्यांचा पत्ता नव्हता. अखेर कंटाळून आम्ही बेलग्रेडच्या 'यूथ होस्टेल'वर जायला निघालो. पेट्रोलपंपावरच आम्हाला बेलग्रेड शहराचा नकाशा मिळाला. या देशांमधल्या पेट्रोलपंपांवर अशा अनेक गोष्टी उपलब्ध असतात – त्याही विनामूल्य! आमच्याकडे पेट्रोलपंपावर पेट्रोलही मिळेलच याची शाश्वती नसते, तिथं शहराचा नकाशा मिळणं दूरच!

विजयनं गाडी सुरू केली. मी नकाशा घेऊन मागे बसलो. –आणि काय योगायोग! समोर बघतो तर आमचे सगळे सहकारी एकापाठोपाठ येऊन थडकले. बल्गेरियात झालेल्या ताटातुटीनंतर तब्बल बत्तीस तासांनी आमची पुनर्भेट होत होती!

बेलग्रेड शहरात पुन्हा चुकामूक नको या हेतूनं मी 'यूथ होस्टेल'चा पूर्ण पत्ता प्रत्येक गाडीवरच्या सहकाऱ्याजवळ देऊन ठेवला. 'बुलेवार ज्ना'वर असलेलं हे 'यूथ होस्टेल' आम्ही तासाभरात शोधून काढलं.

पण खऱ्या अर्थानं हे 'यूथ होस्टेल' नव्हतंच. एका चांगल्या हॉटेलमधे 'यूथ होस्टेल्स फेडरेशन'च्या सभासदांना सवलतीच्या दरात रहायची या ठिकाणी सोय होती इतकंच! माणशी ऐंशी दिनार म्हणजे सुमारे दोनशे रुपये हा यांचा 'सवलतीचा दर'! म्हणजे हे स्वस्तही नव्हतं. पण आता दुसरीकडे कुठं

शोधाशोध करणार? आपापले पासपोर्टस् सादर करून आम्ही त्या हॉटेलात प्रवेश मिळवून मोकळे झालो.

इस्तंबूल सोडल्यापासून आम्ही घरी पत्रं लिहिली नव्हती. 'यूथ होस्टेल'मधेच सुंदरसुंदर चित्रांची कार्डस् आणि पोस्टाचे स्टँप्स विक्रीला ठेवलेले होते. आम्ही प्रथम पत्रलेखनाचा कार्यक्रम उरकला. साम्यवादी राष्ट्रांत व्यक्तीचं माहात्म्य नसतं असं म्हणतात. पण इथं तर मार्शल टिटोंची चित्रं असलेले पोस्टाचे स्टँप्सदेखील होते. हयात असलेल्या राष्ट्रप्रमुखाचं चित्र पोस्टाच्या स्टँप्सवर कसं याचं नवल करीतच आम्ही पत्रलेखन आटोपलं.

दुसऱ्या दिवशी आम्ही 'बेओग्रेडस्का बँक' शोधून काढली. रविवार असल्यानं इतर सर्व बँका बंद होत्या. ही बँक मात्र 'अहर्निशं सेवामहे' या उक्तीनुसार अहोरात्र चालू असते. ती बंद कधी नसतेच. आमच्यापैकी काहीजणांनी इथं आपापले प्रवासी चेक्स वटवून घेतले. मी आणि सुधीरनं मात्र या ठिकाणी रात्री ठीक बारा वाजता यायचा बेत आखला. त्यानुसार रात्रीचं जेवणखाण आटोपल्यावर आम्ही मोटरसायकल घेऊन बाहेर पडलो, आणि बेलग्रेडमधे मन मानेल तसं भरपूर भटकल्यावर मध्यरात्रीच्या सुमाराला या बँकेत येऊन पोचलो. पण बघतो तो काय? बँकेच्या मॅनेजरसकट सगळे कर्मचारी बँकेतल्याच टेलिव्हिजनवर फुटबॉलचा सामना पहाण्यात रंगून गेलेले! एकंदरीत रात्रपाळी करणाऱ्यांची कामाची पद्धत सर्वत्र सारखीच आहे म्हणायची!

बेलग्रेडमधल्या दिवसभराच्या भटकन्तीत गर्दी अशी कुठं जाणवली नाही. फोर्टमधल्या भागात रविवारी जशी तुरळक वर्दळ असते, तितपतच गर्दी या शहरात होती. आम्ही ट्रॅमनंही थोडा प्रवास केला. या ट्रॅम्स तीनतीन डब्यांच्याही होत्या. मुंबईतल्या ट्रॅम्स आता इतिहासजमा झाल्या असल्यानं नव्या पिढीला युरोपमधल्या ट्रॅम्स हाही कुतूहलाचाच विषय वाटेल. त्यातून ट्रॅम्स, बसेस यांसारखी वाहनं इथं बायका चालवतात हे बघून तर आम्ही चाटच पडलो! पुणे–नागपूर करांचं एक सोडून द्या; पण आम्हा मुंबईकरांना अजूनही एखादी स्त्री साधी सायकल चालवताना दिसली तरी कुतूहल वाटतं, तिथं या प्रचंड बसेस मोठ्या कौशल्यानं चालवणाऱ्या युगोस्लाव्ह महिला बघितल्या की स्त्रीजातीची 'अबला' म्हणून निर्भत्सना करणाऱ्यांची खरोखर कीव करावीशी वाटते. पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्याचं कामदेखील स्त्रियाच करीत होत्या!



अभियांत्रिकी कामात पारंगत यूगोस्लाव्ह महिला

बेलग्रेड शहराचं सौंदर्य तर काय वर्णावं? ठराविक साच्याच्या उत्तुंग इमारती इथं जशा होत्या, तशीच छोटीछोटी बैठी घरंही अधूनमधून दिसत होती. 'साव्हा' आणि 'डॅन्यूब' या दोन नद्यांचं गर्द निळं पाणी शहराच्या मध्यभागातून संथपणं वाहात होतं. रस्त्याच्या दुतर्फा मोठमोठे वृक्ष आपली शीतल छाया पथिकांना देत उभे होते. आमचं 'यूथ होस्टेल'ही अशाच उंच वृक्षांच्या छायेत वसलेलं होतं. रस्त्यावर पडलेल्या पाचोळ्यानं सौंदर्यात अधिकच भर पडत होती. नव्या दिल्लीतल्या कृष्ण मेनन मार्गासारख्या किंवा अकबर रोडसारख्या

भागाप्रमाणं इथलं वातावरण शांत पण प्रसन्न होतं.

'झेमून' हा बेलग्रेडचा एक अत्यंत आधुनिक भाग. त्याला 'नवं बेलग्रेड' असंही म्हणतात. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळं मात्र जुन्या बेलग्रेडमधेच बघायला मिळतात. रिपब्लिकन स्क्वेअर, नॅशनल म्युझियम, सेरबियन अकादमी ऑफ आर्टस् अँड सायन्स वगैरे ठिकाणं त्यातल्या त्यात उल्लेखनीय.

शहराच्या मध्यभागी पार्लमेंट आहे. युगोस्लाव्हिया हा देश साम्यवादी असला, तरी तो प्रजासत्ताक आहे अन् सहा संयुक्त राज्यांचा बनलेला आहे हे एक वैशिष्ट्यच म्हणावं लागेल.

शेती हा इथला महत्त्वाचा 'उद्योग'. शेतावर हजर असेल त्याला रोजगार; नसेल त्याला छदामही नाही! त्यामुळं आळशीपणा, कामचुकारपणा अन् ऐतखाऊपणा यांना वावच नाही. शेतीचे मालकी हक्क कुणा व्यक्तीकडे नसल्यानं कुळांचा प्रश्न, तुकडाबंदीची समस्या, खंडानं शेती करून घेण्याची प्रथा, सारावसुली, लेव्ही, आणेवारी आणि जमिनीवरून होणारी भाऊबंदकी आदी गोष्टींनाही तिथं थारा नाही. सार्वजनिक मालमत्तेचं रक्षण करण्याबाबत हे लोक फार दक्ष! उभी पिकं चोरीला जात नाहीत. निसर्गाचीही शेतकऱ्यांना चांगली साथ आहे. मैलन् मैल सलग, सपाट आणि सुपीक भूमी त्यांना लाभलेली आहे. या सगळ्या गोष्टींमुळं अवघ्या दोन कोटींचा – म्हणजे महाराष्ट्राच्या निम्म्या लोकसंख्येचा – हा देश शेतीच्या उत्पादनाबाबत अग्रेसर ठरला आहे.

फळभाज्यांचे आणि पालेभाज्यांचे बहुतेक सर्व प्रकार इथं मिळतात. उत्तमोत्तम भाज्या निवडून चिरून नीटपणे पॉलिथिनच्या बॅग्जमधे बंद करून डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये विकायला ठेवलेल्या असतात. याखेरीज क्वचित काही ठिकाणी भाज्यांची दुकानंही आढळतात. बेलग्रेडमधे तर भायखळा मार्केटसारखं एक भाजीमार्केट माझ्या दृष्टीस पडलं. इथं कचरा, चिखल, आरडाओरडा, धक्काबुक्की, शिळ्या–ताज्याची सरभेसळ करून माल संपवण्याची अहमहमिका, या गोष्टी अजिबात नव्हत्या. पण त्यामुळं आपल्याकडे जाणवणारा जिवंतपणाही या बाजारात नव्हता. चिखल तुडवीत, धक्काबुक्की सहन करीत

बाजारातल्या गलक्यात आपलाही सूर मिसळून बरीच घासाघीस केल्यानंतर खरेदी केलेल्या भाज्यांची लज्जत काही निराळीच!

पुढच्या प्रवासासाठी आम्हाला हिरव्या मिरच्या हव्या होत्या. भाज्या कुठंही मिळतात; पण मिरच्यांसाठी या देशात शोधाशोध करावी लागते, असा आमचा अनुभव होता.

मी मार्केटमधे शिरताच सगळ्यांच्या नजरा माझ्याकडे रोखल्या गेल्या. 'हा कोणत्या देशाचा प्राणी असावा' याविषयीचे तर्क सुरू झाले. भारतीय माणूस त्यांनी बहुधा पाहिलेला नव्हता. आणि त्यात आश्चर्य ते काय? बेलग्रेडला येणारे भारतीय बहुधा राजकीय परिषदांना, व्यापारी प्रदर्शनांना अथवा सांस्कृतिक कार्यक्रमांना विमानानं येतात, मोठमोठ्या हॉटेलमधे रहातात अन् विमानानं परत जातात. त्यामुळं या भाजीमार्केटमध्ये कुणी भारतीय यापूर्वी गेला असण्याची सुतराम शक्यता नव्हती. मी सरळ एका मिरचीवाल्यासमोर जाऊन उभा राहिलो आणि उद्‌गारलो, "इण्डिया! . . . इण्डिया!"

मागं वर्णन केल्याप्रमाणं इथंही या शब्दांचा योग्य तोच परिणाम झाला. "इण्डिया? जवाहरलाल नेहरू?" तो विक्रेता हर्षातिरेकानं ओरडला. त्याबरोबर आजूबाजूचे पाचदहा भाजीवाले माझ्याभोवती गोळा झाले. मलाही मग स्फुरण चढलं. नेहरूंच्या नावाचा पुनरुच्चार करीत आणि त्यांच्याकडे अंगुलिनिर्देश करताना टिटोचं नाव घेत त्या सर्वांशी मी हस्तांदोलन केलं. जणू काही नेहरू–टिटोंइतकीच आमची भेटही महत्त्वपूर्ण होती! एव्हाना त्या भाजीवाल्यानं माझ्या पिशवीत मूठमूठ मिरच्या कोंबल्या होत्या. मी पैसे देऊ केले; पण त्यानं त्या गोष्टीला साफ नकार दिला. 'HVALA... HVALA' ('व्हाला. . . व्हाला') असे युगोस्लाव्ह भाषेत आभार मानून मी त्यांचा निरोप घेतला आणि तडक 'यूथ होस्टेल' गाठलं.

आज सोमवार होता. इटलीचा व्हिसा आम्ही फारच आधी घेतला असल्यानं संपत आला होता. त्याची मुदत वाढवून घ्यायची होती. मी आणि सुधीरनं सर्वांचे पासपोर्टस घेऊन इटालियन एम्बसी शोधून काढली. रोमला जाण्यासाठी आम्ही

ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास
८६६
ग्रा. क्र.

मुंबईहून मोटारसायकल्सवरून आलो आहोत हे नीटपणं सांगितल्यावर व्हिसाची मुदत वाढवून घ्यायला आम्हाला फारसं कठीण गेलं नाही. आता बेलग्रेड सोडायला आम्ही मोकळे झालो होतो.

परंतु सामानसुमान बांधून आम्ही तयार होतोय तोच रमेशच्या 'जावा'चं सस्पेन्शन नेमकं शॉक ॲवसॉर्बरच्या जागीच तुटल्याचं निदर्शनाला आलं – झालं! आमच्यातल्या तंत्रज्ञांना एक प्रकारे आव्हानच मिळालं! एकनाथनं एक क्लृप्ती शोधून काढली. त्याप्रमाणं तीन तास ठाकठोक केल्यावर ती गाडी एकदाची ठीक झाली. ही दुरुस्ती इटलीत जाईपर्यंत जेमतेम टिकाव धरील असं वाटलं होतं. पण आश्चर्य असं की परतीच्या प्रवासातही त्या सस्पेन्शनला बिलकूल धोका निर्माण झाला नाही.

हे सर्व रामायण घडेपर्यंत माझ्यासारख्याला केवळ बघ्याची भूमिका करणं पसंत नव्हतं. 'यूथ होस्टेल'वरच्या काउंटरक्लार्ककडून मी तेवढ्या वेळात युगोस्लाव्हियाबद्दल शक्य तितकी तपशीलवार माहिती गोळा केली. त्यानं वर्णन केलेली मार्शल टिटोची जीवनगाथा तर खरोखरच कथन करण्यासारखी आहे.

मार्शल टिटोचं खरं नाव जोसेफ ब्राझ. क्रांतिकाळात भूमिगत असताना त्यानं धारण केलेल्या अनेक नावांपैकी 'टिटो' हे एक नाव. त्या वेळी जर्मनांनातो रशियन मुत्सद्दी वाटायचा; आणि इतरांना तो झेकोस्लोव्हाकियन बंडखोर वाटायचा. काहींची तर अशी कल्पना होती की, अमेरिकेत त्या काळी गाजत असलेला 'वेकर' हाच युगोस्लाव्हियात 'टिटो' हे दुसरं नाव धारण करून धुमाकूळ घालतोय. हिटलरच्या सैन्याधिकाऱ्यांनी त्याचं मस्तक कापून आणणाऱ्याला एक लाख जर्मन मुद्रांचं बक्षीसच जाहीर केलं होतं म्हणे!

अशा या गाजलेल्या राष्ट्राध्यक्षाचा जन्म मात्र क्रोटिकाजवळच्या 'कुमरोवेक' या चिमुकल्या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात झाला. या शेतकऱ्याला पंधरा मुलं. त्यात जोसेफ आठवा. अर्थातच घरी कमालीचं दारिद्र्य. अगदी कोवळ्या वयातच जोसेफनं कुलुपांच्या एका कारखान्यात घण मारायला

सैनिकांनी त्याला पळवून नेलं. त्यानंतर तो तब्बल तेरा महिने रशियाच्या लष्करी रुग्णालयात उपचार घेत होता. त्याच ठिकाणी त्यानं रशियन भाषा अवगत करून घेतली. पुढं युद्धकैदी म्हणून रशियन कारखान्यात त्याला कामही करावं लागलं. याच काळात त्याचं लक्ष वेधलं ते झारशाहीविरुद्ध दंड थोपटून उभ्या राहिलेल्या रशियन क्रांतिकारकांनी. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून तो पेट्रोलग्राडच्या लढ्यात उतरला. त्यातच त्याला अटक झाली आणि तो रशियन क्रांतिकारकांच्या अधिक जवळ् आला. पुढं लालसेनेतही त्यानं काही महिने कार्य केलं. १९२० च्या अखेरीस तो मायभूमीला परत आला आणि नुकत्याच स्थापन झालेल्या युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षाच्या विचारप्रणालीला त्यानं स्वतंत्र दिशा दाखवून दिली आणि भरघोस पाठिंब्यानिशी नेता म्हणून मान्यता मिळवली. राजेशाहीशी लढा देत असतानाच १९२८ साली झाग्रेबच्या बॉंबकटात त्याला दोषी ठरवण्यात आलं आणि पाच वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. तुरुंगातून सुटून आल्यानंतर मात्र जोसेफच्या तलवारीला पाणी चढलं. पक्षाच्या पॉलिट ब्युरोवर त्याची निवड झाली. त्याच सुमारास युरोपमधे दुसऱ्या महायुद्धाचे वारे वाहू लागले होते. जोसेफनं आपलं संघटनाकौशल्य पणाला लावून पक्षकार्यकर्त्यांची एक जबरदस्त सैनिकी पलटणच उभी केली, आणि हिटलर-मुसोलिनीपुढं शरणागती पत्करलेल्या युगोस्लाव्ह राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाला आव्हान दिलं. त्याच्या या ऐंशी हजार मुक्ति-सैनिकांनी गनिमी हल्ले चढवून युगोस्लाव्हियावर पाय रोवलेल्या जर्मन सैनिकांची धूळधाण उडवली. मात्र या धुमश्चक्रीत सतरा लक्ष युगोस्लाव्ह नागरिकांचे देह धारातीर्थी पडले. देशाचा प्रत्येक नववा नागरिक देशासाठी हुतात्मा झाला. पण नागरिकांचं हे बलिदान व्यर्थ ठरलं नाही. हिटलरच्या रूपानं नाझी भस्मासुराचं तांडवनर्तन इतरत्र चालू असताना युगोस्लाव्हियात मात्र जोसेफ ब्राझनं जनतेच्या सत्तेची द्वाही फिरवली आणि वर्षानुवर्ष प्रजेला शोषणाऱ्या राजेशाहीला युगोस्लाव्हियातून हद्दपार करून टाकलं.

युद्ध संपलं, आणि जोसेफ ब्राझ 'मार्शल टिटो' या नावानं प्रजासत्ताक राष्ट्राची उभारणी करण्यासाठी पुढं आला. कामगारांच्या प्रतिनिधींना बरोबर

घेऊन त्यानं देशाच्या विकासाचे आराखडे तयार केले आणि मोठमोठ्या योजना त्वरित अमलात आणल्या. लष्करी गणवेष परिधान करून रणांगणावर लढणारा हा सेनानी युद्धोत्तर काळातल्या त्याच्या जनताभिमुख योजनांमुळं आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीमुळं यशस्वी प्रशासकही ठरला. घटकराज्यांना अनेक बाबतींत स्वायत्तता देऊन त्यानं साम्यवादी शासनयंत्रणेत क्रांतिकारी बदल घडवला. आंतरराष्ट्रीय राजकारणात तटस्थतावादाचा आणि शांततेचा हिरीरीनं पुरस्कार करणारा मार्शल टिटो लवकरच पंडित नेहरूंचा परमस्नेही झाला. साहजिकच भारत–युगोस्लाव्हिया यांच्या संबंधांना चांगलाच मोहोर आला.

अशा या पंचाऐंशी वर्षांच्या, त्या वेळी हयात असलेल्या थोर युगोस्लाव्ह *राष्ट्राध्यक्षाचं ओजस्वी जीवनचरित्र* ऐकण्यात मी रंगून गेलो होतो. इतक्यात सगळेजण पुढच्या प्रवासाला सिद्ध झाल्याचा इशारा मला मिळाला, आणि मीही नकळत माझी गाडी गतिमान केली.

बेलग्रेडमधल्या असंख्य फ्लायओव्हर्सवरून जातजात, झेमून उपनगर पार करून आम्ही झाग्रेबच्या रस्त्याला लागलो.

तुर्कस्तानप्रमाणंच युगोस्लाव्हियातही आमचा प्रवास देशाच्या मध्यभागातूनच चालला होता. त्यामुळं दक्षिणेकडे पसरलेल्या ॲड्रियाटिक समुद्राच्या किनाऱ्यालगतच असलेल्या सुमारे सातशे छोट्या छोट्या बेटांवरची मौज आम्ही लुटू शकणार नव्हतो! त्यात ही बेटं नग्न वसाहतींसाठी प्रसिद्ध असल्यानं तर मनाला फारच हुरहूर लागली होती! 'रोविंज', 'राब', 'सोलारिस' वगैरे बेटं आपल्याकडच्या घारापुरीसारख्या आकाराची. पण तिथं खेळाचं साहित्य, खाद्यपदार्थांची दुकानं, हॉटेल्स इतकंच नव्हे तर पेट्रोलपंपही आहेत म्हणे! नाहीत फक्त कपड्यांची दुकानं! कारण वस्त्रविहीन अवस्थेत भटकणाऱ्यांच्या या भागात कपड्याचं दुकान काढणं म्हणजे अमृतसरला केशकर्तनालय काढण्यासारखंच ठरायचं!

एकंदरीत युगोस्लाव्ह जनतेला समुद्राचं आकर्षण जबरदस्त आहे. समुद्रकिनारी जायचं, मोटरबोट्स भाड्यानं घ्यायच्या, बेधडक समुद्रात

घुसायचं, वाटेल त्या बेटावर उतरायचं आणि दोन–दोन दिवस सूर्यस्नान करीत तिथंच पडून रहायचं, हा यांचा साप्ताहिक सुटीचा ठरलेला कार्यक्रम! खाण्यासाठी 'MLEKO' म्हणजे दुधाची पाकिटं आणि 'HLTB' ऊर्फ पाव, या दोन गोष्टी बरोबर घेतल्या की अन्नप्रश्न सुटला! शिवाय या बेटावर मासे मारून खाता येतात, अर्थात खाण्यापिण्याच्या बाबतीत या लोकांच्या गरजा तशा कमीच. त्यामुळं त्यांचं कुठं अडत नाही, अन् प्रवास करून आल्यावर 'खायचे अगदी हाल झाले हो!' असलं रडगाणं कुणी सुनावत नाही.


पर्यटनाला युगोस्लाव्हियात एवढं महत्त्व दिलं जात असेल याची आम्हाला कल्पना नव्हती. अन्यथा आम्ही आमचा मार्ग आधीच ठरवला असता. एकंदरीत नग्न वसाहती बघण्याचं भाग्य (!) आमच्या नशिबात नव्हतं, हेच खरं!

मजल–दरमजल करीत आम्ही शंभर–सव्वाशे किलोमीटर्स अंतर कापून संध्याकाळच्या सुमाराला एका कॅम्पिंग साइटजवळ येऊन पोचलो. एव्हाना थंडीनं सगळेजण काकडले होते. खोली भाड्यानं घ्यावी म्हटलं तर ते आम्हाला परवडणारं नव्हतं. मग आम्ही एक युक्ती केली. समोरासमोर अशा आमच्या मोटरसायकली उभ्या केल्या. मधे चांगलं पाच फूट अंतर ठेवलं, आणि गाड्यावर आमचे एअर बेडस् बांधून टाकले. हे झालं छप्पर. खाली दोन बेडस् दिले अंथरून. बस्स! झाली आमची सोय! दवापासून संरक्षण हवं होतं ते आम्हाला या प्रकारे मिळालं.

मौज म्हणजे इथल्या हॉटेलमधे आम्हाला चक्क पावट्याची उसळ–कम आमटी मिळाली. सगळ्यांनी या खाद्यावर मनसोक्त ताव मारला. खाद्याच्या चवीबद्दल न लिहिलेलंच बरं; पण आमटी ओरपण्याचं समाधान हेच आम्हाला अधिक होतं!

युगोस्लाव्हियातले खाद्यपदार्थ तसे बेचवच. भारतासारखं 'जिव्हासुख' युरोपात एकंदरीत नाहीच! 'CEVAPICI' म्हणजे मसालेदार मटण, 'SARNIA' म्हणजे मटण–पुलाव अन् 'BOSANSK LONAC' म्हणजे उकडलेली भाजी हे पदार्थ त्यातल्या त्यात बरे. दुधापासून केलेलं 'KAJMAK'

सुरुवात केली. स्वाभिमान हा त्याचा स्थायीभाव होता. अन्याय त्याला सहन होत नसे. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यानं धातुकामगारांचं नेतृत्व स्वीकारलं आणि संपाचं शस्त्र उगारून आपल्या अंगी असलेल्या असामान्य कर्तृत्वाची झलक दाखवून दिली. सक्तीचं सैनिकी शिक्षण घेत असतानाच त्याला प्रत्यक्ष युद्धात भाग घ्यावा लागला. रणांगणावर जखमी अवस्थेत असतानाच रशियन



यूगोस्लाव्हियाचे सर्वेसर्वा आणि पंडित नेहरूंचे परममित्र – मार्शल टिटो!

सैनिकांनी त्याला पळवून नेलं. त्यानंतर तो तब्बल तेरा महिने रशियाच्या लष्करी रुग्णालयात उपचार घेत होता. त्याच ठिकाणी त्यानं रशियन भाषा अवगत करून घेतली. पुढं युद्धकैदी म्हणून रशियन कारखान्यात त्याला कामही करावं लागलं. याच काळात त्याचं लक्ष वेधलं ते झारशाहीविरुद्ध दंड थोपटून उभ्या राहिलेल्या रशियन क्रांतिकारकांनी. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून तो पेट्रोलग्राडच्या लढ्यात उतरला. त्यातच त्याला अटक झाली आणि तो रशियन क्रांतिकारकांच्या अधिक जवळ आला. पुढं लालसेनेतही त्यानं काही महिने कार्य केलं. १९२० च्या अखेरीस तो मायभूमीला परत आला आणि नुकत्याच स्थापन झालेल्या युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षाच्या विचारप्रणालीला त्यानं स्वतंत्र दिशा दाखवून दिली आणि भरघोस पाठिंब्यानिशी नेता म्हणून मान्यता मिळवली. राजेशाहीशी लढा देत असतानाच १९२८ साली झाग्रेबच्या बॉंबकटात त्याला दोषी ठरवण्यात आलं आणि पाच वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. तुरुंगातून सुटून आल्यानंतर मात्र जोसेफच्या तलवारीला पाणी चढलं. पक्षाच्या पॉलिट ब्युरोवर त्याची निवड झाली. त्याच सुमारास युरोपमधे दुसऱ्या महायुद्धाचे वारे वाहू लागले होते. जोसेफनं आपलं संघटनाकौशल्य पणाला लावून पक्षकार्यकर्त्यांची एक जबरदस्त सैनिकी पलटणच उभी केली, आणि हिटलर–मुसोलिनीपुढं शरणागती पत्करलेल्या युगोस्लाव्ह राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाला आव्हान दिलं. त्याच्या या ऐंशी हजार मुक्ति–सैनिकांनी गनिमी हल्ले चढवून युगोस्लाव्हियावर पाय रोवलेल्या जर्मन सैनिकांची धूळधाण उडवली. मात्र या धुमश्चक्रीत सतरा लक्ष युगोस्लाव्ह नागरिकांचे देह धारातीर्थी पडले. देशाचा प्रत्येक नववा नागरिक देशासाठी हुतात्मा झाला. पण नागरिकांचं हे बलिदान व्यर्थ ठरलं नाही. हिटलरच्या रूपानं नाझी भस्मासुराचं तांडवनर्तन इतरत्र चालू असताना युगोस्लाव्हियात मात्र जोसेफ ब्राझनं जनतेच्या सत्तेची द्वाही फिरवली आणि वर्षानुवर्ष प्रजेला शोषणाऱ्या राजेशाहीला युगोस्लाव्हियातून हद्दपार करून टाकलं.

युद्ध संपलं, आणि जोसेफ ब्राझ 'मार्शल टिटो' या नावानं प्रजासत्ताक राष्ट्राची उभारणी करण्यासाठी पुढं आला. कामगारांच्या प्रतिनिधींना बरोबर

घेऊन त्यानं देशाच्या विकासाचे आराखडे तयार केले आणि मोठमोठ्या योजना त्वरित अमलात आणल्या. लष्करी गणवेष परिधान करून रणांगणावर लढणारा हा सेनानी युद्धोत्तर काळातल्या त्याच्या जनताभिमुख योजनांमुळं आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीमुळं यशस्वी प्रशासकही ठरला. घटकराज्यांना अनेक बाबतींत स्वायत्तता देऊन त्यानं साम्यवादी शासनयंत्रणेत क्रांतिकारी बदल घडवला. आंतरराष्ट्रीय राजकारणात तटस्थतावादाचा आणि शांततेचा हिरीरीनं पुरस्कार करणारा मार्शल टिटो लवकरच पंडित नेहरूंचा परमस्नेही झाला. साहजिकच भारत–युगोस्लाव्हिया यांच्या संबंधांना चांगलाच मोहोर आला.

अशा या पंचाऐंशी वर्षांच्या, त्या वेळी हयात असलेल्या थोर युगोस्लाव्ह राष्ट्राध्यक्षाचं ओजस्वी जीवनचरित्र ऐकण्यात मी रंगून गेलो होतो. इतक्यात सगळेजण पुढच्या प्रवासाला सिद्ध झाल्याचा इषारा मला मिळाला, आणि मीही नकळत माझी गाडी गतिमान केली.

बेलग्रेडमधल्या असंख्य फ्लायओव्हर्सवरून जातजात, झेमून उपनगर पार करून आम्ही झाग्रेबच्या रस्त्याला लागलो.

तुर्कस्तानप्रमाणंच युगोस्लाव्हियातही आमचा प्रवास देशाच्या मध्यभागातूनच चालला होता. त्यामुळं दक्षिणेकडे पसरलेल्या ॲड्रियाटिक समुद्राच्या किनाऱ्यालगतच असलेल्या सुमारे सातशे छोट्या छोट्या बेटांवरची मौज आम्ही लुटू शकणार नव्हतो! त्यात ही बेटं नग्न वसाहतींसाठी प्रसिद्ध असल्यानं तर मनाला फारच हुरहूर लागली होती! 'रोविंज', 'राब', 'सोलारिस' वगैरे बेटं आपल्याकडच्या घारापुरीसारख्या आकाराची. पण तिथं खेळाचं साहित्य, खाद्यपदार्थांची दुकानं, हॉटेल्स इतकंच नव्हे तर पेट्रोलपंपही आहेत म्हणे! नाहीत फक्त कपड्यांची दुकानं! कारण वस्त्रविहीन अवस्थेत भटकणाऱ्यांच्या या भागात कपड्याचं दुकान काढणं म्हणजे अमृतसरला केशकर्तनालय काढण्यासारखंच ठरायचं!

एकंदरीत युगोस्लाव्ह जनतेला समुद्राचं आकर्षण जबरदस्त आहे. समुद्रकिनारी जायचं, मोटरबोट्स भाड्यानं घ्यायच्या, बेधडक समुद्रात

घुसायचं, वाटेल त्या बेटावर उतरायचं आणि दोन–दोन दिवस सूर्यस्नान करीत तिथंच पडून रहायचं, हा यांचा साप्ताहिक सुटीचा ठरलेला कार्यक्रम! खाण्यासाठी 'MLEKO' म्हणजे दुधाची पाकिटं आणि 'HLTB' ऊर्फ पाव, या दोन गोष्टी बरोबर घेतल्या की अन्नप्रश्न सुटला! शिवाय या बेटावर मासे मारून खाता येतात, अर्थात खाण्यापिण्याच्या बाबतीत या लोकांच्या गरजा तशा कमीच. त्यामुळं त्यांचं कुठं अडत नाही, अन् प्रवास करून आल्यावर 'खायचे अगदी हाल झाले हो!' असलं रडगाणं कुणी सुनावत नाही.

पर्यटनाला युगोस्लाव्हियात एवढं महत्त्व दिलं जात असेल याची आम्हाला कल्पना नव्हती. अन्यथा आम्ही आमचा मार्ग आधीच ठरवला असता. एकंदरीत नग्न वसाहती बघण्याचं भाग्य (!) आमच्या नशिबात नव्हतं, हेच खरं!

मजल–दरमजल करीत आम्ही शंभर–सव्वाशे किलोमीटर्स अंतर कापून संध्याकाळच्या सुमाराला एका कँम्पिंग साइटजवळ येऊन पोचलो. एव्हाना थंडीनं सगळेजण काकडले होते. खोली भाड्यानं घ्यावी म्हटलं तर ते आम्हाला परवडणारं नव्हतं. मग आम्ही एक युक्ती केली. समोरासमोर अशा आमच्या मोटरसायकली उभ्या केल्या. मधे चांगलं पाच फूट अंतर ठेवलं, आणि गाड्यावर आमचे एअर बेडस् बांधून टाकले. हे झालं छप्पर. खाली दोन बेडस् दिले अंथरून. बस्स! झाली आमची सोय! दवापासून संरक्षण हवं होतं ते आम्हाला या प्रकारे मिळालं.

मौज म्हणजे इथल्या हॉटेलमधे आम्हाला चक्क पावटयाची उसळ–कम आमटी मिळाली. सगळ्यांनी या खाद्यावर मनसोक्त ताव मारला. खाद्याच्या चवीबद्दल न लिहिलेलंच बरं; पण आमटी ओरपण्याचं समाधान हेच आम्हाला अधिक होतं!

युगोस्लाव्हियातले खाद्यपदार्थ तसे बेचवच. भारतासारखं 'जिव्हासुख' युरोपात एकंदरीत नाहीच! 'CEVAPICI' म्हणजे मसालेदार मटण, 'SARNIA' म्हणजे मटण–पुलाव अन् 'BOSANSK LONAC' म्हणजे उकडलेली भाजी हे पदार्थ त्यातल्या त्यात बरे. दुधापासून केलेलं 'KAJMAK'

म्हणजे ‘चीज’ उत्तमच असतं, ‘ZUPSKO’ आणि ‘TIKVESKO’ यांसारखी लाल रंगाची मद्यं इथं मशहूर आहेत. पण या साऱ्या गोष्टी आमच्या आवाक्याबाहेरच्या होत्या. त्यामुळं अनावश्यक बाबींवर खर्च न करण्याचं असिधाराव्रत आम्ही कटाक्षानं पाळत होतो.

दुसऱ्या दिवशी लवकरच आम्ही झाग्रेबच्या दिशेनं निघालो. रस्ते उत्कृष्ट असल्यानं झपाट्यानं अंतर कापता येत होतं. हंगेरीच्या राजधानीकडे – बुडापेस्टकडे जाणारे रस्ते दर्शविणारे फलक अधूनमधून दिसायचे अन् वाटायचं, वळावं उत्तरेला अन् घुसावं हंगेरीत! बुडापेस्ट, प्राग, बर्लिन, म्युनिक, व्हिएन्ना वगैरे एरवी केवळ जगाच्या नकाशावर दिसणारी शहरं खूपखूप जवळ होती; पण एकदा निश्चित केलेला मार्ग बदलावा, तर सगळाच बेत कोसळायचा, अशी भीती वाटत होती.

युरोपात हीच तर मौज आहे. सगळे देश चिमुकले. दोन–अडीच महिन्यांत सगळा युरोप पहाता येतो. पासपोर्ट असला की झालं. व्हिसा मिळायला त्रास पडत नाही. शिवाय एका देशातून दुसऱ्या देशात जाण्यायेण्यासाठी ठिकाणं अनेक. त्यामुळं एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात जावं इतक्या सहजपणं लोक एका देशातून दुसऱ्या देशात जात–येत असतात. ‘इन्टर–रेल’ किंवा ‘युरो–रेल’नं तर सारा युरोप स्वस्तात बघता येतो. रेल्वेनंच युरोप बघायचा झाला तर अगदी थेट ग्रीसमधल्या अथेन्सपासून बेलग्रेड (युगोस्लाव्हिया), सोफिया (बल्गेरिया), बुखारेस्ट (रुमानिया), बुडापेस्ट (हंगेरी), व्हिएन्ना (ऑस्ट्रिया), रोम (इटली), म्युनिक (प० जर्मनी), बर्न (स्वित्झर्लंड), कोपनहेगन (डेन्मार्क), ॲमस्टरडॅम् (नेदरलँड), ब्रुसेल्स (बेल्जियम), पॅरिस (फ्रान्स), माद्रिद (स्पेन), लिस्बन (पोर्तुगाल) इतकंच नव्हे तर फ्रान्समधल्या ‘कॅले’पासून इंग्लिश खाडी पार करून डोव्हर मार्गे थेट लंडनलाही जाता येतं. हे सर्व लिहिण्याचं कारण एवढंच की, युरोपमधे पाय ठेवल्यावर आपल्याला सगळी ठिकाणं जवळजवळ वाटू लागतात आणि कुठं जावं नू कुठं नको असं होतं.

झाग्रेब शहराच्या जवळपास येऊन पोचलो तेव्हा तर आम्ही हंगेरी, ऑस्ट्रिया आणि इटली या तीन देशांच्या सरहद्दींपासून केवळ काही तासांच्या

अंतरावर होतो. मनाची चलबिचल होत होती. पण 'इटली' हेच आमचं गन्तव्य आधीच ठरलेलं असल्यानं त्यात अचानक बदल करणं योग्य नव्हतं.

झाग्रेब हे युगोस्लाव्हियातलं दुसऱ्या क्रमांकाचं शहर. 'जत्रेचं गाव' अशी या शहराची ख्याती. औद्योगिक प्रदर्शनं, संगीताचे जलसे, नाटकांचे आंतरराष्ट्रीय महोत्सव या गोष्टी इथं सहा-सहा महिने चालू असतात! 'झाग्रेब स्कूल ऑफ् ॲनिमेटेड कार्टून्स' ही संस्था जगात सर्वोत्कृष्ट समजली जाते. लोकनृत्य आणि चित्रकला यांचंही हे शहर म्हणजे केंद्रस्थान आहे. या शहरात विविध प्रकारची पन्नास म्युझियम्स आहेत. एका म्युझियममधे तर दीड लक्ष वर्षांपूर्वीच्या आदिमानवाचे अवशेष जतन केलेले आहेत. 'कापिना' नावाच्या गावाजवळ ते सापडले असं म्हणतात.

अशा या वहुरंगी झाग्रेबचं ओझरतं दर्शन घेऊन मार्गक्रमण करीत आम्ही दुपारी चारच्या सुमाराला लुबयाना (LJUBLJANA) मागं टाकलं आणि पोस्तोज्ना मार्गे इटलीच्या सरहद्दीवरील 'ट्रिएस्ट' (TRIESTE) या गावाकडे मोर्चा वळवला.

सूर्याची तिरपी किरणं सायंकाळची शोभा वाढवीत होती. इटलीची सरहद्द जवळ येत चालल्यानं अंगावर हर्षाचे रोमांच उभे रहात होते. छोटीछोटी असंख्य खेडी पार करीत आम्ही चाललो होतो. लोकवस्ती कमी म्हणून यांना खेडी म्हणायचं. अन्यथा शहरांप्रमाणेच रस्ते, वीज, नळाचं पाणी, वाहनं, डिपार्टमेंटल स्टोअर्स या सगळ्या गोष्टी इथं दिसत होत्या. धूळ, धुरळा तर नाहीच नाही. टुमदार घरं अन् घराभोवती फुलझाडं हे दृश्य आता नजरपाठ झालं होतं.

डोंगरमाथ्यावरून इटलीच्या सरहद्दीवरचं युगोस्लाव्हियातलं खेडं दृष्टिपथात आलं, आणि मी थांबलो. संध्याकाळच्या वेळी नवख्या देशात प्रवेश करण्यापेक्षा इथंच कुठंतरी रात्र काढावी असा विचार मी मांडला. रस्त्याच्या कडेला पण निर्जन अशा ठिकाणी एक पडकं घर मला दिसलं होतं. आम्ही तिकडे मोर्चा वळवला. घर कसलं ते? चार भिंती मोठ्या मुष्किलीनं उभ्या होत्या. मोठमोठी भगदाडं पडल्यानं त्या आणखीच भेसूर दिसत होत्या. शिवाय त्या भिंतींच्या

देहावर भरपूर गवतही वाढलेलं होतं. अशा या 'घरा'ला केवळ आकाशाचंच छप्पर होतं. या भूतबंगल्याच्या आडोशाला आमच्या गाड्या उभ्या करून आम्ही आपापले एअर–बेड्स पसरले. आता या बेड्सना असंख्य भोकं पडल्यानं त्यांचा फक्त सतरंजीसारखा उपयोग करता येणं शक्य होतं. हवा भरण्याच्या दृष्टीनं ते पार निकामी झाले होते. मी आणि रमेशनं सरहद्दीवरच्या खेड्यात जाऊन दुधाची पाकिटं आणली, आणि दुग्धप्राशन करून उद्याची स्वप्नं रंगवीत आम्ही निद्राधीन झालो . . .

पहाटेच्या वेळी मला अचानक जाग आली. धुक्याची दुलई पांघरून सगळी भूमी गाढ झोपी गेलेली होती. माझे सहकारीही शांत झोपलेले होते. नीरव शांतता आणि गर्द काळोख यांचं साम्राज्य भोवताली पसरलेलं होतं. मी गाड्यांकडे सहज नजर टाकली, तो काय? कुणीतरी टॉर्चच्या प्रकाशात त्यांची न्याहाळणी करीत होतं! मी खाडकन उठून उभा राहिलो. टॉर्चचा प्रकाशझोत माझ्यावर स्थिरावला. ते युगोस्लाव्ह पोलिस होते. सैनिकांना शोभेल अशा निळ्या गणवेपात निळ्याच रंगाची वायरलेस–मोटर घेऊन ते गस्त घालीत होते, आणि रस्त्यापासून खूप दूर असलेल्या आमच्या गाड्या त्यांच्या तीक्ष्ण नजरेतून सुटल्या नव्हत्या. त्या निर्जन ठिकाणी अशा तऱ्हेनं झोपणं हे या देशाच्या कायद्याला धरून नव्हतं. मी तावडतोव पुढं झालो आणि 'DOBRO JUTRO' म्हणून स्लाव्ह भाषेत 'शुभ प्रभातम्' केलं. त्यावरोवर त्या कायदाधाऱ्यांच्या उंचावलेल्या भुवया सरळ झाल्या. आमच्या गाड्यांकडे अंगुलिनिर्देश करीत मी उद्गारलो, 'यावा! यावा!' यावा म्हणजे 'जावा'. इंग्रजीतल्या 'जे'चा उच्चार हे लोक 'य' असा करतात. आमच्या गाड्या 'जावा' कंपनीच्या म्हणजे झेकोस्लोव्हाकियन बनावटीच्या –म्हणजेच पर्यायानं मित्रराष्ट्राच्या आहेत, असा त्यांनी समज करून घेतला. आम्ही भारतीय आहोत आणि इटलीकडे निघालो आहोत हे सांगितल्यावर तर 'दोवियेन्या' (DOVIAENJA) करीत ते निशाचर निघून गेले.

आज जुलै महिन्याची बारा तारीख. म्हणजे नऊ जूनला भारताची सरहद्द सोडल्यापासून बरोवर बत्तीस दिवसांनी पाच देश पार करून आम्ही इटलीत प्रवेश करणार होतो. आमचा आनंद गगनात मावत नव्हता. वर्षभर केलेल्या

परिश्रमाचं आज सर्वार्थानं चीज होणार होतं. महत्त्वाकांक्षा आज प्रत्यक्ष वस्तुस्थिती होऊन जन्माला येणार होती.

—अशाच तऱ्हेच्या आनंदमय विचारांनी बेभान होऊन आम्ही इटलीकडे भरधाव निघालो.

⌘ ⌘ ⌘

## ८

# इटलीतली 'फ्रेंच' पैज!

इटलीच्या सरहद्दीचं ठिकाण अगदी डोंगरमाथ्यावरच होतं. या देशाचा राष्ट्रध्वज आपल्याप्रमाणेच तिरंगी आहे; पण पट्टे उभे अन् क्रम निराळा. रंगाच्या या सारखेपणामुळे माझ्या मनात नकळतच या देशाबद्दल आत्मीयता निर्माण झाली. आमची तपासणी अशी झालीच नाही. पासपोर्टवर शिक्कामोर्तब झालं, एवढंच.

रमेश सगळ्यांच्या पुढे होता. कस्टम-अधिकाऱ्यांनी त्याला मोटारसायकलचा विमा उतरवण्यासाठी तिथल्या विमा-कचेरीत पाठवलं. आम्हीही पाठोपाठ गेलो. तोवर त्यानं सात हजार लिरा म्हणजे सत्तर रुपये देऊन त्याच्या गाडीचा विमा उतरवला होता. विम्यासाठी एवढे पैसे मोजणं आमच्या जिवावर आलं. छे छे! विमा न काढताच इथून निसटावं, असा विचार करून निर्विकार चेहेऱ्यांनी आम्ही सातजण तसेच मागे फिरलो आणि कस्टम-अधिकाऱ्यांजवळच उभ्या केलेल्या आमच्या गाड्यावर पटापट स्वार झालो.

आमच्या गाड्या 'स्टार्ट' होईपर्यंत रमेश त्याच्या गाडीच्या विम्याची कागदपत्रं चाळत उगाचच रेंगाळत उभा राहिला. साहजिकच आमच्या चारही मोटारसायकल्सचा विमा आम्ही उतरवला असणार असाच त्या बिचाऱ्या अधिकाऱ्यांचा समज झाला. आणि निदान तीन मोटारसायकल्सच्या विम्याचे पैसे वाचवून त्या अधिकाऱ्यांच्या हातावर तुरी देऊन आम्ही जे निसटलो ते थेट ट्रिएस्ट (TRIESTE) शहर येईपर्यंत कुठे थांबलोच नाही.


ट्रिएस्ट शहरापर्यंतचा रस्ता वळणावळणाचा होता. डोंगराच्या अगदी पायथ्याशी समुद्रसपाटीवरच हे शहर वसलेलं होतं. इटलीमधलं हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचं बंदर. अगदी सकाळच्या प्रसन्न वेळी आम्ही या शहरात प्रवेश केला. सर्वप्रथम 'यूथ होस्टेल' गाठावं या उद्देशानं आम्ही चौकशीला सुरुवात केली.

'यूथ होस्टेल'ला इटलीत 'ओस्टेल्लो टर्गेस्टे' म्हणतात. ट्रिएस्टमधलं 'यूथ होस्टेल' सुप्रसिद्ध 'मिरामार' रस्त्यावर असल्यानं ते शोधायला वेळ लागला नाही.

'यूथ होस्टेल' म्हणजे प्रवाशांना मोठाच आधार. युरोपमधे तर अशा वसतिगृहांचं जाळंच पसरलंय. भारतातल्या अनेक शहरातही 'यूथ होस्टेल्स' आहेत. पण त्यांचा फायदा आपण म्हणावा तसा घेत नाही. दिल्लीतल्या चाणक्यपुरी भागात न्याय-मार्गावर 'यूथ होस्टेल्स असोसिएशन ऑफ इण्डिया'चं मध्यवर्ती कार्यालय आहे. प्रवासाची हौस असणाऱ्यांनी या संस्थेचं सभासद व्हायलाच हवं. हॉटेल्सच्या मानानं 'यूथ होस्टेल्स'मधे अगदी किफायतशीर दरात रहाता येतं. युरोपमधल्या 'यूथ होस्टेल्स'मधे तर सगळ्याच सोयी असतात. रहाण्यासाठी फोमचे बिछाने, अंघोळीसाठी मुबलक पाणी, न्याहरीची सोय, गरमागरम दूध अन् शिवाय स्वैंपाकासाठी गॅस देखील भाड्यानं पुरवला जातो. आमच्याकडचे कितीतरी तरुण निरनिराळ्या निमित्तानं परदेशी जात असतात. विमानतळावर उतरले की ते सर्वप्रथम टॅक्सी पकडतात आणि जवळपासचं कुठलंतरी हॉटेल गाठतात. मग भले त्या हॉटेलचा रहाण्याचा दर काहीही असो! अशा वेळी 'यूथ होस्टेल'सारखा स्वस्त नि मस्त निवारा नाही.

विमानतळ बऱ्याच वेळा शहरापासून दूर असतो. याही वेळी बसनं शहरात यावं हे उत्तम. पर्यटकांसाठी माहितीकेंद्रं ठिकठिकाणी असतात. चारजणांकडे चौकशी केली तरी साधारण दर्जाचं हॉटेल मिळू शकतं. पण आमचा भारतीय पर्यटक आलेला असतो मोठमोठ्या बॅग्ज घेऊन! त्यामुळे शोधाशोधीच्या भानगडीत तो सहसा पडतच नाही. 'यूथ हॉस्टेल्स'बद्दल तो अनभिज्ञ असतो. 'बिझनेस टूर'साठी आला असल्यास हॉटेलमधे रहाणं तो प्रतिष्ठेची बाब समजतो; आणि अर्थातच अनावश्यक छानछोकीचा बळी ठरतो. असो.

ट्रिएस्टमधलं आमचं 'यूथ हॉस्टेल' फारच रम्य ठिकाणी होतं. 'मिरामार'च्या समुद्रकिनाऱ्यावरच ते वसलेलं होतं. अंगणातल्या वेलींच्या छायेत खुर्च्या-टेबलं ठेवलेली होती. तिथं बसून समोर पसरलेल्या ॲड्रियाटिक समुद्राच्या निळाईचं अवलोकन करण्यात मोठी मौज वाटायची. या होस्टेलचा दर्शनी भाग जसा सुंदर तशीच आतली रचना मोठी कल्पक. स्वागतकक्षामधे ट्रिएस्ट शहराची सुंदरसुंदर पिक्चर-पोस्टकार्डस् ठेवलेली होती. आपल्याला आवडेल ते घ्यायचं अन् होस्टेलच्या चालकाकडे आपण होऊन पैसे द्यायचे. उजव्या बाजूच्या खोलीत



शिस्तबद्ध रचनेच्या 'ट्रिएस्ट' शहराचे एक दृश्य

वृत्तपत्रं आणि प्रवाशांना मार्गदर्शक अशी पुस्तकं ठेवलेली होती. शिवाय या हॉस्टेलला भेट देणारे प्रवासीही स्वतःची वाचून झालेली पुस्तकं, कादंबऱ्या, मासिकं इथं सोडून गेले होते. त्यांचा लाभ इतर प्रवासी घेऊ शकत होते.

या वाचनकक्षात अभिप्रायासाठी एक भलीमोठी वही ठेवलेली होती. मी मुद्दाम ती चाळून पाहिली. जपान–थायलंडपासून इराक, लेबॅनॉन, नॉर्वे, स्वीडन इतकंच नव्हे तर झायरे, सेनेगल अन् दक्षिण–अमेरिकेतल्या प्रवाशांचे अभिप्राय मला वाचायला मिळाले. पण एकाही भारतीयानं या होस्टेलला भेट दिलेली दिसली नाही. वास्तविक 'ट्रिएस्ट'मधे अनेक भारतीय सतत येत असतात. आपल्याकडच्या मोठमोठ्या औषध कंपन्या या शहरातल्या 'लॉइड ट्रिस्टीनो',

'अॅड्रेटिका इटालिया' यांसारख्या मालवाहतूक करणाऱ्या जहाज कंपन्यांतर्फे त्यांना लागणारा कच्चा माल नेहेमीच आयात करीत असतात. ट्रिएस्टमधे असलेल्या 'इन्टरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ थिऑरिटिकल फिजिक्स' या जगप्रसिद्ध पदार्थविज्ञानसंस्थेत चालणाऱ्या चर्चासत्रांसाठीही अनेक भारतीय येत असतात. हे सारे लोक शहरातल्या मोठमोठ्या हॉटेल्समधे माणशी रोजच्या दहापंधरा हजार लिरा देऊन रहातात. त्यांचा खर्च कंपन्या किंवा त्यांना पाठविणाऱ्या शिक्षणसंस्था करीत असतात ना? करोत भले ते खर्च! पण एखाददोन दिवस मौज म्हणूनही स्वस्तातल्या 'यूथ हॉस्टेल'मधे रहाण्याचा विचार त्यांच्या मनात येत नाही याची खंत वाटते. पर्यायानं पर्यटनाच्या खऱ्या आनंदाला ते मुकतात. विदेशी मुद्रांचा व्यय होतो तो निराळाच! अभिप्रायाच्या त्या ग्रंथात मीही झक्कपैकी हिंदी मराठीत पानभर अभिप्राय लिहून ठेवला. माझं देवनागरीतलं लिखाण पाहून तिथं जमलेल्या अनेकांना गंमत वाटली. अक्षरावर रेघा मारणारी ही जगातली एकमेव लिपी आहे की काय नकळे!

वरच्या मजल्यावर तरुणींची रहाण्याची स्वतंत्र सोय होती. तरुणांसाठी तळघरात व्यवस्था होती. तळघर प्रशस्त आणि हवेशीर होतं. 'ट्–टाय' पद्धतीचे तीसपस्तीस पलंग होते. स्नानगृहं अतिशय स्वच्छ होती. मात्र एकाच गोष्टीची सुरुवातीला किळस वाटायची. अमेरिकन, कॅनेडियन लोक त्या ठिकाणी पूर्ण नग्न अवस्थेत अंघोळीचा कार्यक्रम करीत असत. रात्रीच्या वेळी नैसर्गिक अवस्थेतच झोपी जायचे. यात अमेरिकन निग्रोही असायचे. कालांतराने या सगळ्या प्रकाराची आम्हाला सवय झाली. अर्थातच त्यांचं अनुकरण करण्याइतकी लाज आम्ही मात्र कधी सोडली नाही, हे सांगायला नकोच!

'यूथ हॉस्टेल'मधलं स्वैंपाकघरही अद्ययावत होतं. आवश्यक ती सगळी भांडी, चमचे, पळ्या, बश्या तिथं होत्या. तासाला आठ आणे या दरानं स्वैंपाकाचा गॅसही उपलब्ध होता. आपणच आपलं जेवण तयार करायचं, वाढून घ्यायचं आणि जेवण उरकल्यावर भांडी पावडरनं घासूनपुसून चकचकीत करून ठेवायची. स्वावलंबनाचे कित्ते आम्ही तुर्कस्तानापासून गिरवीत आलो असल्यानं

अशा प्रकारच्या जीवनाला एव्हाना चांगलेच रुळलो होतो.

इटलीमधला आज आमचा पहिलाच दिवस असल्यानं सगळेजण घरचा स्वैंपाक सोडून इटालियन 'स्पॅघेटीज्' खायला उत्सुक होते. मिरामार किनारपट्टीवरच्या एका 'रिस्तॉरंते'मधे आम्ही शिरलो. फळांचं सॉस आणि खिमा घातलेला शेवयांसारखा पदार्थ आमच्यापुढे ठेवण्यात आला. काट्या-चमच्यांनी हा पदार्थ खाताना आमचीही अवस्था 'छोटीसी बात' चित्रपटातल्या असरानीसारखीच होत होती. 'तालिय तल्ले' हा पदार्थही इथं मशहूर आहे. याची जातकुळी स्पॅघेटीचीच. पण हा खायला त्यामानानं सोपा असतो. ताजे मासेदेखील इथं मिळत होते. पण फारच महाग. त्या मानानं कोळंबी, शिंपल्यातले मासे वगैरे स्वस्त. बशीभर कालवणाला फक्त वीस-पंचवीस रुपये! दचकलात ना? अहो, आपल्याकडच्या आठ-बारा आण्यांच्या बटाटा-चिप्सना या देशात सहाआठ रुपये सहज पडतात. पोटभर जेवायचं म्हणजे एका वेळी किमान चाळीसपन्नास रुपयांचा खुर्दा!

त्यामुळे पहिलंवहिलं जेवण उरकल्यानंतर पुनश्च हॉटेलच्या वाटेला आम्ही गेलो नाही. 'यूथ हॉस्टेल'मधेच आमच्या साग्रसंगीत स्वैंपाकाला सुरुवात झाली. आमचं कांदे-बटाटे चिरणं, तेलावर फोडणी देणं, तिखट मिरच्यांचा सढळ वापर करणं या गोष्टी 'होस्टेल'मधे कुतूहलाचा विषय झाला. इतर देशांचे तरुण-तरुणी आमच्या खमंग (!) भाज्यांची चव घेऊन पाहू लागले. योगायोगानं एका टेलिव्हिजन कंपनीचे लोक आमच्या ऐन स्वैंपाकाच्या वेळी नेमके हजर झाले, आणि त्याच संध्याकाळी आम्ही टेलिव्हिजनवर चमकलो!

दुपारच्या वेळी 'यूथ हॉस्टेल' साफसफाईसाठी बंद असायचं. त्या वेळी 'बीच'वर आलेल्या शेकडो -नव्हे, हजारो अर्धनग्न इटालियन तरुणतरुणींच्या जलक्रीडा बघण्यात आमचे तासनतास निघून जायचे. जून, जुलै, ऑगस्ट या तीन महिन्यांतला या लोकांचा कार्यक्रम जणू ठरलेलाच! सूर्योदयालाच समुद्रकिनारी यायचं, सोयीची जागा बघून (म्हणजे आडोसा मुळीच नव्हे!) बरोबर आणलेला रंगीबेरंगी टर्किश टॉवेल पसरायचा, झटपट कपडे काढायचे आणि जेमतेम एक वस्त्र अंगावर ठेवून, शरीराला कसलंसं तेल चोपडून आकाशाकडे तोंड करून उताणं पडून रहायचं. विरंगुळा म्हणून 'इल पिकोलो' किंवा 'ओग्गी' यांपैकी एखादा ताजा अंक जवळ बाळगायचा, अंग चांगलं लाल झालं की समुद्रात दोनतीन तास मनसोक्त जलक्रीडा करायची, कंटाळा आला की काठावर येऊन अंग पुसायचं अन् तसंच अर्धनग्न अवस्थेत

रस्त्यालगतच्या हॉटेलमधे जाऊन 'गेलाटो' ऊर्फ आइस्क्रीम खात बसायचं, हा यांचा नित्याचा कार्यक्रम. संध्याकाळी पाचनंतर मात्र बीचवरची गर्दी पटापट कमी व्हायची. सहाच्या सुमाराला तर सगळा बीच निर्जन व्हायचा. सुट्टीचे दिवस असल्यानं तासन्तास निष्क्रियपणे सूर्यस्नान करीत पडून रहाणारे हेच युरोपियन लोक इतर दिवशी मात्र आपापल्या उद्योगात पूर्णपणे निमग्न असतात, यातच त्यांच्या प्रगतीचं रहस्य साठलेलं आहे असं म्हणायला हरकत नाही.

'यूथ हॉस्टेल'जवळच 'कॅसेल्लो मिरामार' हा एक ऐतिहासिक किल्ला होता. त्याच्यापासून जवळच 'ग्रिगगॅनो' भागात पूर्वी उल्लेखलेली पदार्थविज्ञानसंस्था होती. प्रो. अबदुस् सलाम हे मूळचे पाकिस्तानातले विश्वविख्यात शास्त्रज्ञ हे या संस्थेचे आधारस्तंभ. या ठिकाणी जगाच्या कानाकोपऱ्यातून शास्त्रज्ञ येत असतात. जयपूर विद्यापीठाचे डॉ. बाबूलाल सराफ हे ख्यातनाम शास्त्रज्ञ स्वतः संशोधन करून तयार केलेली प्रात्यक्षिकाची उपकरणं घेऊन तिथे आले होते. त्यांच्याशी माझा घनिष्ट संबंध आला. गेल्या वर्षी या डॉक्टरमजकुरांना याच उपकरणांबद्दल 'अमेरिकन फिजिकल सोसायटी'चं खास पारितोषिक बहाल करण्यात आलं होतं, तर डॉ. अबदुस् सलाम हे या पदार्थविज्ञानसंस्थेचे अठ्ठयाहत्तर सालच्या 'नोबेल पारितोषिका'चे मानकरी होते.

ट्रिएस्ट शहरात जाण्यासाठी एका बसनं बार्कोला गावापर्यंत जाऊन तिथून 'टर्मिनी'कडे जाणारी दुसरी बस पकडावी लागे. बसचं कमीत कमी तिकिट शंभर लिरा. बसनं प्रवास करायचा म्हणजे शंभर लिरांची नाणी सतत बरोबर असावी लागतात. बसमध्ये कंडक्टर नसतो. आपणच यंत्रामधे नाणं टाकायचं आणि यंत्रातून येणारं तिकिट संभाळून ठेवायचं. कळ दाबून दार उघडण्याचं वा बंद करण्याचं काम ड्रायव्हर जागेवरूनच करीत असतो. निळ्या रंगाचा गणवेष, डोक्यावर निळ्या रंगाची टोपी अन् डोळ्यांवर रेबॅनचा रुबाबदार गॉगल अशा थाटातले हे ड्रायव्हर्स एअरफोर्सच्या अधिकाऱ्यांप्रमाणेच वाटतात. सैनिकांना शोभेल असा वक्तशीरपणाही त्यांच्यांत आढळतो. बसनं नेहमी प्रवास करणाऱ्यांसाठी पेपर स्टॉलवर बसची तिकिटं (DIGLETTI) अगोदरच घेऊन ठेवता येतात. अशी तिकिटं बसमधल्या यंत्रावर 'पंच' केली की झालं! अशा तऱ्हेचा उपक्रम मुंबईच्या 'बेस्ट'नं करायला काय हरकत आहे? फार तर अशी तिकिटं 'पंच' करण्याचं काम कंडक्टर्सवर सोपवावं, म्हणजे निदान सुट्या पैशांची नेहेमीच जाणवणारी अडचण बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकेल. निदान एक प्रयोग म्हणून तरी वर्ष-सहा महिने हे करून पहायला हरकत नसावी.

ट्रिएस्ट शहरात चलन बदलून देणारी केंद्रं (CAMBIO) अनेक ठिकाणी होती. बसस्टँड आणि रेल्वेस्थानक या ठिकाणी तर त्यासाठी खास व्यवस्था होती. इथल्या रेल्वेस्थानकावर रोम, पॅरिस, व्हिएन्ना वगैरे ठिकाणी जाणाऱ्या गाड्या उभ्या होत्या. रेल्वेस्थानकांसमोर 'युगोस्लाव्ह मार्केट' होतं. युगोस्लाव्हियाच्या नागरिकांना त्यांच्या मालाची विक्री करायची या ठिकाणी परवानगी होती. मोटर्सच्या डिकीमधून वूलनचे कोट, जर्किन्स वगैरे आणून ते सर्रासपणे विकत होते. त्यांशिवाय स्वेटर, पायमोजे, टॉर्चेस, छत्र्या, पिशव्या, उत्तमोत्तम गृहोपयोगी वस्तू यांनी सगळं मार्केट भरलेलं होतं. या युगोस्लाव्ह लोकांना फक्त ट्रिएस्ट शहरापुरताच व्हिसा असतो. पण तरीही अनेकजण गुपचुपपणे समोरच्या रेल्वेस्थानकावर असलेल्या गाडीत व्हेनिसचं किंवा रोमचं तिकिट काढून बसतात. पण गाडीत येणारे तपासनीस त्यांना चेहेऱ्यावरून अचूक ओळखतात आणि त्वरित पोलिसांकरवी ट्रिएस्टला परत पाठवतात.

'उपीम', 'कॉइन' आणि 'स्ट्रँडा' ही इथली डिपार्टमेंटल स्टोअर्स. काटे, चमचे, सुऱ्या, सौंदर्यप्रसाधनं, इलेक्ट्रिक उपकरणं आणि 'त्रिमिति-चित्रं' यांनी ही खचून भरलेली आहेत. चामड्याच्या वस्तू आणि सुती कापडाचे कपडे या देशात फारच महाग. आपल्या देशात फारसा प्रसिद्ध नसलेला कबीर बेदी हा सिनेनट या देशात त्याच्या 'संदोकान्'च्या ऐतिहासिक भूमिकेमुळे लोकप्रिय ठरला आहे. त्याचं चित्र छापलेले टी-शर्टस् अनेक दुकानांच्या शो-केसमधे लावलेले होते. शाळा-कॉलेजच्या मुलांसाठी विक्रीला ठेवलेली वह्या-पुस्तकं अतिशय आकर्षक होती. त्यांची मांडणीही कल्पकतेनं केलेली होती. आपल्याकडच्या वह्यांवर हेमामालिनीची चित्रं हमखास दिसतात. इथं मात्र जिना लोलोब्रिजिडा या इटालियन अभिनेत्रीचं चित्रं कुठल्याही वहीवर नव्हतं. वह्यांच्या मुखपृष्ठावर एखाद्या प्रेक्षणीय अथवा ऐतिहासिक स्थळाचं चित्र आणि ते स्थळ ज्या प्रांतात आहे त्याचा नकाशा मलपृष्ठावर, असा जणू इथं संकेतच आहे. शिवाय आतल्या बाजूला आवश्यक ती माहिती आणि इतिहास लिहिलेला. किती सुंदर कल्पना आहे! आपल्याकडेही अशा तऱ्हेचा उपक्रम कुणी सुरू केला तर विद्यार्थ्यांना त्यायोगे बरीच माहिती पुरवता येणं शक्य आहे.

ट्रिएस्ट शहरात फिरत असताना आम्हाला काही आशियाई खलाशी भेटले. त्यांच्यापैकी बहुतेकजण ग्रीक कंपन्यांच्या रेलवाहू जहाजांवर अक्षरशः पडेल ते काम करीत होते आणि जहाज जाईल तसतसे भरकटत जात होते. घरी जायला ते फारच उत्सुक दिसले. पण त्यांचं जहाज त्यांच्या मायदेशी जाईल तेव्हाच

ते शक्य होतं. तोपर्यंत 'मुकी विचारी कुणीही हाका' अशीच त्यांची अवस्था होती.

शहरात भरपूर भटकल्यानंतर मी आणि रमेशनं इथल्या 'लायन्स क्लब'च्या अध्यक्षांचं घर शोधून काढलं. त्यांचं नाव दोत्त दिनो पापो (DOTT DINO PAPO) या दिनो पापोंना आम्ही 'दिना बामा पाटील' असं गमतीनं नाव देऊन टाकलं. त्यांचे एक मित्र होते दोत्त साल्व्ह (DOTT SALVE) या नावाचे त्यांना 'दत्ता साळवी' हे नाव फिट्ट बसत होतं. या डॉक्टरद्वयानं आमची आस्थेनं विचारपूस केली. दिनो पापोंचा पत्ता आम्ही घरच्या मंडळींना निघण्यापूर्वीच दिला असल्यानं सगळ्यांची पत्रं त्यांच्याकडे आलेली होती. त्या पत्रांचं पुडकं घेऊन आम्ही 'यूथ होस्टेल'वर येऊन थडकलो, तेव्हा सगळ्यांनी आपापली पत्रं मोठ्या अधाशीपणानं वाचून काढली. दिल्ली सोडल्यापासून आम्ही घरी पत्रं पाठवीत होतो पण आम्हाला घरचं कुशल समजत नव्हतं. आज प्रथमच ही पत्रं वाचून आमची मनं घरच्या आठवणींनी इतकी भरून आली होती!

पत्रवाचनाचा कार्यक्रम आटोपतोय तोच 'यूथ होस्टेल'चा फोन खणाणला. तो दिनो पापोंचा होता. 'हॉटेल कोलंबिया' या प्रथम दर्जाच्या हॉटेलमधे रहाण्यासाठी आम्हाला आमंत्रण मिळालं. पडत्या फळाची आज्ञा शिरसावंद्य मानून आम्ही लागलीच बाडबिस्तरा आवरला आणि शहराच्या नकाशावरून ते हॉटेल बिनचूक शोधून काढलं. 'लायन्स क्लब'च्या सौजन्यानं आमची एक रात्र या ठिकाणी फारच ऐषारामात गेली. 'बँक ऑफ रोम'चे एक संचालक पामेलो बेनेटोन यांच्याशीही आमचा परिचय झाला. पण भाषेच्या अडचणीमुळे तिथल्या बँकिंग पद्धतीवर चर्चा करणं फारसं शक्य झालं नाही. बेनेटोन हे स्वभावानं प्रेमळ वाटले. त्यांच्याबरोबर 'बँक ऑफ रोम'मधे आम्ही मुद्दाम जाऊन आलो.

डॉक्टर दिनो पापोंची 'फार्मासिया' बघितल्यावर मी त्यांच्या घरीही गेलो. डॉक्टरसाहेब मोठे हौशी होते. आपल्या मुलासाठी त्यांनी 'सुझुकी' मोटरसायकल जशी घेतली होती, त्याचप्रमाणे सुट्टीत आपल्या दवाखान्यावर 'CUISO PER FERIE' म्हणजे 'CLOSED FOR HOLIDAY' – 'सुट्टीसाठी बंद' – असा बोर्ड लावून महिनामहिना समुद्रातल्या अज्ञात बेटांवर जाऊन रहाण्यासाठी एक मोटरलॉंचच त्यांनी खरेदी केली होती. घरातल्या दिवाणखान्यात फार्मसीवरच्या ग्रंथांचंच साम्राज्य होतं. सगळे ग्रंथ इटालियन भाषेतले. इंग्रजी औषधापुरतीही कुठं दिसत नव्हती. डॉक्टरांना इंग्रजीची मुळाक्षरंही येत नव्हती. तरीही वैद्यकीय ज्ञानात त्यांचा हात धरणारा साऱ्या शहरात दुसरा कुणी नव्हता!

तसं म्हटलं तर सारा इटली देशच गेल्या दोन शतकांत शास्त्रीय ज्ञानात आघाडीवर आहे. लिओनार्डो फिबोनाची हा गणितज्ञ, निकोलो फोन्ताना हा बीजगणितज्ञ, कॅलक्युलसचा निर्माता तोरीचेली आणि रक्ताभिसरणावर संशोधन करणारा अँड्रो सेसाल्पिनो ही मंडळी कदाचित बऱ्याचजणांना ठाऊक नसतील. पण बॅटरीमधून बीजनिर्मिती करणारा अलेसांद्रो व्होल्ता, शरीरातून वीजप्रवाह जातो हे सिद्ध करणारा गाल्व्हनी आणि गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त मांडणारा गॅलिलिओ गॅलेली ही नावं कुणाला माहीत नाहीत? सन १९५७, १९५९ आणि १९६३ या तीन वर्षी शास्त्रीय संशोधनाचं नोबेल पारितोषिक इटलीनं मिळवलं होतं. विशेष म्हणजे 'ज्ञानभांडाराची चावी' समजली जाणारी इंग्रजी भाषा त्यांच्यापैकी कुणालाही येत नसताना!

त्यामुळे डॉक्टरमजकुरांना इंग्रजी येत नव्हतं याचं मला मुळीच आश्चर्य वाटलं नाही. खेद तर नाहीच नाही. पण त्यांच्याशी संभाषण करायचं तरी कसं? अर्थात डॉक्टरांनीच यावर उपाय शोधून काढला. शेजारच्या बंगल्यातल्या फ्लॉरा नावाच्या एका तरुण स्त्रीला त्यांनी फोन करून बोलावून घेतलं. पाच मिनिटांत फ्लॉरा हजर झाली. तिला उत्कृष्ट इंग्रजी येत होतं. ती येताच डॉक्टरांच्या सौभाग्यवतीही दिवाणखान्यात आल्या. "काय – बिअर की कॉफी?" त्यांनी प्रश्न केला. "अर्थात कॉफी" मी उत्तर देऊन मोकळा झालो. मोहाला बळी न पडल्याबद्दल मी स्वतःला मनातल्या मनात शाबासकी देतोय तोच सौ. पापो बिअरचा पूर्ण भरलेला ग्लास फ्लॉरासाठी आणि फक्त दोन बोटं कॉफीनं भरलेला [illegible] [illegible] माझ्यासाठी घेऊन आल्या. माझा बावळटपणा मला कळून चुकला!

फ्लॉराचं व्यक्तिमत्त्व मोठं आकर्षक होतं. तशा इटालियन स्त्रिया जात्याच नखरेल! पण फ्लॉराचं इतिहास, राजकारण आणि तत्कालीन घडामोडींबद्दलचं ज्ञानही जबरदस्त होतं. इटलीबद्दलची माहिती मिळवण्यासाठी ही आयतीच संधी चालून आली होती. फ्लॉराला मी माझं मनोगत सांगितलं. तिनं मोठ्या अभिमानानं बोलायला सुरुवात केली. . .

इटली हा दोन्ही महायुद्धात होरपळून निघालेला देश. पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांच्या बरोबर, तर दुसऱ्या महायुद्धात मुसोलिनीच्या फॅसिझमला बळी पडून त्यानं जर्मन नाझींशी हातमिळवणी केली होती. परिणामी या देशाची शकलं उडाली. अर्थव्यवस्थाही सपशेल कोलमडली. अखेर इटालियन जनतेनंच राजसत्ता झुगारली आणि १ जानेवारी १९४८ रोजी ते एकसंध प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून

घोषित झालं. या देशाचं पार्लमेंट दोन सभागृहांचं : 'सीनेट' आणि 'चेंबर ऑफ डेप्युटीज.' पैकी सीनेटवर प्रतिनिधी निवडून द्यायचा अधिकार पंचवीस वर्षांवरच्या सगळ्यांना; तर 'चेंबर ऑफ डेप्युटीज'च्या प्रतिनिधींची निवड केवळ पंचेचाळीस वर्षांवरचे नागरिकच करू शकतात. इटलीत तसे पक्ष दहाबारा आहेत; पण 'ख्रिश्चन डेमोक्रॅटिक' पक्ष आघाडीवर. त्याखालोखाल कम्युनिस्ट पक्षाचा जोर आहे.

'युनिटा' या कम्युनिस्ट मुखपत्राचा खप साडेचार लाखांपेक्षा जास्त आहे. 'डेला सेरा' आणि 'ला स्टॅपा' यांचा खपही प्रत्येकी पाच लाखांच्या आसपास आहे. पण ही दैनिकं कोणत्याही राजकीय पक्षाला वाहून घेतलेली नाहीत. 'अल्बा', 'बेल्ला' आणि 'ग्राझिया' यांसारख्या स्त्री–मासिकांचा, तसंच 'डोमिनिका डेल कोरेरी', 'ओग्गी', 'जेंटे', 'टेंपो' यांसारख्या मासिकांचा खप दहा लाखांहून अधिक आहे. दैनिकांना आणि मासिकांना एवढी जबरदस्त मागणी इतरत्र क्वचितच असेल!

इटलीचा शेतीवरही चांगलाच जोर आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीनं महाराष्ट्रापेक्षा लहान असलेल्या या कृषिप्रधान देशात आज सुमारे सात लक्ष ट्रॅक्टर्सचा वापर होतोय! नुसत्या गवताचं उत्पादनच मुळी प्रतिवर्षी नऊ कोटी क्विंटलच्या आसपास येतं. सीझनला द्राक्षांचं उत्पादन सोळासतरा कोटी क्विंटल होतं, आणि त्यापासून सुमारे एक कोटी क्विंटल उत्तम प्रतीचं मद्य तयार केलं जातं. जगात एकचतुर्थांश मद्याची गरज केवळ इटलीकडून भागवली जाते. असं असूनही भारतातल्या अन् विशेष करून महाराष्ट्रातल्या द्राक्षांना इटलीच्या बाजारपेठेत मागणी आहेच!

औद्योगिक क्षेत्रात इटली म्हणावी तितकी प्रगत नाही. तरीही टोरिनो शहरातला 'फियाट' मोटर्सचा अन् 'सिएट' टायर्सचा कारखाना जगद्विख्यात आहे. आपल्याकडची 'लँब्रेटा' स्कूटर पूर्वी मिलान शहरातल्या 'इनोचेंटी कंपनी'च्या सहकार्यानं तयार होत असे.

बांधकामाच्या क्षेत्रात इटलीच्या तंत्रज्ञांनी जगभर नाव कमावलं आहे. रशियाची 'ट्रान्स–सैबेरियन' रेल्वे, स्पेन–पोलंडमधले अवघड ठिकाणचे महामार्ग आणि स्वित्झर्लंडमधले वीजप्रकल्प या सगळ्यांसाठी इटालियन तंत्रज्ञांचीच नेमणूक झाली होती. इतकंच कशाला, उत्तर–दक्षिण–अमेरिका खंडामधल्या पनामा कालव्याचा आराखडा तयार केला तो इटालियन तंत्रज्ञ गेरेला यानंच. सुएझ कालवा बांधला गेला तोही इटालियन स्थापत्यविशारद नेग्रेली

याच्या देखरेखीखाली. आफ्रिकेतले वीजप्रकल्पही इटलीचेच आहेत. वॉटरगेट–करारानुसार वॉशिंग्टनजवळ पोटोमॅक् नदीच्या परिसरात बाराशे अपार्टमेंट्स असलेली एक अतिप्रचंड इमारत बांधण्याची कामगिरीही इटालियन तंत्रज्ञांवरच सोपवली गेली होती. आपल्याकडच्या मुंबई–कलकत्ता शहराच्या जीवनाचा आज एक अविभाज्य भाग झालेल्या 'लोकल' गाड्यांची जननी इटलीच आहे हे कसं बरं विसरता येईल?

इटलीबद्दलची एवढी तपशीलवार माहिती मिळाल्यानं ती कोयनेलची आठवण करून देणारी कडवट कॉफी मी केव्हा संपवली ते कळलंच नाही. बराच उशीर झाला असल्यानं फ्लॉराशी हस्तांदोलन करून आणि डॉक्टर दांपत्याचे पुनःपुन्हा आभार मानून मी त्यांचा निरोप घेतला.

इकडे माझे सहकारी 'कोलंबिया'वर गाड्या सज्ज ठेवून माझी प्रतीक्षा करीत होते. दुपारचे दोन वाजले होते. कडकडीत उन्ह पडलं होतं. तीन तासांत आम्ही व्हेनिस गाठणार होतो. पण पन्नाससाठ किलोमीटर्सवरच तुफान पावसाच्या माऱ्यानं आम्ही चिंब भिजलो. थंडीनं कुडकुडल्यामुळे गरमागरम दूध प्यायची इच्छा झाली. पेट्रोलपंपावरच एक 'कॅफे' होतं. दुधाला इटलीत 'लात्ते' (LATTE) म्हणतात. पण 'गरम' या अर्थाचा इटालियन शब्द कुणा लेकाला माहीत होता? काउंटरवरच्या बाईनं पृच्छा केली, "लात्ते? काल्डो–फ्रेडो?" काल्डो म्हणजे 'कोल्ड' असणार असं समजून मोठ्या हुशारीनं मी 'फ्रेडो लात्ते'ची ऑर्डर देऊनही टाकली. कारण आम्हाला गरम दूध हवं होतं. पण माझा अचानक त्रिफळा उडाला! बर्फासारख्या थंडगार दुधाचे ग्लासेस समोर आले! माझा चेहेरा एरंडेल प्याल्यासारखा झाला.

पाऊस थांबताच आम्ही पेट्रोलपंपावर 'बेंझिन नोर्माले' भरायला गेलो. या ठिकाणी कुणी माणूस नव्हता. आपणच तिथल्या मशिनमधे एक हजार लिरेची म्हणजे दहा रुपयांची नोट न दुमडता टाकायची, म्हणजे तेवढ्या किंमतीचं पेट्रोल आपोआप भरलं जातं.

आता आम्ही 'आटोबान' या नावानं प्रसिद्ध असलेल्या युरोपमधल्या हायवेवरून चाललो होतो. रस्ते खूपच रुंद होते. आटोबानवरून जाण्यासाठी टॅक्स द्यावा लागतो. हे रस्ते बहुधा गावांच्या बाहेरून काढलेले असतात. यांना वळणं नसतात. वळायचं झालं तर फ्लायओव्हर किंवा भुयारी रस्त्यावरून जावं लागतं. रस्त्यालगतच्या गावात जायचं म्हटलं तरी ठराविक ठिकाणी असलेल्या 'USCITA' म्हणजे 'एक्झिट' मधूनच बाहेर पडावं लागतं. एखाद्या ठिकाणी

उतरायचं झाल्यास खूपच अगोदर ठरवावं लागतं. कारण ते ठिकाण नजरचुकीनं मागं पडलं तर परत उलटं फिरणं शक्य नसतं. अन् फिरायचंच झालं, तर कित्येक किलोमीटर्सचा फेरा पडतो.

सहाच्या सुमाराला आम्ही 'मेस्ट्रे'पर्यंत आलो. रमेश–अविनाशनं तासभर हिंडून एक छानसं 'कँपिंग' हुडकून काढलं. 'CA NOGHERA' या छोट्या इटालियन खेड्याच्या वेशीवरतीच ते होतं. त्याचं नाव 'अल्बा दि ओरो'. व्हेनिस शहर इथून फक्त चौदा किलोमीटर्स अंतरावर होतं. व्हेनिसचा 'मार्को पोलो एअरपोर्ट' अगदी जवळच होता. त्यामुळे परदेशी पाहुण्यांनी 'कँपिंग'चा परिसर अगदी फुललेला होता. अनेकांनी आपल्या मोटरींना जोडून 'कॅरेव्हान' आणले होते. कॅरेव्हान म्हणजे चार चाकांवरचं घरच म्हणा ना. या घरात फ्रीज असतो. स्वैंपाकाची सोय असते, झोपण्यासाठी पलंग असतो. असे 'कॅरेव्हान' भाड्यानंही मिळतात. ते आपल्या मोटरला जोडले की झालं!

समुद्रात सफर करण्याच्या उद्देशानं आलेले प्रवासी मोटरच्या टपावर रंगीबेरंगी रबरी होड्या घेऊन आले होते. 'कँपिंग'चा परिसर उंचउंच वृक्षांमुळं आणि फुलझाडांमुळं फारच नयनरम्य दिसत होता. त्यातच प्रवाशांनी उभारलेल्या विविधरंगी तंबूंमुळं त्याचं सौंदर्य अधिकच खुलून दिसत होतं. युरोपमधल्या लोकांना तंबूत रहाण्याची फारच आवड दिसते. सुट्टीची मौज लुटण्यासाठी लक्षाधीशही निसर्गरम्य वातावरणात तंबू ठोकून रहाणंच पसंत करतात. अर्थात ज्यांच्याकडे तंबू नाहीत त्यांच्यासाठी या 'कँपिंग साइट'मधे टुमदार पर्णकुटी होत्या. रात्री पाऊस पडण्याची दाट शक्यता असल्यानं आम्हाला पर्णकुटीत रहाणं भाग होतं. आमचा अंदाज खरा ठरला. रात्रभर पावसाची रिपरिप चालू होती. पण त्यामुळं प्रथम दर्जाच्या 'हॉटेल कोलंबिया'प्रमाणंच या पर्णकुटीतही आम्ही सुखानं विसावलो.

आज व्हेनिस बघायचं होतं. वयाच्या सतराव्या वर्षी वडिलांबरोबर थेट चीनपर्यंत प्रवास केलेल्या मार्को पोलोचं हे गाव. जगातलं एकमेवाद्वितीय असं हे 'कालव्यांचं शहर.' विल्यम शेक्सपीयरनं ज्या पार्श्वभूमीवर 'मर्चंट ऑफ व्हेनिस' ही अमर नाट्यकृती निर्माण केली, त्या चित्रमयजगतात आम्ही वावरणार होतो. सारं शहर पायीच फिरायचं होतं. कारण या ठिकाणी कोणतीही वाहनं नेता येणार नव्हती. शहराबाहेर हजारो मोटर्स, स्कूटर्स उभ्या होत्या. त्यांतच आमच्या भारतीय मोटरसायकल्सही उभ्या ठाकल्या. प्रत्येक गाडीमागे पाचशे लिरा म्हणजे पाच रुपये निव्वळ 'पार्किंग चार्ज' द्यावा लागला. व्हेनिसच्या

मध्यवर्ती बाजारपेठेकडे जाणाऱ्या सेंट मार्कोच्या एका मोटरलाँचमधे आम्ही चढलो.

या ठिकाणी ॲड्रियाटिक समुद्र अनेक मार्गांनी जमिनीच्या अंतर्भागात घुसल्यानं छोटीछोटी बेटं तयार झाली आहेत. त्यांना 'लॅगून्स' म्हणतात. मुरानो, बुरानो, लिडो वगैरे 'लॅगून्स' महत्त्वाची. व्हेनिसमधून जाणारा प्रमुख जलप्रवाह म्हणजे 'ग्रँड कॅनॉल' याच्या सुमारे दीडशे शाखा–उपशाखा शहरात पसरलेल्या आहेत. यांमधून वाहतूक करणाऱ्या छोट्या–छोट्या नक्षीदार पडावांना 'गोंडोले' म्हणतात. व्हेनिसमधली सगळी घरं पाण्यात उभी आहेत. वरं, इतकी वर्षं पाण्यात असूनही या घरांच्या भिंतींना कुठं तडे गेलेले नाहीत की शेवाळ्यानं त्या खराब झालेल्या नाहीत. घरांच्या गॅलरीत रंगीत फुलझाडांच्या कुंड्या कलात्मक पद्धतीनं ठेवलेल्या होत्या. 'ग्रँड कॅनॉल'मधून लोकांच्या झुंडीच्या झुंडी गोंडोलेमधून फिरत होत्या. पायी जाणाऱ्यांसाठी या कालव्यांवर असंख्य कमानी उभारलेल्या होत्या. त्यांवर उभं राहून 'ग्रँड कॅनॉल'ची शोभा बघण्यासाठी अनेकांनी गर्दी केली होती. आम्ही या सौंदर्याचं आकंठ पान करीत 'सेंट मार्को'च्या किनाऱ्यावर उतरलो.

– आणि एखाद्या आर्ट–गॅलरीमधून फेरफटका मारतोय असं आम्हाला वाटू लागलं. 'सेंट मार्को'च्या कॅथेड्रल चर्चच्या परिसरात पर्यटकांनी टाकलेले दाणे टिपण्यासाठी कबुतरांचे थवेच्या थवे फडफड करीत होते. चर्चच्या घुमटावर



पाण्यात उभी द्वारका! – व्हेनिस शहराचे हे विलोभनीय दृश्य!

घंटानाद करणाऱ्या शिरस्त्राणधारी सैनिकांचे पुतळे विलोभनीय दिसत होते. चर्चचा अंतर्भागही मोठा चित्तवेधक होता. शेकडो वर्षांपूर्वीच्या चित्रकृती अगदी ताज्या वाटत होत्या. प्रत्येक खांबाच्या कोनाड्यात काळे डगले घातलेले धर्मोपदेशक बायबलचं पारायण करीत निःस्तब्धपणे उभे होते. त्या शांत, पवित्र वातावरणानं प्रभावित होऊन आम्हीही नकळत क्षणभर ईश्वरचरणी नतमस्तक झालो.

चर्चच्या बाहेर समुद्रकिनारी तर मोठी जत्राच भरली होती. हस्तिदंती आणि धातूच्या नक्षीदार वस्तू, गळ्यातल्या माळा, उत्तमोत्तम चित्रकृती यांचं जणू प्रदर्शनच भरलं होतं. दहा मिनिटांत आपलं चित्र हुबेहूब काढून देणारे चित्रकार गर्दी खेचत होते. एखाद्या स्वप्ननगरीतून आम्ही वावरतोय असं वाटत होतं.

दिवसभर मनसोक्त भ्रमंती करून आम्ही 'कँपिंग'वर परतलो. इस्तंबूलपासून संभाळत आणलेल्या गॅसचं सिलेंडर आता संपलं होतं. पण चिंता करण्याचं कारण नव्हतं. कारण इथं छोटेछोटे गॅसचे स्टोव्हच उपलब्ध होते. बोर्नव्हिटाच्या डब्याएवढं त्याचं गॅस सिलेंडर. किंमत सहासात रुपये. गॅस संपला की फक्त सिलेंडर तेवढा बदलून बर्नरला बसवलं की झालं! मिनिमार्केटमधून बटाटे अन् पोमेडोर'आणून बटाट्याचा खमंग रस्सा करण्याच्या तयारीला आम्ही लागलो. 'पाने' ऊर्फ पाव आमच्याकडे होतेच. रस्सा तयार होईपर्यंत आमच्यापैकी अनेकांनी कँपिंगमधल्या पोहण्याच्या तलावात जलक्रीडेची मौज लुटली. पोहण्याचा पोषाख असेल तरच इथे प्रवेश! फुलपँट घालून तर आतही शिरकाव नाही. इतकंच नव्हे, तर 'कबड्डी पोषाख'सुद्धा त्यांना चालत नव्हता! या हट्टाला काय म्हणावं?

हो! पोषाखावरून आठवण झाली. आमच्या पर्णकुटीसमोर एक फ्रेंच युगुल तंबू ठोकून रहात होतं. ती तरुणी फारच लावण्यवती होती. त्यातून पोषाखाबद्दलच्या कमालीच्या काटकसरींमुळे तर तिच्या प्रमाणबद्ध अंगप्रत्यंगातून उसळणारं यौवन कुणालाही वेड लावील असंच होतं. या फ्रेंच तरुणीबरोबर फोटो काढण्यासाठी आमच्यात पैज लागली.

मी आव्हान स्वीकारलं. संधी मिळताच तिच्या नवऱ्याची ओळख करून घेतली अन भीतभीतच माझं मनोगत त्याला सांगितलं. "हात्तिच्या! एवढंच ना?" तो फ्रेंच भाषेत म्हणाला आणि त्यानं त्या सुंदरीला तत्काळ तंबूबाहेर बोलावलं. तीही लगबगीनं बाहेर आली. तिच्या शरीरावर वस्त्र नावापुरतंच होतं. मला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. पण फोटो काढायचाय हे कळताच,

"थांबा हं, आलेच मी." असं म्हणून ती पुन्हा तंवूत शिरली. – झालं! म्हणजे आता ही वया लांबच लांब झगा घालून कोपरापर्यंत हातमोजे चढवून आणि सगळं शरीर झाकून येणार फोटो काढायला? माझा चेहेरा अक्षरशः फोटो काढण्यासारखा झाला. याचसाठी का केला होता हा अट्टाहास! पण तेवढ्यात बाईसाहेब बाहेर आल्या त्या फक्त बूट चढवून! बाकी 'पोपाख' पूर्ववत! अच्छा! म्हणजे फोटोत फक्त अनवाणी असता कामा नये! शरीरावर कपडे असणं किंवा नसणं ही बाब दुय्यम होती तर! अर्थात हे सगळं उन्हाळ्यात. एरवी कपड्यांच्या फॅशन्समधे फ्रेंच स्त्रियांचा हात कुणी धरू शकत नाही हे सांगायला नकोच!

व्हेनिसमधे आम्ही छानसे तंवू खरेदी केले. एक तंवू साधारण वीस–पंचवीस डॉलर्सना पडतो, आणि त्यात दोन माणसांना ऐसपैस झोपता येतं. वजनालाही हे हलके असतात. दहा मिनिटांत ते उभारता येतात. असे तंवू घेतल्यानं निवाऱ्याचा प्रश्न आता कायमचा सुटला होता. शिवाय पैशांची खूपच बचत होणार होती ती निराळीच.

'आटोवान'वरून आमचा प्रवास सुरू झाला. इटलीच्या दक्षिणेकडे आम्ही चालो होतो. रोमपर्यंतचा पल्ला सुमारे सहाशे किलोमीटर्सचा होता. इटलीतला



अशाच एका निवान्त परिसरात आम्ही टाकलेला तंबू

औद्योगिक परिसर आता मागे पडत चालला होता. टोरिनो, मिलानो, कोमो, ब्रेशिया वगैरे औद्योगिक शहरं उत्तरेकडे राहिली होती. आता आम्ही डोंगराळ पण निसर्गरम्य अशा प्रदेशातून चालली होतो. रस्ते अतिशय सुंदर असल्यानं बोलोनिया (BOLOGNA) शहरातही न थांबता आम्ही तसेच पुढे अंतर कापीत राहिलो. मजल-दरमजल करीत आम्ही फ्लॉरेन्स (FIRENZE) पर्यंत येऊन पोचलो.

फ्लॉरेन्स म्हणजे इटलीच्या कलाजीवनाचा केंद्रबिंदू! महाकवी डांटे याची जन्मभूमी अन् कर्मभूमी. टस्कनी प्रांतातल्या या शहरात मायकेल एंजेलोच्या शिल्पकृती, लिओनार्डो अन् रॅफेल या थोर कलाकारांच्या चित्रकृती आणि लॉरेन्झो गिवर्टीसारख्या कलाकारांच्या कलाकृती विविध म्युझियम्समधे खास जतन करून ठेवलेल्या आहेत. जगातलं सर्वात भव्य चर्च म्हणजे रोममधलं सेंट पीटरचं चर्च! त्याखालोखाल नंबर लागतो लंडनमधल्या 'सेंट पॉल'च्या चर्चचा. तिसऱ्या क्रमांकाचं 'कॅथेड्रल चर्च' फ्लॉरेन्समधे आहे. हे चर्च बांधून पूर्ण व्हायला तब्बल सत्तर वर्षं लागली म्हणतात. एखाद्या लॅटिन क्रॉससारखा आकार असलेल्या या चर्चच्या बाजूचा मनोरा आकाशाला जाऊन भिडतोय की काय असंच वाटतं. फ्लॉरेन्समधल्या आर्ट गॅलरीमधली चित्रं बघताना खरोखर देहभान विसरायला होतं.

फ्लॉरेन्स शहरापासून पश्चिमेस अवघ्या ऐंशी किलोमीटर्स अंतरावर पिसाचा कलता मनोरा होता. रात्रीचा मुक्काम करण्यासाठी आम्ही सूर्यास्त व्हायच्या आत पिसा शहरातलं कँपिंग गाठलं. दुसऱ्या दिवशी प्रातःसमयीच आम्ही हा मनोरा बघायला निघालो. शहराच्या मध्यभागातच हा मनोरा आहे. सकाळपासूनच देशविदेशचे पर्यटक यायला लागले होते. जगातल्या सात आश्चर्यकारक गोष्टींपैकी समजली जाणारी निदान एक गोष्ट तरी आज आम्ही बघत होतो.

पंचावन्न मीटर्स उंचीचा हा मनोरा तब्बल साडेचार मीटर्स कललेला आहे. १८७४ साली बोनान्नो पिसानो या शिल्पकारानं हा मनोरा बांधायला सुरुवात केली. तब्बल नव्व्याण्णव वर्षांनी तो पूर्ण झाला, तोही अशा कलत्या स्वरूपात! या मनोऱ्याच्या अगदी टोकापर्यंत वर जायला प्रत्येकी एक हजार लिरांचं म्हणजे दहा रुपयांचं तिकीट होतं. मनोऱ्यावर ठेवलेल्या यंत्रामधे शंभर लिरांचं नाणं टाकायचं अन् बटन दाबायचं म्हणजे पिसाच्या या कलत्या मनोऱ्याबद्दलची माहिती आपल्याला ऐकायला मिळते. तीनशे पायऱ्या चढून आम्ही अगदी थेट

टोकावर जाऊन पोचलो. या ठिकाणी मोठमोठ्या सात घंटा टांगलेल्या होत्या. त्या प्रत्येकीतून सप्तसुरांपैकी एकएक सूर ऐकायला मिळतो. याच मनोऱ्यावरून गॅलिलिओ गॅलेली यानं गुरूत्वाकर्षणाचे नियम पडताळून पाहिले. आज त्याच मनोऱ्यावरून पिसा शहराचं अवलोकन करताना आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले होते.

दुपारचं जेवण आटोपताच आम्ही फ्लॉरेन्सला परत फिरलो आणि आटोवानवरून पुनश्च रोमकडे निघालो. अगदी थेट रोमपर्यंतचा 'रोड टॅक्स' आम्ही दिला असल्यानं आमच्याजवळच्या इटालियन लिरा आता जवळजवळ संपल्याच होत्या. गाड्यांमधे 'बेंझिन' भरपूर होतं. पण सूर्यास्तापूर्वी आम्ही रोमला पोचणं शक्य नव्हतं. त्यामुळे कॉर्तिना या गावाजवळ 'ला सोस्ता' या नावाच्या छानशा हॉटेलची पाटी बघून आम्ही थबकलो. इथं डॉलर्स नक्कीच मोडून घेता येतील, असा विचार करून मी आत शिरलो. समोरच मला 'लायन्स इन्टरनॅशनल'चं चिन्ह दिसलं.

तावडतोब मी माझ्या पोतडीतली 'लायन्स क्लब'ची ओळखपत्रं बाहेर काढली आणि हॉटेलच्या मालकापुढे जाऊन उभा ठाकलो. अपेक्षा होती तसंच झालं! हॉटेलचे मालक अंतोनिओ पात्सालिया हेच मुळी 'कॉर्तिना लायन्स क्लब'चे सभासद होते. आम्हा सर्वांना त्यांनी मोठ्या आग्रहानं संध्याकाळच्या जेवणासाठी ठेवून घेतलं. अंतोनिओ मोठे बोलके होते. त्यांच्याशी गप्पा मारीत, द्राक्षापासून तयार केलेल्या 'ग्राप्पां'ची चव घेत आणि खास इटालियन पद्धतीच्या आहाराचा आस्वाद घेत आमचे दोन तास फार मजेत गेले.

अकल्पितपणे एवढा पाहुणचार झोडल्यावर मात्र त्याच हॉटेलमधे पाय पसरणं आम्हाला योग्य वाटलं नाही. अंतोनिओंचा निरोप घेऊन आम्ही निघण्याचं निव्वळ नाटक केलं; आणि काही यार्डांवरच रात्रीच्या विश्रांतीसाठी उभ्या असलेल्या ट्रक्सच्या आडोशाला सोयीस्कर जागा बघून जमिनीवरच आडवे झालो.

⌘ ⌘ ⌘

(९)


# कलानिधी रोममधील रोमांचकारी दिवस

आज जुलै महिन्याची एकोणीस तारीख होती. रोम शहरात प्रवेश करून आज आम्ही या प्रदीर्घ प्रवासाची सांगता करीत होतो. आमच्या इच्छाशक्तीच्या जोरावर मित्र–आप्तेष्टांच्या सदिच्छांची शिदोरी बरोबर घेऊन, थोरामोठ्यांच्या आशीर्वादांची कवचकुंडलं धारण करून, वाटेत आलेल्या संकटांशी समर्थपणे मुकाबला करीत दहा हजार किलोमीटर्सचा पल्ला गाठून आम्ही या रोमन साम्राज्याच्या ऐतिहासिक राजधानीत पाय ठेवीत होतो. रोमन सम्राट ज्युलियस सीझर, कॉन्स्टेंटाइन–द–ग्रेट, सिसेरो, गॅरीबाल्डी, जोसेफ मॅझिनी, बेनेटो मुसोलिनी, लिओनार्दो–द–व्हिन्सी, रॅफेल, मायकेल एंजेलो अन् महाकवी डांटे या विभूतींच्या महान कर्मभूमीत शिरत असतानाच रोमचा ऊर्जस्वल इतिहास आमच्या मनःचक्षूंसमोर उभा रहात होता.

या भव्य शहरातलं 'व्हिया ऑलिम्पिया'वरचं 'फोरो इटालिको' हे यूथ होस्टेल शोधून काढायला आम्हाला तब्बल एक तास लागला. एक हजार तरुणतरुणींची रहाण्याची सोय असलेल्या या होस्टेलच्या दारात प्रवेशासाठी भलीमोठी रांग लागलेली होती. आमच्या मोटरसायकल्सवरचं सामान तसंच ठेवून आम्ही नंबर धरून बसलो. पण प्रवेशाची शक्यता कमीच होती. त्यामुळे रमेश आणि सुधीर हे दोघे पर्यायी व्यवस्था पहायला निघून गेले. या रांगेत भारतीय असे फक्त आम्हीच होतो. नाही म्हणायला एक दक्षिण–भारतीय विद्यार्थी अथेन्समधली कसलीशी शैक्षणिक परिषद आटोपून जाताजाता रोम बघायला आला होता. 'यूथ होस्टेल'वर प्रवेशासाठी जमलेली ही गर्दी बघून तो चांगलाच भेदरला होता. आम्हाला पहाताच त्याला साक्षात अयप्पाच पावल्यासारखं वाटलं असावं. आम्हीही त्याला धीर दिला आणि आमच्याबरोबर रहायला सांगितलं.

आमचा नंबर आता बराच पुढे सरकला होता. पण तेवढ्यात रमेश नि सुधीर परतले. रोम शहरापासून काहीसं दूरचं पण रमणीय असं 'कॅम्पिंग–तिब्बर' त्यांनी निवडलं होतं. आमच्या नव्या मित्राला पाठीशी घेऊन आम्ही तिकडे मोर्चा वळवला. या निसर्गरम्य वातावरणात तब्बल एक महिना आमचं रोममधलं वास्तव्य होणार होतं याची त्या क्षणी आम्हाला कल्पनाही नव्हती. या ठिकाणच्या दीर्घ वास्तव्याच्या आठवणींचा सौरभ आज आमच्या आयुष्यात दरवळत आहे. युरोपमधली खरी मौज आम्ही याच ठिकाणी जगलो.

तिबेरिना नदीच्या काठी पसरलेल्या या कॅम्पचा परिसर विस्तीर्ण होता. ऐन सुट्टीच्या दिवसांत आम्ही इथं आल्यानं जगाच्या कानाकोपऱ्यांतून आलेल्या पर्यटकांचं जणू संमेलनच आम्हाला बघायला मिळत होतं. पण या गर्दीतही आमचं लक्ष वेधून घेतलं ते भारतीय साडी नेसलेल्या सौ. अग्निहोत्रींनी. लंडनमधे स्थायिक झालेल्या या अग्निहोत्री दांपत्याबरोबरच आम्ही जेवण उरकलं. सौ. अग्निहोत्रींनी आमच्यासाठी फक्कडशी भाजी केली होती. मूळचे जबलपूरचे असल्यानं या दांपत्याला मराठी अजिबात येत नव्हतं. त्यातून इंग्लंडमधला त्यांचा



रोममधील तिबेरिना नदीकाठचा एक प्राचीन दुर्ग

अनेक वर्षांचा रहिवास! 'टाइम्स'मधला आमचा फोटो त्यांनी बघितला होता. त्यामुळं आमच्याशी गप्पा मारण्यात त्यांनी विशेष रस घेतला. मात्र दुसऱ्याच दिवशी हे दांपत्य आमचा निरोप घेऊन मोटारीनं ग्रीसकडे रवाना झालं, तेव्हा वाईट वाटलं.

रोममधल्या आपल्या वकिलातीत अशाच आणखी एका भारतीयाशी आमचा स्नेह जुळला. त्याचं नाव प्रवीण मुकेश. आमच्याच वयाचा, मोहक व्यक्तिमत्त्वाचा हा तरुण भाषान्तराचं काम तिथे करीत होता. फ्लॉरेन्सजवळच्या पेरुग्वा विद्यापीठात त्यानं इटालियन भाषा शिकून घेतली होती. त्याच्यामुळेच आम्हाला रोममधल्या 'हरेकृष्ण मिशन'चा शोध लागला. इथलं कृष्णमंदिर खरोखर वाखाणण्यासारखं होतं. भारतात एरवी जाणवणारा प्रचारी थाट त्यात नव्हता. दुपारी बारा वाजता सामुदायिक आरती व्हायची. मुंडण केलेले इटालियन आणि अमेरिकन कृष्णभक्त टाळमृदंगाच्या तालबद्ध सुरात मुरलीधराच्या मोहक मूर्तीसमोर गायचे, नाचायचे. अगदी आपले वारकरी जसे बेभान होऊन नाचतात ना, तस्से! त्यामुळेच की काय, आम्हीही त्या वातावरणाशी समरस व्हायचो आणि 'हरे रामा, हरे कृष्णा, कृष्णा कृष्णा हरे हरे' या नादघोषात आणि भक्तिरसात न्हाऊन निघायचो.

गंमत अशी की, आरतीनंतर देण्यात येणाऱ्या प्रसादाच्या स्वादिष्ट जेवणाचा लाभ घेण्यासाठी भारतीय हिंदूंप्रमाणेच पाकिस्तानी नागरिकही नेमके आरतीच्या वेळीच हजर व्हायचे आणि कृष्णगानात टाळ्या वाजवीत सहभागी व्हायचे. प्रसादाचं जेवण अस्सल भारतीय थाटाचं आणि फारच रुचकर असायचं. रविवारी संध्याकाळी तर 'दोलचे' म्हणजे पक्वान्नांची सरबराईच असायची. आमच्यासारख्या प्रवाशांना या प्रसादाचा लाभ म्हणजे एक पर्वणीच होती.


'कँपिंग तिब्बर' हे स्थळ रोमच्या उपनगरात असल्यानं ट्यूब रेल्वेनं फ्लेमिनोपर्यंत जावं लागे. जमिनीखालून जाणाऱ्या या गाड्या फारच वेगानं जात. अवघ्या वीस मिनिटांत आम्ही रोम शहराच्या अगदी गजबजलेल्या भागातल्या 'पीपल्स स्क्वेअर' ऊर्फ जनता चौकापर्यंत (PIAZZA DEL POPOLO) येऊन पोचायचो. 'टर्मिनी' म्हणजे रोमचं रेल्वेस्थानक – टर्मिनस. याचा दर्शनी भाग एखाद्या विमानतळासारखा वाटतो. प्रत्यक्ष रेल्वेमार्ग भुयारी असल्यानं अधिकच मौज वाटते. युरोपमधल्या अनेक ठिकाणांप्रमाणे रोमच्या

रेल्वेस्थानकावरही गर्दीची भयानकता जाणवत नाही. मुंबईमधल्या बोरीबंदर किंवा चर्चगेट या स्थानकांवर सकाळी किंवा सायंकाळी केवळ तासभर उभं राहिल्यास जितकी माणसं नजरेसमोरून जातील तितकी माणसं या रोमच्या भव्य रेल्वेस्थानकावर दोन दिवस अहोरात्र उभं राहिलं तरी दिसणार नाहीत.

टर्मिनीला लागूनच टेलिफोनकेंद्र होतं. रोमहून मुंबईला फोन लागायला दहा मिनिटांचाही अवधी लागत नाही. तीन मिनिटं बोलण्यासाठी दोनशे रुपये मात्र मोजावे लागतात. युरोपमधल्या अन्य देशांशी संपर्क साधण्यासाठी ट्रंककॉल करावा लागत नाही. केवळ नंबर फिरवून बोलता येतं. स्टेशनच्या बाजूलाच इटालियन 'ऑटोमोबाइल्स असोसिएशन'चं कार्यालय होतं. तिथं आम्हाला प्रवासाला उपयुक्त अशी बरीच माहिती आणि नकाशे मिळाले.

समोरच्या बागेत फिडलच्या तारा छेडीत अनेक तरुण आजूबाजूला विसावलेल्या पथिकांना आपल्या हृदयाची स्पंदनं ऐकवीत होते. 'मोना लिसा'ची चित्रं पैशाला पासरीच्या दरानं विकली जात होती. कलिंगडांचे लालभडक काप साखर लावून विकायला ठेवलेले होते.

जवळपास अनेक चित्रपटगृहं होती. संध्याकाळचा पाचचा खेळ सुरू व्हायला फारसा अवकाश नव्हता. तरीही सारं कसं शांत शांत वाटत होतं. आपल्याकडे चित्रपटगृहं म्हणजे लाखो रुपयांचा चुराडा करून बांधलेल्या टोलेजंग इमारती, त्यांवर लावलेल्या नटनटींच्या मोठमोठ्या प्रतिकृती, जाहिरातबाजीवर केलेली बेसुमार उधळपट्टी, तिकिटांसाठी उडालेली झुंबड, 'दो का पाच – दो का पाच' करीत गर्दीतून फिरणारी टोळकी आणि 'फुल्ल'चा बोर्ड असला तरी सिनेमा पाहिल्याखेरीज जायचंच नाही अशा निर्धारानं तिथेच घुटमळणारे असंख्य सिनेपौकिन, हेच दृश्य डोळ्यांसमोर येतं. या उलट इकडे चित्रपटगृहांची वेगळी इमारत अशी नसते तळघरातल्या एखाद्या छोट्याशा हॉलमधे दोन–अडीचशे लोकांची बसण्याची सोय केलेली असते. तिकिटांचे दर दहा, वीस, पंचवीस रुपये असे असतात अन् चित्रपट अवघ्या दीड–दोन तासांचेच असतात. चित्रपट बघायला येणारे प्रेक्षकही इतक्या शांतपणे, शिस्तीनं तिकिटं घेत असतात, की कुणी सांगितल्याशिवाय अशा ठिकाणी सिनेमा आहे हे कळायचंच नाही.



**शिल्पनगरी रोममधील थाळीफेक करणाऱ्या ॲथलेटचे हे छायाचित्र**

रोम शहराच्या प्राचीनतेची जाणीव 'टर्मिनी' पासूनच व्हायला लागते. शेकडो वर्षांच्या भव्य आणि पुरातन शिल्पकलेनं नटलेल्या इमारतींमुळे आपण एका ऐतिहासिक नगरीत आहोत हे सतत जाणवत रहातं.

'कलोसियम' (COLOSSEUM) या नावानं ख्यातनाम असलेलं दोन हजार वर्षांपूर्वीचं स्टेडियम शहराच्या अगदी मध्यभागात, रहदारीच्या रस्त्यावरच गर्वानं उभं आहे. प्राचीन काळचे रोमन सम्राट आणि त्यांचे सरदार आपल्या मनोरंजनासाठी या ठिकाणी माणसांची झुंज हिंस्र पशूंबरोबर लावायचे. राजाबरोबर प्रजाही असल्या क्रूर खेळात रस घ्यायची की काय न कळे. बहुधा घेत असली पाहिजे. अन्यथा नव्वद हजार प्रेक्षकांची सोय या स्टेडियममधे करण्याचं दुसरं प्रयोजन काय असणार? आज हे स्टेडियम भग्नावस्थेत उभं असलं तरी रोम शहराच्या भव्यतेत ते आगळीच भर घालतं.

त्रेवी चौकातलं नयनरम्य कारंजं (FONTANA DI TREVI) हे पर्यटकांचं विशेष आवडीचं ठिकाण. आपल्याकडच्या 'संगम' चित्रपटातला प्रणयरम्य प्रसंग याच पार्श्वभूमीवर चित्रित केलेला आहे. एका प्रचंड शिंपल्यात

शिल्पकलेच्या माध्यमातून शतकानुशतकं इतिहास जिवंत ठेवणारं इतकं अफाट शहर जगाच्या पाठीवर दुसरं नसेल!

शिल्पकलेतला महान सम्राट म्हणजे मायकेल एंजेलो. त्याची तर सारी हयातच रोमच्या परिसरात गेली. जगातली सर्वोत्कृष्ट शिल्पकृती त्याचीच. वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी ती त्यानं तयार केली. 'पीएटा' या नावानं ख्यातनाम असलेली ही शिल्पकृती व्हॅटिकन शहरातल्या 'सेंट पीटर्स चर्च'मधे आम्हाला बघायला मिळाली. ही शिल्पकृती बघून मी मी म्हणणारे शिल्पकारही तोंडात बोटंच घालतील. मायकेल एंजेलो हा सिद्धहस्त कलाकार होता हे




मायकेल एंजेलोचे जगद्विख्यात शिल्प : 'पीएटा'

वादातीत; पण त्याची कला राजेरजवाडे आणि धर्मगुरू यांच्या इच्छेनुसारच राबवली गेली. आयुष्यातली तीस वर्ष त्यानं या व्हॅटिकन शहराची निर्मिती करण्यात घालवली. धर्मगुरूंच्या आज्ञेनुसार त्यानं असंख्य शिल्पकृती तयार केल्या आणि व्हॅटिकनच्या सौंदर्यात तो भरच घालत राहिला.

'सेंट पीटर्स चर्च'मधलं प्रमुख आकर्षण म्हणजे मायकेल एंजेलोनं चितारलेलं 'सिस्टाइन चॅपेल'चं भव्य छत. चित्रकला त्यानं या ठिकाणी अक्षरशः जिवंत केली आहे. शिल्पकलेत जीव ओतून काम करणाऱ्या मायकेल एंजेलोनं चित्रकलेची ही जबाबदारी मनाच्या इच्छेविरुद्ध पार पाडली. असं म्हणतात की चिडून जाऊन त्यानं स्वतःला चार वर्षं या चर्चमधे कोंडून घेतलं आणि मगच हे छत चित्रकृतींनी सजवण्याचं कार्य पार पाडलं. 'लास्ट जजमेंट' ऊर्फ 'अखेरचा न्याय' या नावानं प्रसिद्ध असलेले महापुराचे प्रसंग याच छतावरचे. आज ही चित्रकृती अजरामर झाली आहे. बायबलमधले अनेक प्रसंग या छतावर चितारलेले आहेत. ख्रिश्चन धर्माच्या या कथांबद्दल आमचं ज्ञान अगदीच शून्य असल्यानं केवळ चित्रकला म्हणूनच आम्ही त्यांच्याकडे बघत होतो. बाकी आम्हाला काहीही कळत नव्हतं. तरीही दिव्यत्वाची प्रचिती जागोजाग येत होती हे निश्चित.

रोमन साम्राज्याच्या इतिहासात व्हॅटिकनच्या या 'सेंट पीटर्स चर्च'चं महत्त्व फार. राजसत्तेवर वर्चस्व गाजवणाऱ्या धर्मसत्तेचं हे केंद्रस्थान होतं. कालान्तरानं या धर्मसत्तेला आव्हान मिळालं. राजकारणात ढवळाढवळ करणाऱ्या धर्मगुरूंविरुद्ध जनतेनं बंड पुकारलं, आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडात या धर्मगुरूंची सत्ता निव्वळ व्हॅटिकन शहरापुरती मर्यादित झाली. आम्ही या शहराला भेट दिली त्या वेळी पोप पॉल हे व्हॅटिकनचे प्रमुख होते.

रोमहून साध्या बसनं या शहरापर्यंत येता येतं. वास्तविक या शहराला स्वतंत्र देशाचा दर्जा आहे. पण आपण एका वेगळ्या देशात प्रवेश केलाय याची जाणीवही होत नाही. मात्र एका प्रचंड आणि गोलाकार भिंतीमुळे या देशाच्या सीमा निश्चित झाल्या आहेत. इथली वस्तुसंग्रहालयं आणि बरीचशी चर्चेस बघण्यासारखी आहेत. 'सेंट पीटर्स चर्च'च्या समोरचा परिसर प्रचंड आहे. याच



**रोमन कॅथॉलिक ख्रिश्चन धर्मीयांचे पवित्र सेंट पीटर्स चर्च आणि धर्मगुरू पोपचे सत्ताकेंद्र – व्हॅटिकन!**

आवारात पोप आठवड्यातून एकदा जाहीर प्रवचन करतात. जगातल्या तमाम ख्रिश्चन कॅथॉलिकधर्मीयांचं हे काशी क्षेत्रच ठरलं आहे. या भव्य शहरातल्या पवित्र वातावरणात आम्ही चांगलेच रममाण झालो होतो.

रोम शहरात आम्ही मन मानेल तसं भटकलो. शहरापासून तीसपस्तीस किलोमीटर्स दूरवर असलेला, लिओनार्डो–द–व्हिन्सीच्या नावानं बांधलेला रोमचा प्रख्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ बघितला. प्राचीन रोमप्रमाणेच अर्वाचीन रोमच्या परिसरातही भ्रमंती केली.

इटालियन रेडिओवर माझी तब्बल अर्धा तास मुलाखत घेण्यात आली. योगसाधनेपासून अगदी रवींद्रनाथांच्या 'गीतांजली'पर्यंत सगळ्या विषयांवरच्या प्रश्नांना मला तोंड द्यावं लागलं. प्रसंगावधान राखून मी वेळ निभावून नेली ही गोष्ट खरी; तरीही आपल्या देशाविषयी आपलं ज्ञान तुटपुंजं आहे या गोष्टीचा

मला मनस्वी विषाद वाटला. विद्यार्थिदशेत असतानाच भारताविषयी जास्तीत जास्त माहिती मिळवली गेली पाहिजे, भारतीय महापुरुषांची चरित्रं तोंडपाठ झाली पाहिजेत, असं मला माझ्या तरुण मित्रांना आग्रहानं सांगावंसं वाटतं ते यामुळेच!

रोममधल्या आमच्या वास्तव्यातच आम्ही भारतीय स्वातंत्र्यदिन साजरा केला. आमच्या 'कँपिंग तिव्वर'मधे आमच्या शेजारी रहात असलेल्या इटालियन कुटुंवासमवेत सहभोजन करण्याचा कार्यक्रम ठरला. आमच्यासाठी 'स्पॅघेटीज' आणि 'तालियातल्ले' करायला त्यांनी सुरुवातही केली. आम्हीही वासुंदीसाठी दूध आटवायला लागलो. इराणमधलं केशर आमच्याकडे होतंच. साखरेची टंचाई अजिवात नव्हती. हवी तेवढी 'झुकुरे' (ZUKURE) ऊर्फ साखर कँपिंगमधल्या मिनी मार्केटमधे मिळू शकत होती. प्रश्न होता : पुऱ्या करण्यासाठी गव्हाचं पीठ आणायचं कुठून? सुदैवानं बराच खटाटोप केल्यावर आम्हाला तेही मिळालं. आमच्या हत्यारात हातोडी होतीच; तिच्या दांड्याचं झालं लाटणं तयार! आमच्या पुऱ्या टरटरीत फुगायला लागल्या, तशी आजूबाजूचे युरोपियन आमच्याभोवती गोळा झाले – या पुऱ्या फुगतात कशा याचं कुतूहल वाटून! आम्हीही सत्यनारायणाच्या प्रसादाप्रमाणं आल्यागेल्याला एकेक फुगलेली पुरी वाटत सुटलो. अखेर दुपारच्या तिसऱ्या प्रहरी आमची पंगत जेवायला वसली. गाण्यांच्या आणि गप्पांच्या नादात 'स्पॅघेटीज–वासुंदी'चं सहभोजन केव्हा संपलं ते कळलंच नाही. त्याच रात्री त्या इटालियन कुटुंवानं आम्हाला कायमची हुरहूर लावून त्यांच्या गावाकडे – ब्रेशियाला – प्रयाण केलं.

रोममधल्या अशा भावगर्भ आठवणींची साठवण करीत आमचा एक आठवडा कसा सरला ते कळलं देखील नाही. अखेर एकतीस ऑगस्टच्या पहाटेस धुंवाधार पावसात रोमन साम्राज्याच्या त्या महान भूमीला अखेरचा प्रणिपात करीत अकरा हजार किलोमीटर्सच्या परतीच्या खडतर प्रवासाला आम्ही प्रारंभ केला.

दीडदोनशे किलोमीटर्स अंतरावर असलेली स्वित्झर्लंडमधल्या आल्प्स पर्वतांची हिमशुभ्र शिखरं आम्हाला साद घालीत होती. अवघ्या तीन दिवसांची दौड करून आम्ही पॅरिसची 'रंगीन शाम' अनुभवू शकलो असतो, आकाशाचं चुंबन घेणारा "एफेल टॉवर" पाहू शकलो असतो अन् तिथून आणखी चार



**हातोडीच्या दांड्यानं लाटलेल्या आमच्या पुऱ्या टरटरीत फुगू लागताच कुतुहलानं बघणारे इटालियन कुटुंब.**

दिवसांत इंग्लिश खाडी पार करून लंडनच्या थेम्स नदीच्या काठी राहुट्या टाकू शकलो असतो; पण आमच्याजवळ असलेलं परकीय चलन एवढं तुटपुंजं होतं की त्यामुळे आमची अवस्था भरल्या ताटावरून अर्धपोटी उठावं लागावं तशी झाली होती. जेवढं बघितलं त्यांतच समाधान मानण्यात सूज्ञपणा होता. सैरभैर धावणाऱ्या आकांक्षांना लगाम घालणंच हिताचं होतं. काहीशा विमनस्क स्थितीतच आम्ही परतीचा मार्ग चोखाळू लागलो.

व्हेनिसला घेतलेल्या आमच्याच तंबूत रात्रीचा मुक्काम करीत, केवळ शेतांवरच्या हिरव्यागार भाज्यांवरच उदरनिर्वाह करीत, उन्ह, वारा, थंडी, पाऊस या सर्वांशी समर्थपणे मुकावला करीत तब्बल चाळीस दिवसांची अविश्रांत मुशाफिरी करीत आम्ही आल्या मार्गानेच काबूलला येऊन ठेपलो. रानडे कुटुंबानं आम्हाला भावपूर्ण निरोप दिला आणि आम्ही अमृतसरच्या पुण्यभूमीवर येऊन

उतरलो.

मुंबई–रोम–मुंबई अशा या साडेबावीस हजार किलोमीटर्स प्रवासाची यशस्वी सांगता झाली होती. बावीस मे ते एकोणीस आक्टोबर असा दीडशे दिवसांचा हा प्रदीर्घ प्रवास संपला होता. या काळात जीवनाचे विविध रंग, मानवी स्वभावाच्या अनंत छटा आम्ही बघितल्या. मरणाच्या सीमारेषेला आम्ही अनेकवेळा स्पर्श करून आलो. प्रसंगी एकमेकांशी भांडलो, प्रसंगी एकमेकांसाठी रडलो देखील! तथापि जिद्दीच्या जोरावर, थोरामोठ्यांच्या आशीर्वादांची कवचकुंडलं धारण करून आलेल्या आपत्तींशी वेडरपणे झुंज दिली.

अन् त्यामुळेच मुंबई–रोम–मुंबई प्रवासाचं स्वप्न 'स्वप्न' राहिलं नाही–सत्यात ते साकार झालं! . . . त्या सत्याचाच हा विनम्र शब्दाविष्कार!

⌘ ⌘ ⌘

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0027408